शनिवार । २३ मे १९८१ । एक रुपया

# माणूस

निपाणीतील देवदासी, विडी कामगार-स्त्रिया आणि तंबाखू कामगार स्त्रिया यांच्या दैनंदिन जीवनात बदल घडवून आणणारे आंदोलन कसे उभे राहिले ? पृष्ठ...१३



छायाचित्र : सरोजा परुळकर

## ७५ वर्षांपूर्वीच्या मळेकर वाड्यात....

साहित्य परिषद अमृतमहोत्सवानिमित्त लेख....पृष्ठ ५

# स्वायत्तता म्हणजे संन्यास नव्हे

श्री. ग. मा.

आपण मराठी माणसे आरंभशूर म्हणून प्रसिद्ध आहोत. नवीन उपक्रम, नवे विचार याचे आपल्याला जबरदस्त आकर्षण असते; पण या विचारांना कृतीची जोड द्यायची वेळ आली की आपला क्रमांक शेवटचा. सस्था सुरू करण्याचा आपला उत्साह अवर्णनीय आहे; पण संस्था जोपासणे–वाढवणे आपल्याला नको असते. बाहेरच्या पाट्या कायम असतात; पण आतली संस्थेतील माणसे दिवस, वर्षे कशीबशी कंठत राहतात. हे सगळे आपल्या एकारलेपणातून होत असावे. साहित्यक्षेत्रही याला अपवाद कसे असणार? दुर्गाबाई भागवत यानी आणीबाणीनंतर वंदे मातरम् ट्रस्ट काढला. वृत्तपत्रातून या ट्रस्टच्या कार्याविषयी, स्वरूपाविषयी उलटसुलट बरीच चर्चा झाली. जयवंत दळवी यांच्यासारखे नामवंत साहित्यिक या ट्रस्टमध्ये लक्ष घालणार असेही ठरत होते; पण पुढे कुठे माशी शिंकली हे कळले नाही; पण आजतागायत कुणी या विषयावर काही अधिकृतपणे लिहिले–सागितले तरी नाही. ज्यानी या ट्रस्टसाठी देणग्या दिल्या त्यांनाही संयोजकातर्फे काही कळवले गेले नाही. पैसे बँकेत पडून असावेत. वास्तविक मॅजेस्टिकचे श्री. कोठावळे 'ललित' पारितोषिकाची योजना एकट्याच्या बळावर उभी करून शकतात, 'मॅजेस्टिक गप्पा' हा उपक्रमही ते पुण्यात रुजवून–वाढवून नावारूपाला आणून ठेवतात; मग वंदे मातरम् ट्रस्ट का उभा राहू शकत नाही? ट्रस्टची मूळ कल्पना दुर्गाबाईंची. त्यांनी टोकाची भूमिका घेतली असण्याची शक्यता आहे. आणीबाणीमध्ये टोकाची भूमिका हा गुण ठरला. दुर्गाबाईमुळेच आणीबाणीच्या काळात मराठी साहित्याची व साहित्यिकाची मान थोडीफार उंच राहू शकली हे एकदा नाही शभर वेळा मान्य केले तरी नेहमीसाठी भूमिका कोणती असावी, शासन आणि साहित्य-साहित्यिक याच्या सर्वसाधारण संबंधांचे स्वरूप काय असावे, हा प्रश्न उरतोच. याविषयी साहित्यिकांची, साहित्य संस्थांची भूमिका पूर्ण असहकाराची असणे शक्यही नाही आणि आवश्यकही नाही. ती जागरूक सहकार्याची असू शकते. सरकारचा आश्रितपणा किंवा पूर्ण असहकार यांच्या मधली स्वायत्ततेची स्थिती राखता येते; पण दुर्गाबाईंना ही व्यवहार्य व बहुमान्य होण्यासारखी भूमिका अजिबात पटत नसेल व वंदे मातरम् ट्रस्टचे अस्तित्व त्याना शासकीय पुरस्काराशी–व्यवहारांशी पूर्णतः समातर ठेवायचे असेल तर तसे त्यांनी जाहीर करून ट्रस्ट चालू करावा किंवा गुंडाळून मोकळे व्हावे! काहीच प्रकटपणे न सांगितले–लिहिले गेल्यामुळे मराठी माणसाच्या आरंभशूरत्वाच्या अपकीर्तीत उगाचच भर पडत आहे. मधू दंडवते इंदिरा गाधींच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या जयप्रकाश स्मारक समितीवर सभासद म्हणून जातात याबद्दल त्यांना फटकारणाऱ्या दुर्गाबाईंनी वंदे मातरम् ट्रस्टबद्दलचा हा घोळ यापुढे तरी कायम ठेवू नये.

¤

खरं म्हणजे किती चागली संधी अंतुले सरकारच्या या क्षेत्रातल्या एका दांडगाईच्या कृतीमुळे चालून आलेली होती! सिंहासन, जनांचा प्रवाहो व लोकनायक जयप्रकाश या तीन पुस्तकांची महाराष्ट्र राज्य पुरस्कारासाठी निवड झालेली होती. निवड तज्ज्ञसमितीने केलेली होती; पण हस्तक्षेप करून अतुले सरकारने ही निवड रद्द केली व सरकारचा तसा हक्क आहे असेही सांगितले. पैसे सरकारचे


साप्ताहिक माणूस

वर्ष : विसावे

अंक : एक्कावन्नावा

२३ मे १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४९९

तेव्हा अंतिम हक्क सरकारकडे हे उघडच; पण सहसा असा धसमुसळा हस्तक्षेप लोकशाही शासनाकडून होत नाही व निदान महाराष्ट्रात तरी तो असा आजवर झाल्याचे कुणी सांगत नाही. वास्तविक या हस्तक्षेपाचा राग तज्ज्ञ समितीला यायला हवा होता. कारण त्यांचा सल्ला डावलला गेला होता, सरकारने त्यांनी निवडलेल्या यादीतील तीन पुस्तके, त्यांना न कळवता, त्याची संमती न घेता, ऐनवेळी काढून टाकली होती. हा अपमान कमी होता म्हणून की काय, विधानसभेत या पुस्तकांची निवड कशी चुकीची होती यावरही आपले भाष्य ठोकून मंत्रीमहोदय मोकळे झाले होते. समितीच्या तज्ज्ञतेवरच येथे ठपका ठेवण्यात आला होता. तरी ही समिती मख्ख राहिली. समितीच्या बहुसंख्य सभासदांनी हा अवमान सहज गिळला, पचवलाही! अशी सगळी बाणेदारपणाची, स्वाभिमानाची अवस्था असताना अंतुले सरकारच्या या कृतीचा, एवढ्यापुरता निषेध करण्यासाठी पुरस्कारप्राप्त झालेले इतर काही साहित्यिक पुढे येतात, आपल्याला लाभलेले पुरस्कार शासनाला परत करतात, ही स्वागतार्ह घटना आहे की नाही? ज्या तिघाचे पुरस्कार यादीतून ऐनवेळी वगळले गेले ते दुखावणे, नाराज होणे साहजिक आहे; पण या तिघांना वगळले म्हणून यादीतील इतर ७/८ जणांनी आपल्याला मिळालेले पुरस्कार निषेध म्हणून परत करणे, ही कृती तज्ज्ञसमितीच्या कोडगेपणाच्या पार्श्वभूमीवर किती तरी उजवी आणि विशेष अभिनंदनीय समजली पाहिजे! दुर्गाबाईनी किंवा त्याच्या ट्रस्टने असे अभिनंदन करण्यास प्रथम पुढे यायला हवे होते. कारण ज्या तेजस्वी वृत्तीची आज वाण आहे तिचेच हे, लहान लहान का असेनात, आविष्कार आहेत आणि वंदे मातरम् ट्रस्ट तरी यापेक्षा आणखी काय साधू पाहत होता? पण दुर्गाबाईना एकदम मशाली हव्यात. ठिणग्यांनी त्याचे समाधान होत नाही. पण मशाली नाहीत म्हणून ठिणग्यांना नाकारून, त्यांची अवहेलना करून व्यवहारात कसे चालेल? मग घडते ते असे: एका टोकावर दुर्गाबाई एकटयाच उभ्या राहिलेल्या दिसतात. दुसऱ्या टोकाला अकोल्याला झाली तशी भिक्षुकाची साहित्यसंमेलने झडत राहतात. सर्वसामान्याना ही दोन्ही टोके नको असतात. अकोल्याला झालेले लाचारीचे प्रदर्शनही तो किळसवाणे मानतो व दुसरीकडे दुर्गाबाईंसारख्या व्यक्ती मागतात तो सर्वसंगपरित्यागही त्याला न झेपणारा असतो, चुकीचाही वाटतो. मग अशा सर्वसामान्य सुविद्य लोकांनी, रसिक वाचकानी करायचे काय? जायचे कुठे? झेपतील असे आदर्श अशा जनसामान्यांपुढे या क्षेत्रातील मान्यवरांनी ठेवायचे की नाही? हे कार्य शिक्षक प्रवृत्तीची व्यक्ती चांगल्या प्रकारे करू शकते व सुदैवाने परस्परविरोधी टोकाच्या भूमिका घेणाऱ्या वेगवेगळ्या व्यासपीठावर आवर्जून उपस्थित राहून, हल्ली प्रा. गं. बा. सरदार हे कार्य करीत आहेत. अकोल्याच्या साहित्य-समेलनात ते मंत्र्याना आणि त्याच्या चमच्याना फटकारतात व तेथे जमलेले सगळेच साहित्यिक, समीक्षक भिक्षुकवृत्तीचे नाहीत, लाचार नाहीत हे दाखवून देतात. नुकऱ्याच मुबईला पार पडलेल्या, 'साप्ताहिक सोबत' आयोजित स्वाभिमान पारितोषिकवितरणप्रसंगी ते सगळ्यांनी सरकारी पारितोषिकांवर सरसकट बहिष्कार टाकण्याच्या दुर्गाबाई भागवतप्रभृती मंडळीची भूमिका कशी चुकीची व एकांगी आहे हे सांगून, ज्यानी ज्यांनी या वर्षीपुरता, अंतुले सरकारच्या अनाठायी हस्तक्षेपाचा निषेध म्हणून, आपापले पुरस्कार शासनाला परत केले त्याचा मुक्तकंठाने गौरवही करतात. स्वायत्तता म्हणजे सन्यास नव्हे. दर वेळी तुकारामाना वेठीला धरणे बरोबर नाही. तुकारामांना विठ्ठलाची भेट हवी होती. त्यासाठी ते घरदार सोडायलाही तयार होते; मग शिवाजीमहाराजांकडून आलेली मानवस्त्रे त्यानी परत पाठवली, बोलावणे येऊनही तुकाराम शिवरायाच्या भेटीला गेले नाहीत, यात आश्चर्य ते काय? उलट साहित्यनिर्मितीच्या अनक प्रेरणा असू शकतात. ईश्वराचे दर्शन, परमेश्वराची भेट ही काही साहित्य-निर्मितीची केवळ एकमात्र प्रेरणा नसते. मम्मटाने आपल्या काव्यप्रकाशात किती तरी प्रेरणा दिलेल्या आहेत. त्या सर्व आजच्या काळालाही लागू पडतात. काव्य म्हणजे साहित्य, यशासाठी, पैशासाठी, व्यवहारज्ञानासाठीही असते जसे ते आनंदासाठी, सौंदर्यनिर्मितीसाठीही असते. अशा विविध प्रवृत्तीतून, प्रेरणांतून निर्माण होणारे साहित्य व त्याचे निर्माते तुकारामांसारखे पूर्णतः नि.सग कसे काय राहू शकतील? कोणी कमिटयावर जाणार, कुणी पारितोषिकासाठी खटपटीलटपटी करणार, कुणी परदेशदौरे पदरात पाडून घेणार, तर कुणी जी. ए. कुलकर्णीसारखेही असणार! ज्याच्या त्याच्या पिंडप्रकृतीचा हा प्रश्न आहे. सब घोडे बारा टक्के धरून येथे कसे चालणार? तुकाराम-रामदासांवर कादवऱ्या लिहून विरुद्ध वागणारे साहित्यिकही आपल्यात आहेत व संतवाङ्मयावर एक अक्षरही न बोलता, अंतुले शासनाचा पुरस्कार केवळ परत करणारेच नाहीत तर, आपल्याला मिळालेल्या स्वाभिमान पारितोषिकाच्या रकमेतही स्वत.ची थोडी भर घालून, ही सगळी रक्कम बाबा आमटयांच्या कार्याला

किंवा इतर तत्सम उपक्रमांना देणारे तरुण व प्रौढ लेखक-समीक्षकही आपल्यात आज निघू शकतात. अशा ठिणग्यांतूनच निघाली एखादी मशाल तर निघेल. त्यासाठी. सरदारांनी सांगितली तशी जेवढी स्वायत्तमंडळे, शासनावर कमीत कमी अवलंबून राहणाऱ्या संस्था समाजात निर्माण होतील, चालू राहतील, हे पाहिले पाहिजे. या दृष्टीने 'साप्ताहिक सोबत'ने योजलेला स्वाभिमान पारितोषिकांचा उपक्रम चागलाच म्हणायला हवा. 'सोबत' संपादकांचे यासाठी अभिनंदन केले पाहिजे. तळेगावजवळचा भंडारा डोंगर आणि अकोल्याचे साहित्यसंमेलन ही दोनच टोके असायला हवीत असे नाही. मध्ये बरीच गावे, मुक्कामाची ठिकाणे लागतात. ती सगळी ध्यानात घेऊन साहित्यिक आणि सरकार यांच्यातील परस्पर संबंधांवर टीकाटिप्पणी केली पाहिजे. अतिरेकीपणा करून काय उपयोग? समाज काही अतिरेकावर चालत नाही ! □

आणि पौराणिक व्यासपर्वाचा मतीतार्थ तरी हाच नाही का ?

अती तेथे माती हे सागण्यासाठी व्यासांनी महाभारत लिहिले– सांगितले असेल का ?

भीष्माचे प्रतिज्ञापालन.... टोकाला जाऊन केलेले. यातून कुलसंहाराकडे नेणाऱ्या घटना घडत जातात.

कर्णाचे दानशूरत्व. युद्ध जिंकणे महत्त्वाचे की आपल्या दानशूरपणाची कीर्ती जपणे महत्त्वाचे याचा विवेकच कर्णाने केला नाही व आपली कवचकुंडले भावनेच्या भरात दान करून टाकली !

दुर्योधनाचा आंधळा पांडवद्वेष.

डोक्याला कायम पट्टी बांधून राहणारी राजमाता.

टोकाला जाऊन द्यूत खेळणारा धर्मराज.

सूडाच्या भावनेने तगमगणारी द्रौपदी.

महाभारतातली बहुतेक माणसं टोकाला जाऊन वागणारी वाटतात.

महाभारत हा सूडाचा प्रवास असेल किंवा नसेल; पण तो टोकाला जाऊ पाहणाऱ्या माणसांचा प्रवास नक्कीच वाटतो.

गुणच टोकाला नेल्यामुळे अवगुण ठरले व शेवटी संहार घडला.

तो काळ पूर्वीचा असेल.

पण माणसे थोडीच बदलतात ?

म्हणून आजही व्यासपर्वं वाचण्याची आवश्यकता आहेच ! □

---

पुणे वार्ता

## हरे कृष्ण पंथाचा महोत्सव

### भगवान रजनीशांना नव्हे आव्हान

शनिवार, ता. १६ मे ! पुण्यातल्या एस. पी. कॉलेजच्या ग्राउंडवर एकच झुबड उडालेली. टाळ-मृदुगाचे आवाज बऱ्याच लांबूनही कानी येत होते. थोडं जवळ जाऊन पाहिलं. फुलांनी व कापडी ध्वज-पताकानी सजवलेला एक उत्कृष्ट रथ मैदानात उभा होता. काहीजण अजूनही रथाची सजावट करत होते. अनेकजण रथापुढे टाळ-मृदुग वाजवत नाचत होते. देव-देवतांच्या व एका स्वामीजीची मूर्ती रथावर ठेवण्यात आली. भव्य रथयात्रेला प्रारंभ झाला. अग्रभागी पत्रकं आणि प्रसाद वाटणारे स्वयंसेवक, नंतर टाळ-मृदुगांच्या साथीनं चाललेला नामघोष, त्यामागं पुण्यातल्या ज्ञानप्रबोधिनी प्रशालेचं दिंडी-पथक. टिळकरोड, लकडी पूल, डेक्कन जिमखाना, लक्ष्मी रोड, बाजीराव रोड अशा शहरातल्या प्रमुख रस्त्यांवरून ही रथयात्रा गेली. रस्त्याच्या दोन्ही बाजूना उभ्या राहिलेल्या हजारो पुणेकरांनी हा रथयात्रेचा सोहळा पाहिला. लक्ष्मी रोडवर तर गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीच्या वेळी असते तशी गर्दी होती ! यात्रा पुन्हा एस. पी. कॉलेजच्या मैदानावर आली.

'इंटरनॅशनल सोसायटी फॉर कृष्ण कॉन्शिअसनेस' (इस्कॉन) या हरे कृष्णपंथीय संघटनेचा महोत्सव सोळा तारखेला पुण्यात सुरू झाला. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी ही रथयात्रा काढण्यात आली. 'इस्कॉन'च्या आंतरराष्ट्रीय वार्षिक महोत्सवाचा हा एक भाग आहे. अशाच तऱ्हेचा महोत्सव सध्या जगात सॅनफ्रान्सिस्को, लॉस-एंजेलिस, न्यूयॉर्क, शिकागो, लंडन, पॅरिस, झुरिच, रोम, सिडनी, टोकियो, मुबई आणि कलकत्ता या बारा शहरामध्ये होत आहे.

पुण्यात माडीवाले कॉलनीतून गणेशखिंड रस्त्याकडे जाण्यासाठी वळलं की त्याच रस्त्यावर महापालिका आयुक्ताच्या बंगल्याजवळ या हरे कृष्ण पंथीयांची पुण्यातली शाखा आहे. 'इस्कॉन'चं भाषातर त्यांनी 'आंतरराष्ट्रीय श्रीकृष्ण भावनामृत संघ' असं केलं असून या हरे कृष्ण प्रचारमोहिमेत सामील होऊ इच्छिणाऱ्यांनी किमान पुढील चार नियमांचं पालन केलं पाहिजे, अशी हरे कृष्ण पंथाची अट आहे. हे चार नियम असे १) मास, मासळी, अंडी यांचे सेवन करू नये. २) चहा, कॉफी, विडी, सिगरेट, भाग, गाजा, चरस, दारू यासारख्या मादक पदार्थांचे सेवन करू नये. ३) स्त्रियांबरोबर गैरवर्तणूक करू नये. ४) रेस, मटका, जुगार खेळू नये.

हे सारंच कुतूहल वाढवणारं होतं. कारण हरे कृष्ण पंथाची स्थापना जरी भक्तिवेदात स्वामी प्रभुपाद या भारतीय तपस्व्याने केली असली तरी आज या पंथाची बहुतेक सर्व सूत्रं परदेशी भक्तांच्या ताब्यात आहेत. भगवं धोतर, भगवी बंडी घालणारे, डोक्याला घेरा ठेवून शेंडी ठेवणारे आणि, अंगाला गोपीचंदन फासणारे हे परदेशी भक्त या पंथाबद्दल निश्चितच जास्त कुतूहल निर्माण करतात.

म्हणूनच दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा जाऊन हरे कृष्ण पंथाच्या एका ज्येष्ठ स्वामीजीची भेट घेतली. त्यांचं वय चाळीस-पेक्षा जास्त नसावं. इतर कृष्णपंथीयाप्रमाणेच यांनीही भगवं धोतर, बंडी, डोक्याला घेरा, गोपीचंदनाचे लेप असा अवतार केला होता. गोऱ्या साहेबांचं हे रूप फारच 'गोजिरं' होतं. नाकावर ओघळणारा चष्मा सावरत स्वामीजी बोलू लागले–

'आम्ही शास्त्रावर आधारित तत्त्वज्ञानाचा स्वीकार केला आहे. माणसानं स्वतःचं निराळं अस्तित्व विसरून ब्रह्मतत्त्वाशी एकरूप होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ईश्वराचं ज्ञान ध्यान, योग आणि भक्ती या तीन मार्गांनी होतं. त्यापैकी भक्ती हा सर्वांत श्रेष्ठ मार्ग असून ध्यान व योग हे पायाचे दगड आहेत. ध्यानामुळे 'ब्रह्मन्' ची जाणीव होते, योगामुळे 'परमात्मा' (विष्णु) जाणवतो, तर भक्तीमुळे साक्षात 'भगवाना'ची (कृष्ण) भेट घडते. अर्थात हे सर्व करताना कोणत्याही भौतिक सुखाची अपेक्षा न ठेवता ईश्वराला प्रिय असणाऱ्या गोष्टी करणे, त्याची भक्ती करणे अभिप्रेत आहे.

'भगवान कृष्णाची भेट घडण्यासाठी संन्यास घेण्याची गरज नाही. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम या चार आश्रमामागं 'आश्रय' (shelter) ही सकल्पना दडलेली आहे. ही आश्रयाची छाया कोण धरतं? अर्थात भगवान श्रीकृष्ण! त्यामुळं चारही आश्रमात तो तुमच्याबरोबर असतो. त्याला भेटण्यासाठी खास सन्यास घेऊन ध्यानधारणा करण्याची आवश्यकता नाही!

'पुनर्जन्मावर आमचा विश्वास आहे. जोपर्यंत तुम्ही श्रीकृष्णाला कायावाचामने करून शरण जात नाही तोपर्यंत तुम्हाला जन्म घ्यावेच लागणार! म्हणून त्याला शरण जाऊन माणसानं मुक्ती मिळवावी, असं आमचं आवाहन आहे.

'इतर धर्मातील महापुरुष आणि श्रीकृष्ण यामध्ये मुख्य फरक असा की, तो कोणी संत किंवा प्रेषित नाही. तो स्वत.च ईश्वर आहे. यशू ख्रिस्त हासुद्धा 'ईश्वराचा पुत्र' होता; ईश्वर नव्हता, हे या संदर्भात विशेष लक्षात घतल पाहिजे

'तुमचा कृष्ण जर दयाघन, करुणेचा सागर, भक्तावर प्रेम व कृपा करणारा असा असेल तर त्याच्या अनेक निस्सीम भक्तांना विविध प्रकारचे त्रास, संकटे का सोसावी लागतात?' असा प्रश्न स्वामीजीना विचारला तेव्हा ते लगेच म्हणाले, 'बाह्यतः त्यांना हा त्रास सहन करावा लागतो हे खरे आहे; पण त्याच्या अंतर्यामी सतत श्रीकृष्णाचं अस्तित्व असतं. त्यामुळं हा त्रासही ते सहज झेलू शकतात. पाडव राज्यारूढ झाल्यावर कृष्ण द्वारकेला परत निघाला तेव्हा कुंतीनं म्हटलं होतं की, जर कृष्णाच्या पदकमलाचं नित्य दर्शन होणार असेल तर या राज्य-वैभवापेक्षा मला अज्ञातवासातील जीवनच जास्त सुखद वाटेल!

कृष्णाची भगवद्गीता हाच आपल्या पंथाच्या तत्त्वज्ञानाचा पाया असल्याचं वारंवार सांगत स्वामीजी गीतेतील काही वचनंही म्हणून दाखवत होते.

हरे कृष्ण पंथीयाची पुण्यात शाखा यापूर्वीच स्थापन झाली असली तरी जाहीर स्वरूपात होत असलेला त्यांचा हा पहिलाच महोत्सव आहे. एक आठवडाभर चालणाऱ्या या महोत्सवात भजनं, कीर्तनं, व्याख्यानं, रामलीला व कृष्णलीलावरील नाटकं असा भरगच्च कार्यक्रम आखण्यात आला आहे. असंख्य पुणेकराची या कार्यक्रमाना गर्दी होत आहे. एस. पी. कॉलेजच्या मैदानावर महोत्सवासाठी भव्य मंडप घातला आहे, तसंच जागोजागी मोठी बॅनरं व पोस्टरं लावलेली आहेत. हरे कृष्ण पंथाचं तत्त्वज्ञान विशद करणारी पुस्तकं मडपाजवळच विक्रीसाठी ठेवण्यात आली आहेत. ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी हरे कृष्ण पंथानं कर्जतजवळ एक खेडेगाव दत्तक घेतलं असून त्या गावचा– 'गोकुळधाम' चा– विकास साधण्याचं कार्य सघटनेतर्फे चालू आहे.

जगात हरे कृष्णपंथाची सुमारे पावणेदोनशे देवळं आहेत. आतापर्यंत हजारो परदेशी नागरिक या पंथाचे अनुयायी झाले आहेत व कृष्ण-उपासनेला लागले आहेत. या पंथाच्या वाढीसाठी कोटघवधी रुपये खर्च केले जात आहेत.

□

भगवद्गीता आणि कृष्णाच्या आधारे पुण्यात भगवान रजनीश यांचा पंथ यापूर्वीच

मलपृष्ठ २ वर

मुक्ताफळे

# सारे जहाँसे अच्छा

माणसे प्रवासाला जातात. 'केल्याने देशाटन' अंगी चातुर्य येते असे म्हणतात. जे पैशाने श्रीमंत नसतात ते देशातल्या देशातच यात्रा किंवा वारी करतात. ज्यांच्याजवळ पैसा असतो ते परदेश प्रवास करतात. ज्यांच्याजवळ पैसा असतोच पण तो आला कुठून हे सांगणे कठीण असते ते तर मनःस्वास्थ्यासाठी परदेशातच जातात. आपले अंतुले, आपले शरद पवार हे परदेशात निघालेले आहेतच.

आता प्रवास म्हटला की बहुतेकाना प्रवासवर्णन लिहावेसे वाटते. 'आमचा दक्षिण हिंदुस्तानचा प्रवास' किंवा 'आमचा उत्तर हिंदुस्तानचा प्रवास' या दोन प्रमुख गटात भारतात प्रवास करणाऱ्याचे ग्रंथ प्रमुखत: निर्माण होतात. आम्ही सर्वच प्रवासवर्णने हौसेने वाचतो. कारण All we know is that we read अशी आपली सर्वांची अवस्था असते. या प्रवासवर्णनांपैकी भारतातील प्रवासाची जी पुस्तके असतात ती वाचताना आमचा आनंद द्विगुणित होतो. कारण हिमालयातील किंवा कन्याकुमारीकडील निसर्गवर्णने सोडली तर सर्व हिंदुस्तानात माणसे आपल्याप्रमाणेच अतिशय गलिच्छ, सामान्य सामाजिक स्वच्छतेविषयी उदासीत आणि वायफळ धार्मिक विधी कसल्याही घाणीत उरकणारी आहेत, हे वाचून सहवेदनेचा आनंद होतो.

परंतु परदेशप्रवासाची पुस्तके वाचताना पदोपदी मानसिक त्रास होतो. मराठी भाषेत इंग्लंड, अमेरिका, युरोप या ठिकाणी रोज दोन-तीन जंबो भरभरून शेकडो माणसे जात-येत आहेत. यात काही लेखक, समाजशास्त्रज्ञ, विचारवंतही जातात. काही प्रवासाला म्हणून, काही सरकारी काम दाखवून, काही अभ्यासासाठी आणि आल्यावर प्रवासातील अनुभवाची पुस्तके लिहितात.

आता आम्ही कशाला लंडनला नाही तर अमेरिकेला जातोय? आमच्या बुद्धिमत्तेची

तिकडे कुणाला गरज नाही आणि मजेत मनः स्वास्थ्यासाठी जावे असा पैसा वडिलानी मिळवला नाही. राजकारणात न पडल्याने जमा करणे जमले नाही. म्हणून मग आम्ही ही परदेशप्रवासाची पुस्तके मुद्दाम मिळवून वाचतो,

आमचे एक परिचित प्राध्यापक ना. ल. वैद्य याचे 'लंडनची पत्रे' हे नामी पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आणि ते आम्ही वाचले. पुस्तकाच्या प्रस्तावनेत आमचे मित्र सुप्रसिद्ध विनोदी लेखक बाळ गाडगीळ म्हणतात–

'प्रा. वैद्य हे हाडाचे शिक्षक आहेत. त्याचा स्वाभिमान त्यांच्या देशाभिमाना–इतकाच लखलखीत आहे–इंग्रजांच्या लोकशाहीचे प्रा. वैद्य याना फार आकर्षण आहे. या आदर्शापासून भारतीयाना खूप शिकण्यासारखे आहे असे त्यांना वाटते ...'

वस्तुतः प्रस्तावनाकारांनी स्पष्ट इशारा दिलेला असताना, आम्ही हे पुस्तक वाचायलाच नको होते. पण वाचनाचा मोह नडतो बघा ! त्यात प्राध्यापकांची शैली पत्ररूपात असल्याने बहारदार वाचत गेलो–

'मोटारीने प्रवास करणे इंग्लंडमध्ये फारच सुखाचे असते. रस्त्यावर पायी चालणारे नाहीत; गाई म्हशो, गाढवे, बकऱ्या, बैल, घोडे रस्त्यावर दिसणार नाहीत–रस्त्याने कुत्री पण दिसणार नाहीत. प्रत्येक कुत्रे कुणाच्या तरी मालकीचे असते कुत्र्याला शिकवलेले असते. रस्त्यावर विधी करायचे नाहीत हे त्याना ठाऊक असते.'

बाप रे ! थॅचरबाईंच्या देशात कुत्र्यांनीदेखील रस्त्यावर विधी करायचे नाहीत हे कुत्र्यांना ठाऊक असते ? कमाल आहे ! आपल्याकडे रस्त्यावर प्रामुख्याने सकाळी विधीमडळ भरते. सर्व प्रकारची जनावरे प्रामुख्याने रस्त्यावर हक्काने विधी करतातच, पण सकाळी सकाळी टेकडघावर फिरायला जाणारी माणसे वृत्तपत्रात पत्रे लिहितात– 'हनुमान टेकडीवर सकाळीच फिरायला जाणे कठीण झाले आहे. रस्त्याच्या दुतर्फा विधी करणारा पोराबाळाचा आणि स्त्रियाचा घोळका लाज आणतो!' आमचे म्हणणे हे काही इंग्लड नाही तियल्या कुत्र्यांना कळते ते इथे माणसाना कळत नाही. मग इतक्या लवकर लवकर उठून फिरायला जाताच कशाला ? चागली उन्हे वर आली की ९–९॥ वाजता फिरायला जावे कारण तोपर्यंत सर्वांचे प्रातर्विधी नक्की उरकलेले असतात आणि समजा, इंग्लडमधली कुत्रीदेखील शहाणी असली तर प्रवासवर्णनात या लेखकांनी ते लिहायचे कशाला ?

या प्रा. वैद्यांना एका शाळेत भेट देण्यासाठी पत्र आले. 'स्कूल रिलेशन्स ऑफिसर'ने पत्र लिहून शेवटी टीप दिली होती– This is a definite appointment; please telephone the school if you are unable to keep it. म्हणजे, भेटायला या सांगायचे आणि वेळेवर येवू शकत नसल्यास 'आधी कळवा' अशी धमकी पण द्यायची ! ही काय सरकारी कामाची पद्धत झाली ? आपला देश किती चांगला. सरकारी कचेऱ्यात पाटी असते. 'साहेब दर सोमवारी दुपारी ३ ते ४ तक्रारी ऐकण्यासाठी भेटतील.' जावे तो ३ ते ४ साहेब कचेरीत नसतातच. त्यांना वरच्या साहेबाने बोलावलेले असते. किंवा त्यांच्या घरी पाहुणे आलेले असतात. आलेल्या माणसालाही याचे फारसे काही वाटत नाही. तो बसतो बसतो– पाच वाजेपर्यंत साहेबाची वाट पहातो, कंटाळून निघून जातो. साहेबाच्या मनाला कधी ही गोष्ट खात नाही किंवा निघून जाणाऱ्याच्याही, यात काय वावगे घडते असे मनात येत नाही. मंत्री वगैरे तर सायंकाळी सहाचा कार्यक्रम असला तर ८-८॥ पर्यंत डुलत डुलत उगवतात. थॅचरबाईंना म्हणून आपल्या देशात काळी माणसे आता आणखी नको आहेत; परंतु तिचा हा वर्णद्वेष आपण भारतीयांनी मुळीच सहन करता कामा नये !

ही थॅचरबाई ज्या इंग्लंड देशाची पंतप्रधान आहे तिथे मुसलमानाना नमाज पढायला म्हणे शुक्रवारी रजा देत नाहीत. प्रा. वैद्यानी इफ्तिकार अहमद या शिक्षकाची हकिगत दिली आहे. वर्गात पोरं तशीच वोबलत ठेवून हा शिक्षक शुक्रवारी आपला नमाज पढायला– दोन तास पशार व्हायचा ! शाळेने त्याला नोटीस दिली की, असे कराल तर काढून टाकू ! धर्मनिष्ठ अहमद काय ऐकतो ? गेला कोर्टात. अर्ज दिला– 'माझ्या धार्मिक स्वातंत्र्यावर घाला पडला आहे !' न्यायमूर्ती लॉर्ड डेनिंग हा थॅचरबाईला सामील. त्याने निर्णय दिला–

'बहुसंख्य समाजापेक्षा निराळे अधिकार मुसलमान समाजाला वा अन्य समाजाला देणे ही अयोग्य गोष्ट आहे. प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्याचा आदर ठेवूनही, मी असा निर्णय देतो की, शैक्षणिक सस्थेच्या नियमात बसेल व शाळेच्या कराराशी सुसंबद्ध असेल, तेवढेच स्वातंत्र्य या शिक्षकाला घेता येईल !'

बिचारा इफ्तिकार ! शुक्रवारी आता फरारी होऊ शकत नाही आणि म्हणतो, कसला हा देश ! अरे सर्व धर्म समभाव आहे की नाही ? भारतात कसे, सरकारी कचेऱ्यांतून मुसलमान सेवक शुक्रवार म्हटला की दोन तास नमाजाला पसार ! सरकारने मुळी तशी सवलतच दिलेली आहे !

इंग्लंडमधला बॉबी हा कसा सौजन्यशील असतो, लोकाना तो कसा मदत करतो, इंग्रज माणसाची व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना कशी जाज्वल्य आहे, त्यापायी दुसऱ्याचे वर्तमानपत्र, मासिक वा पुस्तक तो कसा हाताने उचलून नेत नाही, लोकाच्या सामाजिक जबाबदारीच्या जाणिवा आणि स्वच्छतेचा आग्रह किती तीव्र आहे याची प्रा. ना. ल. वैद्य यांनी पुस्तकात इतकी स्तुती केली आहे की, थॅचरबाई आपल्या देशात काळे लोक नको म्हणते तेच योग्य वाटू लागते ! हा परिणाम चांगला का ?

आपल्याकडे वर्तमानपत्र उघडले तो सगळेजण थॅचरबाईच्या वर्णद्वेषावर रागावलेले. 'पुरे झाले आता आमच्या देशात काळे !' अशी स्पष्ट भूमिका मांडल्याबद्दल सर्व देशप्रेमी, देशभक्त भारतीयांचा संताप झालेला. या पार्श्वभूमीवर प्रा. वैद्याचे असे पुस्तक वाचताना किती मनःस्ताप झाला असेल याची सहृदय वाचकानी कल्पना करावी. प्रा. वैद्यासारख्या हाडाच्या शिक्षकाने खुशाल इंग्लंडला जावे; पण अशी मनःस्ताप देणारी प्रवासवर्णने तरी लिहू नयेत. कारण अशी वर्णने वाचली की वाटते थॅचरबाईंचे काय चूक आहे ? तिकडल्या कुत्र्यापेक्षाही आम्ही हीन आहोत ! सामाजिक गलिच्छपणा हा आमच्या रोमरोमात भिनलेला आहे– आणि एकदा असे वाटू लागले ना की देशभक्ती, राष्ट्रप्रेम, देशाभिमान वगैरे औषधाला तरी उरेल काय ?

असा मनःस्ताप झाला की मग आम्ही घरातच मोठ्याने देशभक्तीपर गीत म्हणतो–

सारे जहाँसे अच्छा— हिंदोस्ता हमारा !

—ग्यानबा

# साहित्य परिषदेच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने....

# ७५ वर्षांपूर्वीच्या मळेकर वाड्यात

म. श्री. दीक्षित

पुणे शहर हे महाराष्ट्राचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक केन्द्र म्हणून शिवकालापासून प्रसिद्ध आहे. सांस्कृतिक दृष्टया उत्तर पेशवाईपासून या शहराची भरभराट होऊ लागली आणि गतशतकाच्या उत्तरार्धापासून म्हणजे लोकहितवादी, म. फुले, चिपळूणकर आणि न्यायमूर्ती रानडे यांच्या विविध चळवळीपासून या शहरात संस्थारूप कार्याचा मजबूत पाया घातला गेला. इंग्रजी शिक्षणामुळे पश्चिम भारतात प्रबोधन युगाची प्रभात मुंबईत उगवली असली तरी त्या युगाचा माध्यान्ह पुण्यपत्तनीच झाला.

जुन्या विद्येच्या ठिकाणी विश्रामबागवाड्यात भावी डेक्कन कॉलेजची मूहूर्तमेढ रोवली गेली. १८४८ च्या सुमारास बुधवार वाड्यात नेटिव जनरल लायब्ररी (आजचे पुणे नगर वाचन मंदिर) सुरू झाली. १८७५ साली बुधवार पेठेतील भिडे वाड्यात वसंत-व्याख्यानमालेस आरंभ झाला. यामधी सार्वजनिक सभा गर्जू लागलीच होती. १८८५ ते ९५ या दशकात हिराबागेत सभा-संमेलने इत्यादींचा घुमधडाका चालू होता. कबुतरखाना, तुळशीबाग, मोरोबादादांचा वाडा, विंचूरकर वाडा, लकडी पुलानजीकचे विठ्ठलमंदिर-अशा किती तरी वास्तूमध्ये नवनव्या विचारांची प्रेरणी होत गेली. आज या वास्तू मूळ स्वरूपात अस्तित्वात नसल्या तरी त्या वास्तूंमध्ये पाऊणशे-ऐंशी वर्षापूर्वी जे घडले त्यामुळे समाजाचे पाऊल पुढे पडत गेले यात शंका नाही. अशा वास्तूभोवती आज जिज्ञासा वृत्तीने फिरत राहिलं की, तिथल्या जुन्यापुराण्या स्मृतिगंधाने मन मोहरून येतं.

पुण्याच्या सदाशिव पेठेत नागनाथ पारानजीक परवापरवापर्यंत-म्हणजे १९७५ पर्यंत मळेकरांचा सुप्रसिद्ध वाडा होता. बुधगावकर पटवर्धन या छोटया दक्षिणी संस्थानिकाची ही वास्तू. ती नेमकी केव्हा बांधली गेली हे सांगता येणं कठीण असलं तरी तिच्या एकंदर बांधणीवरून, पेशवाईअखेरच्या काळात ती उभारली गेली असावी असे वाटते. या उत्तराभिमुख वाड्याची दुमजली बांधणी मुख्यतः घोटीव दगडाची होती. भवतीभवती ऐसपैस मोकळी जागा. पूर्वी तिथे बागबगीचा, पागा आणि नोकर-चाकराच्या बैठया हवेल्या होत्या. समोरच्या फरसबंद दिंडीदरवाज्यातून आत शिरलं की, चौक नि चारी बाजूच्या ओवऱ्या लक्ष वेधून घेत. लाकडी नक्षीदार छतं, खांब, कठडे, जिने असणाऱ्या रुंद भिंती, महिरपी कोनाडे, झोपाळयाच्या कडया, कलाकुसरीची दारं-खिडक्या, हंडया-झुंबरांनी लगडलेली विविध दालनं अशी ऐतिहासिक वास्तूची सर्व अंगोपांग या मळेकर वाड्यास सुशोभित करत होती. वाईतील काही वाडे किंवा मेणवलीचा नाना फडणिसांचा वाडा ज्यांनी पाहिला असेल त्यांना या वाड्याची काहीशी कल्पना येऊ शकेल इथल्या दिवाणखान्यात श्रीमंत मळेकराच्या आगमनानिमित्त थोरा—मोठयाची नेहमी वर्दळ असायची. गत शतकाच्या उत्तरार्धात हा वाडा म्हणजे सार्वजनिक कार्याचा एक अड्डा बनून राहिला होता.

समाजधुरीणांचा नि विद्वानाचा अड्डा असलेला हा मळेकर वाडा आता अदृश्य झाला आहे. सुदैव एवढंच की शेवटची पाच-सात वर्षे माणूस साप्ताहिक व 'राजहंस प्रकाशन'चे कार्यालय या वाड्यातल्या त्या इतिहास—प्रसिद्ध दिवाणखान्यात होते व तळमजल्यावर 'माणूस साप्ताहिक' जेथे छापले जाते तो '*साप्ताहिक मुद्रण*' हा छापखानाही होता. मळेकर वाड्याच्या जागेवरच नव्याने उभ्या राहिलेल्या चिंतामणी गृहरचना संस्थेत हे तिन्ही उपक्रम स्थलांतरित झाले असल्याने पूर्वपरंपरा अगदीच खंडित झाली नाही. श्री. माजगावकर बंधू आणि श्री. ब. मो. पुरंदरे यांच्या पत्नी निर्मला पुरंदरे यांनी मळेकर वाड्यातील हाती लागलेल्या जुन्या हंडया 'माणूस' कार्यालयात जपून टांगून ठेवलेल्या दिसतात. लेखक आणि सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक लहान थोर मंडळींची इथे सारखी वर्दळ असते. मी जेव्हा जेव्हा माजगावकरांकडे गप्पा मारायला जातो तेव्हा प्रथम माझं लक्ष जातं ते तिथल्या विकेशा हंडयाकडे. त्या हंडया मला किती तरी जुन्यापुराण्या गोष्टी सांगून जातात!

पुण्याच्या टिळक रस्त्यावरील आमची महाराष्ट्र साहित्य परिषद आहे ना, ती परिषद पाऊणशे वर्षांपूर्वी या मळेकर वाड्यात जन्मली, हे आज सांगितलं तरी त्यावर सहसा कुणी विश्वास ठेवणार नाही. पण गोष्ट खरी आहे. १९०६ सालच्या मे महिन्यात, म्हणजे वसंत ऋतु सरतासरता या वाड्यात परिषदेची तुतारी प्रथम फुंकली गेली. कै. रा. सा. गोविंदराव कानिटकर (काशीबाईंचे यजमान) यांच्या अध्यक्षतेखाली मराठी ग्रंथकाराचं चौथं संमेलन दि. २६ व २७ मे (शनिवार-रविवार) रोजी वाड्याच्या दिवाणखान्यात भरलं होतं. ८ मे रोजीच्या 'केसरी' तील इहवृत्तात (स्थानिक कार्यक्रम) ह. ना. आपटे, न. चिं. केळकर आणि सी. के. दामले (केशवसुताचे बंधू) या तिघांच्या सहीने वार्ता प्रसिद्ध झाली की, 'भाषेबद्दल खरी कळकळ व लेखनाचा थोडाबहुत व्यवसाय केला आहे अशा गृहस्थांनी एकत्र जमून मराठी भाषेच्या उन्नत्यर्थ काय तजवीज करता येईल याची चर्चा संमेलनात होईल!' या प्रकटनानुसार ग्रंथकार मंडळी दोन्ही दिवशी मळेकर वाड्यात एकत्र आली आणि त्यांनी झालेल्या चर्चा नि मांडलेल्या सूचना-उपसूचना ध्यानी घेऊन दि. २७ मेच्या सायंकाळी 'महाराष्ट्र साहित्य परिषद' ही कायम स्वरूपाची संस्था स्थापन केली. हेतु हा की, या संस्थेमार्फत मराठी-ग्रंथकारांनी एकत्र बसून आपापले प्रश्न सोडवावेत आणि संशोधन, प्रकाशन, चर्चा-सभा इत्यादि माध्यमांद्वारे मराठीची सेवा करावी.

मळेकर वाड्यातील हे ग्रंथकार-संमेलन खरोखर ऐतिहासिक म्हटले पाहिजे. या संमेलनाला उपस्थित राहून त्यात भाग घेणा-

त्यांची नुसती नावं वाचली तरी संमेलनाचं महत्त्व कळून येईल. न. चिं. केळकर, काकासाहेब खाडिलकर, विसुभाऊ राजवाडे, राष्ट्रीय शिक्षणाचे कट्टर पुरस्कर्ते विजापूरकर, ह. भ. प. पांगारकर, चिंतामणराव वैद्य, ह. ना. आपटे, 'आनंद' कर्ते वा. गो. आपटे, ठाण्याचे वि. ल. भावे, ना. कृ. गद्रे, महादेव राजाराम बोडस, फर्ग्युसनचे प्रो. पानसे, उमरावतीचे अच्युतराव साठे, रेव्हरंड टिळक, फार काय लो. टिळकसुद्धा ! 'मासिक, पुस्तके व वर्तमानपत्रे यांच्या द्वारे मराठी भाषेची झालेली वाढ ' या विषयावर टिळकांचे एक भाषणही संमेलनात झाले.


शनिवारी मुंबई विद्यापीठाच्या अभिनंदनाचा ठराव चर्चेला आला तेव्हा रथीमहारथींत तुंबळ रण माजल्याची नोंद मिळते. ठराव का ? तर म्हणे मॅट्रिक परीक्षेसाठी मराठी विषय सक्तीचा केला म्हणून. मग बी. ए., एम्. ए. ला मराठी का नाही ? असे सवाल-जबाब उठले. तेव्हा हा ठरावच अनावश्यक व लाचार वृत्तीचा द्योतक आहे व तो ग्रंथकारांना कमीपणा आणणारा आहे, असा विजापूरकर आणि विसुभाऊ राजवाडे यांनी जोरदार युक्तिवाद केला. विद्यापीठरूपी मातेवर कर्झनने बलात्कार करून तिला भ्रष्ट केले असल्याने अभिनंदन नको, असे कर्झनशाहीत ठणकावून सांगणाऱ्या वरील मित्रद्वयापुढे मग कुणाचीच मात्रा चालली नाही. अखेर केळकरांना विद्यापीठाचे अभिनंदनही नको नि दोषदिग्दर्शनही नको असा सुवर्णमध्य सुचवून हा लाचार ठराव दप्तरी दाखल करावा लागला. (नेमस्त आणि जहाल हे पक्ष परिषदेच्या कारभारात आणि साहित्य-संमेलनाच्या मंडपात प्रथमपासून होते असे दिसते. )

२७ मे रोजी सायंकाळी साहित्य परिषद स्थापन झाल्याचे, वार्षिक एक रु. वर्गणीचे तिला साठ सभासद मिळाल्याचे आणि वा. गो. आपटे, कृष्णाजीपंत खाडिलकर, वि. ल. भावे हे तिथे तिचे चिटणीस नेमल्याचे केळकरांनी प्रकट करताच लो. टिळकांसह सर्वांनी त्या घोषणेचे साभिमान स्वागत केले. टिळकांनी अनुमोदन देणाऱ्या आपल्या भाषणात–' केवळ उत्कट इच्छेने कामे होत नसतात, तर कर्ते पुरुष पुढे यावे लागतात, ' असे उद्गार काढले. भावी कार्यकर्त्यांना उद्देशूनच जणू ते त्यांनी काढले असावेत ! कारण या आधी १८७८, ८५ आणि नंतर एकदम १९०५ अशी तीन ग्रंथकार-संमेलने नेमस्तांच्या नेतृत्वाने भरली होती; पण त्यामधून विधायक असे काहीच घडले नव्हते. संस्था म्हणजे संघटना, क्रियाशील, निरलस ध्येयनिष्ठांची चळवळ, पोकळ बडबड नव्हे हे टिळकांना अभिप्रेत होते. मळेकर वाड्यात जन्मलेल्या साहित्य परिषदेची जन्मकथा ही अशी आहे.

याच वाड्यात पुढल्या वर्षी रानड्यांचे सत्शिष्य रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी यांच्या अध्यक्षतेखाली पाचवे संमेलन भरले आणि आश्चर्य असे की, सौ. काशीबाई कानिटकर आणि सौ. काशीबाई हेरलेकर या दोन लेखिकांनी संमेलनात प्रथमच उपस्थित राहण्याचे धाडस केले. धाडस केले एवढेच नव्हे, तर त्या दोघींची संमेलनात भाषणेही झाली. १८८५ च्या सार्वजनिक सभेतील दुसऱ्या ग्रंथकार–संमेलनप्रसंगी दादोबांची कन्या अहिल्याबाई तर्खडकर ही एकमेव स्त्री उपस्थित झाली तेव्हा गोपाळराव आगरकरांनी प्रकटपणे कौतुक करून तिचे आभार मानले होते. १९०७ साली मळेकर वाड्यातील संमेलनास वरील दोन स्त्री-लेखिकांनी उपस्थित राहून अधिक धिटाई दाखवली; पण त्यासाठी २२ वर्षांचा काळ मध्ये जावा लागला. न्या. रानडे आणि आगरकर या वेळी असते तर त्यांना किती आनंद झाला असता !

इथे जाता जाता दोन गमतीदार योगायोग सांगायला हवेत. साहित्य परिषदेचे 'इतिहास 'कर्ते कै. द. वा. पोतदार १९०६ च्या संमेलनास प्रथम उपस्थित राहिले त्या वेळी ते सोळा वर्षांचे होते. राजवाड्यांचा कोट धरून ते मळेकर वाड्यात शिरले आणि त्यांच्या पाठीमागेच दोन दिवस बसून होते. मला ही गोष्ट त्यांनीच एकदा ऐकवली होती. अर्थात् तोंड उघडण्याची त्या काळात त्यांची शहामत नव्हती. १९०७ च्या मळेकर वाड्यातील दुसऱ्या संमेलनात राजवाड्यांनी संशोधित केलेल्या पत्रांचे प्रकाशन करण्यासाठी ५०० रुपये जमविण्यात आले व तोटा सोसून हे कार्य व्हावे असा ठराव मंजूर झाला. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने–खंड १० वा ' हे साहित्य परिषदेचे पहिले प्रकाशन असे झाले (१९०९) यावर आज ठेवील कुणी विश्वास ?

परंपरा कुठे निर्माण होईल, कुठे खंडित होईल याचा नेम नसतो हेच खरे. पुढे चार वर्षांनी भारत इतिहास संशोधन मंडळ स्थापन झाले तेसुद्धा मेहेंदळे वाड्यात. मळेकर वाड्यात साहित्य परिषद जन्मली, तर मेहेंदळे वाड्यात भा. इ. सं. मंडळ. अशा वास्तूंचे ठिकाणी महानगरपालिकेने खरे तर जुन्या स्मृतींना चिरंतन करणारे फलक लावायला हवेत. त्या वास्तू म्हणजे अभिमानास्पद ठेवा आहे. □



# उत्तरमीमांसा : ६ :

स. शि. भावे

## नव्या ग्रामीण साहित्यिक चळवळीची भूमिका ....नवे देशीकार प्रबोधन !

१९७७ च्या अखिल भारतीय साहित्य संमेलनानंतर लगेचच पहिला ग्रामीण साहित्यिकांचा मेळावा पुण्यालगत कोथरूड येथे भरला होता. त्यानंतर बोटा, जुन्नर व यंदा प्रवरानगर अशी तीन ग्रामीण साहित्यसमेलने साजरी झाली.

चार वर्षे गेली. चार संमेलने झाली. तरीही ग्रामीण साहित्यिक चळवळीचा वेगळेपणा अद्याप स्पष्ट झालेला नाही.

अर्थात, हा काही दोष म्हणता येणार नाही. नाही तरी, कोणतीही चळवळ आधी सुरू होते आणि नंतर तिचे तात्त्विक व्यक्तिमत्त्व आकाराला येते.

एक मात्र खरे. आता चार वर्षांनंतर अशी वेळ आली आहे की, ग्रामीण साहित्यिक चळवळीची भूमिका नेमकेपणाने आणि वेगळेपणाने व्यक्त व्हावयाची ती आताच व्यक्त झाली पाहिजे. अधिक उशीर आता खपणार नाही. जसजसा उशीर होईल तसतसा चळवळीचा पीळ ढिला पडेल; चळवळ सैल आणि विस्कळित होईल. जुन्या कार्यकर्त्यांचा भक्कमपणा टिकणे आणि नवे कार्यकर्ते चळवळीला मिळणे हे थाबेल.

आत्ताच हे होऊ लागले आहे की काय, अशी शंका, प्रवरानगर येथील संमेलनातील उद्‌गारावरून तरळू लागलेली आहे.

प्रवरानगरच्या चर्चेत दलित साहित्यिकानी परखडपणे विचारले, 'ग्रामीण साहित्याची तात्त्विक भूमिका कोणती ? जशी दलित साहित्यामागे प्रस्थापित धार्मिक जुलूम, जातपोटजातबदीचा जुलूम किंवा अस्पृश्यतेच्या परंपरेचा जुलूम—असे जुलूम उखडून टाकण्याची स्पष्ट भूमिका आहे, तशी ग्रामीण साहित्याचीही, एखादा जुलूम उखडून टाकण्याची भूमिका आहे का ? पांढरपेशा साहित्याची परंपरा तुम्हाला मोडून काढायची आहे का ? मग परंपरेविरुद्ध लढणाऱ्या चळवळी म्हणून दलित आणि ग्रामीण, आपण एक होऊ या आणि ग्रामीणतेचा वेगळेपणा सागायचा असेल तर दलित चळवळ आणि पांढरपेशी परपरा या दोन्हीपेक्षा ग्रामीण चळवळ वेगळी कशी हे सांगा.'

दलित साहित्यिकांनी विचारलेल्या प्रश्नाचे समाधान प्रवरानगरला काही होऊ शकले नाही. दोन-तीनदा चर्चा झाली. शेवटच्या दिवशी तर खुली चर्चा झाली पण या प्रश्नाचे उत्तर एकदाचे सापडले असे काही झाले नाही.

ग्रामीणांपैकी नवोदितांच्या अडचणी म्हणून ज्या मांडल्या गेल्या त्या नेहमीच्याच अडचणी होत्या. चांगल्या नियतकालिकात प्रसिद्धी मिळत नाही, चांगले प्रकाशक पुस्तके प्रकाशनासाठी घेत नाहीत, पुण्या-मुंबईकडील प्रकाशक नीट वागत नाहीत—कधी कधी फसवतातही. या अडचणी इतर नवोदितांपुढे असतात तशाच होत्या. त्याची उत्तरेही तशीच होती. म्हणजे प्रस्थापितानी नवोदिताना दिलेली उत्तरे जशी असतात तशी होती. म्हणजे—आम्ही याच अडचणीतून गेलो आहोत. नवेपणात हे असतेच. पण खरा गुण कधी झाकला राहात नाही. तेव्हा चागले लिहा. यश तुमचेच आहे. वगैरे वगैरे.

नवोदिताना स्वतःला सुचणारे विचारही इतर नवोदितांसारखे होते. मंडळ सुरू करणे, परस्पर साहित्यवाचन करणे, सहकारी तत्त्वावर प्रकाशनसंस्था काढणे. मग एक-दोन छोटी प्रकाशने. म्हणजे बहुधा कवितासंग्रह. कारण ते परवडतात. शिवाय कवी फार रॉयल्टी मागत नाही—मग प्रकाशन समारंभ. त्या वेळी एखादे चर्चासत्र किंवा एखादा परिसंवाद—म्हणजे जशी शहरातली नवोदितांची हालचाल तशी ग्रामीण नवोदिताची हालचाल. यात अर्थात् सारे अनुकरणच असते. यात कसली वेगळी चळवळ उभी राहणार ?

प्रवरानगरला अशा नवोदित मंडळीपैकी मोजक्या मंडळीनी विचार करायला लावणारे काही प्रश्न विचारले. हे प्रश्न ग्रामीण साहित्यिक चळवळीला उद्देशूनच विचारलेले होते.

एक प्रश्न असा होता की, ग्रामीण साहित्यात खानोलकर, चित्रे अशा अव्वल दर्जाचे साहित्यिक अधिक प्रमाणात का निर्माण होत नाहीत ? गेली चार वर्षे आणि त्याआधीही, त्यांच्यासमोर आदर्श म्हणून असलेले डॉ. आनंद यादव प्रवरानगरलाही त्याच्यासमोर होते; पण एकटे आनंद यादवच तेवढे अव्वल दर्जाचे अशी स्थिती किती काळ धकेल, असे प्रश्न विचारणाराच्या मनात असावे. या प्रश्नाचा आणखी एक पैलू असा आहे की, कोणत्याही साहित्यिक प्रवाहात अव्वल दर्जाचे आणि अस्सल कलानिर्मिती करणारे भरपूर साहित्यिक असल्याशिवाय तो प्रवाह प्रभावी होत नाही. नवकथा व नवकविता हे प्रवाह प्रभावी झाले ते मोठ्या संख्येने आणि मोठ्या गुणवत्तेने नवकथा आणि नवकविता लिहिली गेली म्हणून. हा प्रश्न ऐकताना मनात एक पोटप्रश्न खुपत होता— माडगूळकर, शंकर पाटील, मिरासदार आणि आनद यादव याखेरीज गेल्या पंचवीस वर्षांत अव्वल गुणवत्तेचे ग्रामीण साहित्यकार का बरे पुढे येऊ नयेत ?

आणखी एक गमतीदार प्रश्न अनौपचारिक चर्चेत विचारला गेला. सुमती लांडे या कवयित्रीच्या काव्यवाचनाला, दया पवाराच्या अध्यक्षतेखाली जे काव्यवाचन झाले, त्यात पुरस्कार मिळाला. या कवयित्रीच्या कविता चागल्या आहेत, वेगळ्या आहेत. अव्वल नियतकालिकात त्या सहज प्रसिद्ध व्हायला तशी काहीच दिसत हरकत नाही. या कवयित्रीचा प्रश्न असा होता, 'मी ग्रामीण भागात राहते, पण माझी कवयित्री म्हणून अनुभूती शहरीच म्हणावी लागेल. कवितेच्या वाचनाचा संस्कार लक्षात घ्यायचा तर हा संस्कार माझ्यावर सध्याच्या शहरी कवितेचाच आहे. मग म झी कविता ग्रामीण म्हणायची की नाही ?'

एकूण काय, तर ग्रामीण म्हणून नेमके कशावर बोट ठेवावे हा प्रश्न एक मोठा प्रश्न होऊन राहिला आहे.

कलेच्या गुणवत्तेची मूल्ये ग्रामीणांची काही वेगळी आहेत काय? चर्चेत पत्ता लागला की, तसे काही नाही.

अनिल अवचटानी एक मार्ग सुचवून पाहिला. ते म्हणाले, यांत्रिकता आणि सुधारणा यामुळे ग्रामीण भागात ज्या नव्या समस्या उभ्या राहत आहेत, त्यांचे चित्रण करण्यातून नवे ग्रामीण साहित्य निर्माण होईल.

यात एक प्रश्न उरतो. अवचटानी तो चर्चेत स्पष्टपणे मांडला नाही. तो असा की ग्रामीण विभागात जी नवी प्रस्थापित सत्ताकेंद्रे उभी राहत आहेत, त्यांच्याबाबत ग्रामीण साहित्याची भूमिका क्रांतिकारक आहे की नाही? की मध्यमवर्गीय पांढरपेशा परंपरेला विरोध करता करता ही चळवळ ग्रामीण सत्ताकेंद्रांची फक्त सेवा करीत राहणार?

आज खुद्द दलित चळवळीलादेखील याचा विचार करावा लागतो आहे. पांढरपेशांची परंपरा आमची नव्हे, हे म्हणणे ठीक आहे. आजवरची मध्यमवर्गीय साहित्यिक जाणीव आता बदलली पाहिजे, ही हाकही ठीक आहे; पण ग्रामीण विभागातील प्रस्थापित सत्ताकेंद्रांना आडवे जाणे परवडत नाही, हा अनुभव त्याना मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरप्रकरणी आला, त्यानंतरही सतत येत आहे. जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, पाटिलकीचे वतन, सहकारी कारखाने, नव्या शिक्षणसंस्था या बहुमुखी, ऑक्टोपससारख्या प्रस्थापिततेशी लढा देणे सोपे नाही, ही जाणीव झाल्यामुळेच आज दलित चळवळ ठिकठिकाणी थंड होते आहे, असे दृश्य बघावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर ग्रामीण चळवळ कशी काय वेगळी राहणार? वेगळी राहू शकेल का? की थोडा काळ वेगळपणा टिकविण्याचा प्रयत्न करून योग्य वेळी ती मराठी साहित्याच्या व्यापक प्रवाहात मिळून जाणार?

या प्रश्नाचा काही सैद्धान्तिक आणि काही ऐतिहासिक विचार करणे जरुरीचे आहे.

सैद्धान्तिक विचार सरळ आहे आणि सर्वमान्यही आहे. ग्रामीण हे काही साहित्याचे मूल्यमापन करणारे बिरुद नव्हे. ग्रामीण साहित्य चांगले साहित्य असायचे तर त्यात साहित्यिक गुणवत्ता असायला पाहिजे.

साहित्यिक गुणवत्ता शहरी वेगळी, ग्रामीण वेगळी असे म्हणता येणार नाही. प्रतिभेची नवनिर्मिती, नवीन अनुभवाची निर्मिती, कल्पनाशक्तीचा त्यासाठी उपयोग, निवड, काटछाट इ. निर्मितिकौशल्य, भाषेवर कलावंताने स्वतःचा ठसा उमटवून तिचे शैलीत रूपांतर करणे—या बाबी कोठल्याही साहित्यविचारात समानच असणार. शहरातला गणपती वेगळा आणि ग्रामीण वेगळा असे शिल्पकलेच्या दृष्टीने असू शकणार नाही. शहरी मूर्तीचे ध्यान व ग्रामीण मूर्तीचे ध्यान वेगवेगळे असेल; पण मूर्तिकलेच्या कला दोन्हीकडे त्याच त्या असणार. जो न्याय शिल्पकलेला तोच साहित्याला.

प्रतिभागुणाने ही जी नवनिर्मिती व्हावयाची तीसाठी अलिप्तता हा गुणदेखील जसा शहरात तसाच खेड्यात आवश्यक आहे. ही अलिप्तता खाडेकरांना साधली नव्हती. म्हणून शहरी असूनही त्याच्या साहित्यातील गुणवत्तेला बाध आला. ग्रामीण लेखकाला जर ही अलिप्तता साधली नाही तर त्याचेही साहित्य गुणवत्तेने कमी प्रतीचे होईल. त्याची ग्रामीणता त्याला वाचवू शकणार नाही.

साहित्यातील भाषेचे तसेच. ग्रामीण भाषाच काय, जी कोणती बोली लेखकाला योग्य व आवश्यक वाटेल त्या वळणात किंवा त्या भाषेत लेखन करावे. यात वाद असण्याचे कारणच नाही; पण केवळ अमुक एका भाषेच्या वळणात किंवा अमुक एका बोलीत लिहिले म्हणून ते लेखन उच्च कसे होईल? त्या बोलीच्या कलात्मक उपयोगात लेखकाचा स्वतःचा ठसा उमटला आहे की नाही, ही कसोटी त्या भाषेला लावावी लागेलच. या कसोटीला ती भाषा उतरली तर लेखन उत्तम ठरेल. अन्यथा ग्रामीण भाषा असूनही लेखन चांगले ठरणार नाही.

एवंच, साहित्य म्हणून जो काही विचार व्हायचा तो ग्रामीण साहित्याचा साहित्य म्हणूनच होणे उजू होईल. मला वाटते, खऱ्या लेखकालाही हाच विचार पटेल. केवळ ग्रामीण लेखक म्हणून नोंदल्या जाणं कोणा लेखकास रुचेल? व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार याना श्रेष्ठ मराठी लेखक म्हणून मान्यता आहे तीच योग्य आहे. स्वतः आनंद यादव यांनादेखील गुणवान लेखक म्हणून मान्यता आहे, हेच योग्य आहे. याऐवजी केवळ ग्रामीण असा मर्यादित शिक्का यावर मारू पाहू तर ते योग्य तर होणार नाहीच, शिवाय ते त्या त्या लेखकांसही मानवणार नाही.

तेव्हा सैद्धान्तिक दृष्टीने पाहता, शहरी व ग्रामीण असा फरक करणे न्यायाचे होणार नाही.

ऐतिहासिक दृष्टीने मात्र 'ग्रामीणते'च्या प्रवाहाचा वेगळा विचार करता येतो आणि साहित्याचा सांस्कृतिक विचार करताना असा वेगळा करणे इष्टही होईल.

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिकेच्या ग्रामीण साहित्य विशेषांकात आनंद यादव यांनी ग्रामीण ऐवजी देशी हा शब्द संपादकीयात सुचविला आहे.

आता देशी या शब्दाला मराठी सांस्कृतिक इतिहासात खास वेगळा असा अर्थ आहे. देशी म्हणजे येथला, मूळचा. देशी म्हणजे सर्वसाधारण रयतेचा. देशी म्हणजे अनागर. देशी म्हणजे विषमतेवर आधारलेल्या संस्कृत परंपरेच्या वर्चस्वाला विरोधी. 'देशीकार लेणे' या स्वाभिमानाच्या भावनेनेच अवतरले आहे.

महानुभावांच्या आणि संतांच्या साहित्यात या देशी पिंडाचा स्वाभिमानी हुंकार आहे. पंडित कवी मात्र संस्कृताशी अनुकरणाने बांधलेले होते. नंतर शाहिरानी या देशी मनःपिंडाच्या समकालीन, आक्रमक व उपभोगी वृत्तीचा आविष्कार घडविला. आग्लाईत पुन्हा या देशीपणाला ग्रहण लागते की काय, अशी भीती उत्पन्न झाली. या नव्या आंग्लशूद्राना विरोध करताना महात्मा जोतिबा फुले आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर समान भूमिकेवर येतात, पुढे तेल्या-तांबोळ्यांचे पुढारी लोकमान्य टिळक स्वतःच्या लेखनात या दोघांचा कित्ता गिरवतात हे आवर्जून लक्षात घेण्याजोगे.

फुले–चिपळोणकरांचे व टिळकांचे हे देशी वळण केळकरयुगात टिकले नाही. केळकर-

युगातले नवमतवादी साहित्यिक आणि नंतर मर्ढेकरयुगातले नवसाहित्यिक यांनी गेली पन्नास-साठ वर्षे ते अव्हेरले आहे.

या गेल्या पन्नास-साठ वर्षांत देशी वळणाची पहिली ताजी झुळुक श्री. म. माटे यांच्या लेखनातून आली. या देशी वळणाचे महत्त्व माटयांना इतके आणि इतके मनोमन पटले होते की, त्यांनी आपली शैली प्रयत्नाने देशी बनवली होती. माटयानंतर त्याच्यापेक्षाही ताकदीचा आणि देशी वळणाची मिजास आणि देशी वळणाचा खास निरागसपणा घेऊन आले ते व्यंकटेश माडगूळकर. काळयाशार जमिनीवर, गर्द आंब्याच्या झाडाच्या सावलीला पसरावे तसे त्याचे सुरुवातीचे लेखन वाचताना वाटले मात्र. लगेच बनगरवाडीत देशी दुःखाचा रखरखीत उन्हाळा त्यानी तापवला. मग आले शंकर पाटील. देशी नाटयमयता घेऊन आले मिरासदार. देशी खालमुंडी विनोद घेऊन आले आनंद यादव. खास शेतकऱ्याच्या पंचेंद्रियाचा अनुभव घेऊन. (पत्रकारात महाराष्ट्र टाइम्सचे गोविंद तळवलकर देशी शैली उत्तम योजीत आहेत.)

हा इतिहास जरा लांबला खरा; पण ते जरूर होते. मराठी मुलुखाच्या इतिहासाचे सूत्र हे. देशी आणि पारंपारिक यांचा झगडा. प्रस्थापित हे नेहमी पारंपरिक असणार. मग परंपरा संस्कृत असो की इंग्रजी असो. या परंपरेला सतत विरोध आणि स्वतःच्या खास पिंडाची जोपासना ही आपली खास देशी परंपरा.

स्वातंत्र्यानंतर आणि विशेषतः महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर प्रस्थापितांचा परंपरावादच प्रभावी ठरतो आहे. आनंद यादवांना खंत वाटताना दिसते ती या नव्या आंग्लशूद्रांची. हा विषय आणि हा प्रयत्न केवळ साहित्यिक नाही. तो व्यापक अर्थाने सास्कृतिक आहे. अनेक वेळा, अनेक प्रश्नांना उत्तरे देताना यादवाचा स्वतःशीच विचार चाललेला असतो. या चळवळीचे हे व्यापक सास्कृतिक रूप त्यानी आणि आपण, मान्य करावयास हवे.

स्वातंत्र्यानंतरच्या प्रबोधनाचा हा दुसरा टप्पा आहे स्वातंत्र्यानंतरची पंधरा वर्षे शिक्षणप्रसारात उपयोगी आली. १९६० नंतरच्या दहा-पंधरा वर्षांत ग्रामीण भागात नव-उच्च-शिक्षित मंडळी तयार झाली आहे. ६३ साली शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेने ही दुसरी पायरी सुरू झाली. तिचे एक फळ दलित साहित्याच्या रूपाने, तर दुसरे नवीन ग्रामीण सांस्कृतिक जाणिवेच्या रूपाने तयार झाले आहे.

नवीन ग्रामीण साहित्यिक चळवळ ही नवीन ग्रामीण सांस्कृतिक जाणिवेची चळवळ आहे.

ही नवी ग्रामीण सास्कृतिक-साहित्यिक चळवळ आधुनिक परंतु पर-अनुकरणी, मध्यमवर्गीय, आदर्श पाळू इच्छीत नाही.

ही नवी चळवळ असे मानते की, सध्याचे मध्यमवर्गीय आदर्श केवळ पर अनुकरणी आहेत. इतकेच नव्हे तर ते पर-अनुकरणही मन पूर्वकतेने आलेले नाही, तर अगतिकतेतून आले आहे

ही नवी चळवळ असे मानते की सध्याची ही मध्यमवर्गीय वृत्ती मराठी प्रबोधनाला घातक आहे.

मराठपणाची देशी वृत्ती कायम राहून मग जर आधुनिकतेचा स्वीकार झाला तर तो आधुनिकता मराठी समाजाला पोषक ठरेल, एरवी नाही. परवापरवापर्यंत आतरराष्ट्रीय व्यक्तिमत्त्वाची भलावण करणारे रा. दिलीप पुरुषोत्तम चित्रे यानी कऱ्हाड पुरस्काराचा स्वीकार करताना तुकारामाच्या देशी मराठी वृत्तीचा जो गौरव केला तो, या दृष्टीने, नव्या देशी चळवळीला स्वागतार्ह वाटतो.

ही नवी चळवळ असेही मानते की दलित चळवळीने जर या देशी मराठपणाशी फारकत घेतली तर त्यांची चळवळही येथे रुजणार नाही. शाब्दिक क्रातिवादाने किंवा आतरराष्ट्रीयत्वाच्या पुकाऱ्यानं त्याच्या स्वतःच्याच पिंडातला देशीपणा ते टाळू शकतील तर ते शक्य होणार नाही.

साराश, देशीपणाच्या पिंडाचे भान ठेवून, आधुनिकतेचा त्या पिंडाशी सुसगत असा स्वीकार करून, या विरोधी अशा सर्व प्रवृत्तीचे खरे, घातक रूप प्रकाशात आणून, 'देशीकार साहित्या'कडे सर्व सुजाण मराठी लोकाना नेणे, त्यासाठी नवे देशीकार प्रबोधन करणे हे या नव्या ग्रामीण साहित्यिक चळवळीचे ऐतिहासिक कार्य आहे असे म्हणावे लागेल. ☐

---

अवतीभवती । शरद कृष्णन्

## ☐ राजीव गांधींचे पदार्पण

संजय गाधी याचे अपघाती निधन झाल्यानंतर राजघराण्यात तशी मोठी पोकळीच निर्माण झाली होती. सूनबाई मनेका गाधी पतीनिधनाचे दु ख विसरून, पदर खोचून सिद्ध झाल्या आणि चमचे मंडळीनी चिवचिव सुरू केली; पण राजसिंहासनावर आरूढ झालेल्या सासुबाईंच्या मनात काही वेगळाच विचार होता. त्यानी नुसते डोळे वटारले मात्र—चमचे मंडळीची चिवचिव थंडावली. मनेका गाधीचे नाव बघता बघता मागे पडले. देशाचे कसे होणार या चिंतेने ग्रस्त झालेल्या मंडळीनी राजवंश अखंड चालू रहावा आणि देशाचेही भले व्हावे या हेतूने राजपुत्राला आवाहन करण्यास सुरुवात केली. प्रथम दबत दबत विनंतीवजा आळवणी होती. इंदिराजीची प्रतिक्रिया नाही याचा अर्थ त्याची संमती आहे असा घेण्यात आला. प्रत्यक्ष इंदिराजीना प्रश्न विचारण्यात आल्यावर त्यांनीही सागून टाकले, 'मी काय सागणार? काय करायचे हे त्याचे त्याने ठरवायचे आहे.' हे सूचक बोलणे पुरेसे बोलके होते. काय समजायचे ते मडळी समजून चुकली. मुंबई, लखनौ, कटक, बंगलोर . ये रे राजा, ये रे राजा म्हणून दररोज आळवणी करणाऱ्या विनतिपत्राचे पाट वाहू लागले संजयची धडाडी, त्याचा मस्तवालपणा राजीवजवळ नाही. तसा तो सौम्य प्रकृतीचा. गेले आठ-दहा महिने त्याने ममीच्या सहवासात घालवले. आईला यथाशक्ती मदत केली; पण किती झाले तरी ते अर्धवेळ काम होते. हे असे फार दिवस करता येण्यासारखं नव्हते. राजीवने राजकारणात उडी

घ्यावी असे आवाहन राज्याराज्याचे मुख्यमंत्री करत होते. उडी घ्यायची म्हणजे नेमके काय करायचे हे समजत नसल्यामुळे असेल अथवा उडी घ्यायची की नाही याचा निर्णय न झाल्यामुळे असेल, राजीव काठावरच येरझारा घालत होता. दरम्यान निवडणूक आयुक्त शकधरकाकानी पोटनिवडणुकीची घोषणा केली. राजीवचा 'चलो अमेठी'चा नारा सुरू झाला. उडी घ्यायची म्हणजे काय करायचे हे चिरंजिवाच्या लक्षात येऊन चुकले होते. हो ना करता करता घेतली की त्यानी उडी. आणि निवडणुकीचा अर्ज भरला. आता पाण्यात उतरले असल्याने नाका-तोंडात थोडे पाणी जाईल; पण थोर-थोर मंडळी मदतीला उभी असल्याने स्वारी तरून जाईल. बघता बघता अमेठीला जत्रेचे स्वरूप येईल. निष्ठा नोंदल्या जाव्यात म्हणून शेकडो मैलावरून मंडळी धावत अमेठीत जातील. कारण प्रश्न राजीव गांधीचा नाही, तर प्रश्न देशाच्या भवितव्याचा आहे आणि देशाच्या भवितव्याचा प्रश्न असला की सारे मान-अपमान गुंडाळून ठेवून, आघाडीवर जाऊन लढण्याची. महाराष्ट्राची परंपरा असल्याने, पुन्हा आमचा झिजलेला सह्याद्रीचा कडा अमेठीत धावत जाईल. राजपुत्राच्या आगमनासाठी पायघड्या घातल्या जात असल्या तरी राजरस्ता काही साफ नाही. अनेक करंटी मंडळी वाटेत आडवी येणार आहेत. राजपुत्राच्या विरोधात असलेल्या तमाम शक्तीनी आपले सारे सामर्थ्य एकवटण्याचे ठरवले आहे. अर्थात हा असा विचार आणि प्रत्यक्ष कृती यात तादात्म्य असतेच असे नाही; पण प्रयत्न तरी तसा आहे. अर्थात असे झाले तरी फार मोठा चमत्कार होईल असे नाही. राजीवने आपली दिशा निश्चित केली आहे आणि ठरल्या योजनेप्रमाणे तो राजदरबारात रुजू होणारच आहे. उ. प्र चे वि. प्र. सिंग त्यासाठी जातीने लक्ष घालत आहेत. कशाची म्हणजे कशाची कमतरता भासणार नाही, याची ते दक्षता घेतीलच आणि इतके करूनही नच भागले तर राजपुत्रासाठी एखादे चिकमगळूर शोधले जाईलच. कारण अखेरीस प्रश्न देशाच्या भवितव्याचा असल्याने राजीव येणार म्हणजे येणारच. कस्से होणार, कस्से होणार म्हणून चिंता करणाऱ्या चिंताखोरांना, इंदिराजीनंतर कोण, स्टीफन की साठे, व्यंकटरामन का झैलसिंग यासारखे कुजके प्रश्न विचारण्याचे कारण नाही. प्रश्नाचे उत्तर सापडले आहे. राजपुत्राचे आगमन होत आहे.

राजकीय आघाडीवर बऱ्याच दिवसात थरारक असे काही घडलेच नव्हते. पोटनिवडणुका घोषित झाल्या तरी एक प. बंगाल सोडला तर बाकी कुठे जाग आली नव्हती; पण राजपुत्र येत असल्याची घोषणा झाली मात्र, सारे वातावरण कसे नवचैतन्याने भरून गेले आहे. कस्सा येतो म्हणून मंडळी डोळे वटारत असली तरी येणारचा नारा असा काही प्रचड आहे की, वटारलेल्या डोळ्यांचे फारसे काही चालू शकेल असे वाटत नाही.

## □ नागभूषणम् पटनाईक यांची मुक्तता

नक्षलवादी नेते नागभूषणम पटनाईक गेली अकरा वर्षे आंध्र प्रदेशच्या तुरुंगात शिक्षा भोगत होते. रक्तरंजित क्रांती करण्याच्या विचाराने झपाटलेले, प्रस्थापित सत्तेला आणि प्रस्थापितांच्या न्यायासनाना कःपदार्थ मानणारे नागभूषणम वास्तविक फाशीच्या तख्तावरच चढायचे. ज्या वेळी रक्तरंजित क्रांतीच्या विचाराने प्रेरित होऊन हाती हत्यार धरले त्याच वेळी त्यांनी याची तयारी ठेवली होती. पार्वतीपुरम केस या गाजलेल्या खटल्यामध्ये त्याना फाशीची शिक्षा झाली. प्रस्थापितांचे न्यायालय मी मानत नाही, असे सांगून त्यानी सुप्रीम कोर्टात अपील करण्याचे नाकारले होते. पुढे त्याच्या पत्नीने ज्या वेळी दयेचा अर्ज केला त्या वेळी या अर्जाशी आपला काही संबंध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आणि तरीही तेव्हाचे राष्ट्रपती श्री. व्ही. व्ही. गिरी यांनी दया दाखवून फाशी रद्द ठरवली; फाशी टळली तरी जन्मठेप असल्याने तुरुंगवास चालूच होता. पार्वतीपुरम केस खेरीज अन्य काही प्रकरणी त्याच्यावर गंभीर आरोप असल्याने त्यांची मुक्तता झाली नव्हती. तुरुंगवासात त्यांना पोलिसाकडून सतत त्रास दिला गेला. सतत होणाऱ्या मारपिटीमुळे प्रकृती खिळखिळी झाली. सध्या असंख्य व्याधीनी त्रस्त झालेले पटनाईक इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्समध्ये औषधोपचार घेत आहेत. शरीरात रक्ताभिसरण बरोबर होत नसल्याने ते बोलता बोलता वारंवार बेशुद्ध पडतात. गेल्या वर्षी सर्वोच्च न्यायालयाच्या आज्ञेनुसार त्यांना उपचारासाठी दिल्ली येथे आणण्यात आले होते. तथापी काही दिवसातच, डॉक्टराचा सल्ला झुगारून देऊन आंध्र प्रदेश सरकारने त्यांची पुन्हा तुरुंगात रवानगी केली. त्यानंतर तुरुंगामधील छळवणुकीमुळे त्यांची प्रकृती आणखीच खालावली. त्याच्या पत्नीला, पुतण्याला अथवा जवळच्या अन्य नातेवाईकानाही त्याना भेट देण्यात येत नव्हते. त्याच्या मुक्ततेसाठी एक समिती स्थापन झाली आणि या समितीमार्फत नव्याने प्रयत्न सुरू झाले. दरम्यान नागभूषणम याची प्रकृती फारच खालावल्याने त्यांना गेल्याच महिन्यात पुन्हा दिल्लीला उपचारासाठी आणण्यात आले. त्यानंतर त्याच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा होत असतानाच, सर्वोच्च न्यायालयासमोर त्यांच्यावरील खटल्याचे कामकाज सुरू होते. त्याची प्रकृती लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने, कोणत्याही अटी न घालता त्याची पॅरोलवर मुक्तता केली. तथापी न्यायालयाचा निर्णय लागून तीन दिवस झाले तरी आंध्र प्रदेश सरकारने त्यांना मुक्त केले नव्हते. नागभूषणम मुक्ती समितीने आणि त्यांच्या नातेवाईकांनी न्यायालयाचा अवमान केल्याबद्दल, पुन्हा प्रकरण न्यायालयात नेण्याची धमकी दिल्यावर त्यांची मुक्तता करण्यात आली.

नागभूषणम आणखी किमान एक महिना दिल्ली येथे राहतील. गेले काही दिवस त्यांना ताप येत होता; परंतु योग्य ओषधोपचारानंतर तो आटोक्यात आला आहे. आपली तब्येत सुधारताच आपण ओरिसामधील गुणुपूर या आपल्या मूळ गावी जाण्यास उत्सुक असल्याचे त्यानी बोलून दाखवले. त्याची मुक्तता होताच, त्यांचा पुतण्या नागेश्वर पटनायक, बंधू श्री. बी. के. पटनायक आणि अन्य स्नेहीसोबत्यांनी त्यांची भेट घेतली.

अकरा वर्षांचा तुरुंगवास भोगल्यानंतर आणि जबर मारपिटीला तोंड दिल्यानंतरही नागभूषणम यांचा ताठरपणा कायम आहे. त्यांची प्रकृती चांगली नसली तरी मनाचे सामर्थ्य त्यांनी टिकवून धरले आहे. ४५ वर्षांचे नागभूषणम शारीरिक व्याधीमुळे त्रस्त झालेले

असले तरीही पत्रकारानी विचारलेल्या राजकीय स्वरूपाच्या प्रश्नावर लगोलग प्रतिक्रिया व्यक्त करण्याचे मनोबळ त्यांच्यापाशी कायम आहे. स्वतःच्या तब्येतीबद्दल बोलताना ते म्हणाले, 'मी म्हणजे एक हाडांचा चालता–बोलता सापळाच आहे सारे मांस झडून गेले आहे. प्रकृती जराही साथ देत नाही. मी घरातल्या घरातही हालचाली करू शकत नाही आणि त्या बळेच करूही नयेत असा वैद्यकीय सल्ला आहे. आज अकरा वर्षांनंतर प्रथमच मोकळेपणाने बोलता येत आहे आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, फाशीच्या शिक्षेपेक्षाही भयंकर असलेला एकांतवास समाप्त झाला आहे, याबद्दल त्यानी समाधान व्यक्त केले. पोलिसी अत्याचाराबाबत प्रश्न विचारले असता पोलिसांनी ज्याची हाडे अक्षरशः मोडून काढली आहेत ते हे नागभूषणम म्हणतात, असल्या गोष्टीची मला आता सवय झाली आहे. स्वतःच्या मुक्ततेबद्दल बोलताना ते म्हणाले, हे असे काही होईल असे जराही वाटत नसल्याने मी काहीसा आश्चर्यचकित झालो आहे. न्यायदान आणि न्यायालये याबाबतची आपली भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले, आमच्या पार्टीचा या गोष्टीवर विश्वास नसल्याने मला पूर्ण असहाकाराची भूमिका घ्यावी लागली. स्वतः वकील असल्याने या निर्णयाचे काय परिणाम होतील याची मला कल्पना होती. विशेषतः खुनाचे आरोप असल्याने शिक्षा काय होईल याचीही जाणीव होती; पण तरीही आपण पक्षाच्या धोरणाप्रमाणे वागलो. आता न्यायालयाबाबत पक्षाचे धोरण बदलले असून कामकाजात भाग घेण्याची मुभा देण्यात आली आहे.

संसदीय लोकशाहीच्या संदर्भात बोलताना ते म्हणाले, एका बाईच्या हाती सर्व सत्ता एकवटली असून, संसदीय लोकशाहीचा पातळ पापुद्रा तेवढा शिल्लक उरला आहे. संपूर्ण जगात अशी संसदीय लोकशाही कुठेच नसेल! त्याच्या मुक्ततेचे जे आदेश तिहार जेलमध्ये पाठविण्यात आले होते, त्यामधील सूचनाप्रमाणे, मुक्ततेच्या काळात ते कोठे रहाणार आहेत याचा लेखी तपशील घेण्याचे सुचवण्यात आले होते. तथापि सर्वोच्च न्यायालयाने आपली बिनशर्त मुक्तता केली असल्याने असे काहीही आपण लिहून देणार नाही असे त्यानी सांगितले. या झुंझार नक्षलवादी नेत्याला समोर ठवूनच अनिल बर्वे यानी थँक यू मिस्टर ग्लाड ही पुढे याच नावाने रंगमंचावर आलेली आपली कादंबरी लिहिली होती, असे म्हणतात !

## □ पंचतारांकित हॉटेल्स व समाजवाद

आंध्र व तामीळनाडूमध्ये मोठा दुष्काळ पडला आहे. ग्रामीण भागामधील जनता हवालदिल झाली आहे, छोट्या–छोट्या खेड्यातून पाण्याचा, गुराच्या चाऱ्याचा प्रश्न भेडसावत आहे; परंतु तुम्ही मद्रास अथवा हैद्राबादमधील मोठ्या हॉटेल्समधून एखादी फेरी मारा. सारे काही आबादीआबाद असल्याचे तुम्हाला दिसून येईल आणि एखाद्या तारांकित हॉटेलमध्ये फेरफटका मारलात तर दुष्काळाचे नाव–निशाणीही तुम्हाला सापडणार नाही ! फार तर दुष्काळी परिस्थितीबाबत चर्चा करणारी एखादी सिनेनटाच्याच अथवा अन्य कोणा सामाजिक संस्थेची बैठक–अथवा पत्रकार–परिषद चाललेली दिसेल ! समाजवादाच्या गप्पा मारत सरंजामी पद्धतीच्या सुविधा उपलब्ध करून देणारी ही तारांकित हॉटेल्स म्हणजे आजच्या जमान्यामधील राजमहाल झाली आहेत ! प्रामुख्याने परदेशातून येणाऱ्या प्रवासी मंडळींना ऐषआरामात रहाता यावे या दृष्टीने आवश्यक असलेल्या सर्व सुविधा या तारांकित होटेल्सना उपलब्ध करून देण्यात आल्या असल्या तरी या तारांकित होटेल्सचा बडेजाव असा काही जबरदस्त आहे की देशामधील एकंदर सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीपासून तो संपूर्णपणे तुटल्यासारखी वाटतात. 'धर्मयुग' या हिंदी पाक्षिकाने या तारांकित होटेल्सच्या संदर्भात गगाधर गाडगीळ याचा एक लेख प्रसिद्ध केला आहे. या तारांकित होटेल्सपैकी मुबई–दिल्ली यासारख्या ठिकाणी जी पंचतारांकित होटेल्स आहेत त्यामध्ये तर संपन्नतेचे वाहते दर्शन घडत असते. वातानुकूलित सूट्स्, पोहण्यासाठी तलाव, फेरफटका मारण्यासाठी उत्तम बगीचा, ऐकण्यासाठी उत्तम संगीत, संपर्कसाधन म्हणून उशापायथ्याशी फोन, उत्तमोत्तम खाद्य पदार्थांची रेलचेल असलेले भोजन, कंटाळा आला, काही वाचावेसे वाटले तर देशी-विदेशी प्रकाशनाची रेलचेल असलेले वाचनालय, नुसती बटनाची कळ दाबताच सेवेसाठी हजर असलेला नोकरवर्ग ! आता हे सारे हवे म्हणजे पाण्यासारखा पैसा खर्च करणे आलेच. तारांकित होटेल्सच्या कक्षेबाहेर पसरलेल्या जगापेक्षा एक अगदी वेगळे जग येथे उभे करण्यात येते. या तारांकित होटेल्समधून रात्र खुलवणाऱ्या रातराण्यांची अधिकृत व्यवस्था करण्यात आली नसली तरी चतुर मंडळींना ही सोय कशी लावायची याची अचूक माहिती असते आणि याबाबतीत विशेष रस असलेली मंडळी अधिकृतरीत्या नाही तरी अनधिकृतरीत्या या गोष्टीचाही बंदोबस्त करून घेतात !

या होटेल्सचे आश्रयदाते कोण असा आपल्याला प्रश्न पडला असेल. दारिद्र्याचा शाप असलेल्या या देशामधील हे विकाऊ राजमहाल रिकामे रहात असतील असेही कदाचित आपल्याला वाटत असेल; पण वस्तुस्थिती तशी नाही. प्रचड खर्चाच्या या तारांकित होटेल्सना उतारूची वानवा तर कधी भासत नाहीच; पण काही वेळा तर गर्दी इतकी उडते की, जागा मिळणे कठीण होऊन बसते ! कोण असतात हे भाग्यवान लोक ? परदेशातून आलेले प्रवासी तर असतातच. नोटाची चळत घेऊन ते चैन करत, चटका लावणारे दारिद्र्य पहाण्यासाठी आले असल्याने त्याची तर अशा हॉटेल्समधून गर्दी असतेच. अमेरिका–युरोपमधून आलेले प्रवासी जसे त्यात असतात त्याचप्रमाणे तेलाच्या सुबत्ततेतून सपत्ती गोळा केलेले गल्फमधील शेखही त्यात असतात. गोरगरिबासाठी जपमाळ ओढणारे कम्युनिस्टही या सुखासीन होटेल्समधून पहावयास मिळतात !

राष्ट्रप्रधाच्या कामाच्या निमित्ताने आलेल्या मडळींना जगभर फिरावे लागते. जगाची चिंता करणाऱ्या या मंडळींचा राहण्याखाण्याचा उत्तम बंदोबस्त ठवावाच लागतो. राष्ट्रतत्र ती जबाबदारी उचलतो आणि पचतारांकित होटेल्सना हे खासे गिऱ्हाईक उपलब्ध होते. अर्थात या होटेल्समधून केवळ परदेशातून आलेली मडळी असतात असा मात्र गैरसमज करून घेऊ नका. ही सपन्नता टिकवून धरण्याचा जबाबदारीही प्रामुख्याने भारतीयानाच उचलावी लागते. बडे बड फिल्मी सितारे, मोठमोठ्या कंपन्यांचे डायरेक्टर्स, मंत्रीगण,

सहकारी साखर कारखानदारीतून संपन्नता प्राप्त केलले धनिक, हे सगळे विचारे तसे खपत असतात गोरगरिबासाठीच ! फिल्मी सितारे गोरगरिबांचेच मनोरंजन करतात. साखरवाल्यानाही ते सणा-सुदीच्या दिवसांत जनतेचे कसे हाल होणार नाहीत याचीच चिंता असते. कंपन्यांचा कारभार चालवणारे भेडसावणाऱ्या कामगार-प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या चिंतेने त्रस्त झालेले असतात. येथे येणाऱ्या राजकारणी मंडळीच्या मागे तर कामाचा केवढा व्याप असतो ! देशात समाजवाद रुजवण्याची जबाबदारी त्यांच्यावरच असते. आता अशा मंडळीचे स्वतःचे आयुष्य चागले आबादाबात राहिले पाहिजे; तरच ते काम करू शकणार. म्हटलेच आहे ना, लाख गेले तरी चालतील; परंतु लाखाचे हे पोशिंदे केवळ शाबूत राहिले पाहिजेत असे नाही, तर चागले गुलदस्तात आणि अगदी सदाबहार राहिले पाहिजेत ! ही पचतारांकित होटेल्स हीच जबाबदारी पार पाडीत असतात. प्रगतिशील समाजवादी, क्रांतीकारी लिखाण करायचे तर लेखकाला स्वास्थ्य नको का ? तर त्याने जायचे कुठे ? ते स्विमिंग पूलच्या काठावर बिअरचे घुटके घेत बसलेले रामेश्वर दिसतात ना, ते समाजाचे भेदक चित्रण करणारे, पूंजीपतींवर कडाडून हल्ला करणारे चोरं लेखक आहेत त्यांच्या पलीकडे जाडजूड चष्मा लावून ग्रंथ वाचत बसले आहेत ना, ते आहेत अर्थशास्त्रज्ञ ! देशात आर्थिक समता कशी येईल याचा विचार त्यांच्या डोक्यात सतत घोळत असतो. 'आर्थिक क्रांतीची गतिशीलता' या किंवा अशासारख्याच एखाद्या विषयावरील परिसंवादात भाग घेण्याच्या निमित्ताने या स्वारीने येथे मुक्काम ठोकला आहे. सरकारतर्फे आयोजित करण्यात येणारे चित्रपटमहोत्सव व अन्य मोठे कार्यक्रम– त्या निमित्ताने येणारे पाहुणे, त्यांच्यासाठी योजलेले स्वागतसमारंभ, हे सारे अशा पंचतारांकित होटेल्समधून व्हावे लागते. कारण अखेरीस प्रश्न देशाच्या प्रतिष्ठेचा असतो. समाजवादाची लढाई लढायची तर ती लढणारांना सुविधा नकोत ? पंचतारांकित होटेल्समधून विदेशी मंडळी असतात हा गैरसमज काढून टाका. अहो, ऐंशी टक्के आपलीच मंडळी असतात; पण बिचारे देशाच्या भलाईसाठी, गोरगरिबांच्या कल्याणासाठी आणि मुख्य म्हणजे समाजवादी समाजरचनेसाठी झटत असतात म्हणून तर त्याना त्यांच्या विचारकक्षेत तरंगत ठेवणारी ही पचतारांकित होटेल्स आपण चालवतो !

या तारांकित होटेल्समध्ये उतरणाऱ्या बड्या मंडळीच्या हाती देशाचे भवितव्य असल्याने पर्यटन विभागामार्फत काटेकोर पहाणी करून ताऱ्यांचे वाटप केले जाते. गर्दी, गोंधळ, प्रदूषणकक्षा यापासून ही होटेल्स दूर ठेवली जातात. रेल्वेस्टेशन व विमानतळ जवळ असावा किंवा होटेलचे या दोन्ही ठिकाणाहून संपर्क असलेले वाहन असावे याबाबतही दक्षता घेण्यात येते.

पचतारांकित होटेल्सना पाच तारे दिले जाण्यापूर्वी तेथे पोहण्याचा उत्तम तलाव आहे, प्रत्येक निवासी सूटमध्ये सर्व सुविधा उपलब्ध आहेत, याबाबत खात्री करून घेण्यात येते. असे किमान पंचवीस सुट्स असावेच लागतात. मंडळी घराबाहेर असली तरी आपण आपल्याच घरी आहोत असे त्याना वाटावे असे वातावरण ठेवण्याची जबाबदारी व्यवस्थापनाला उचलावी लागते. सर्व प्रवाशांच्या सोयी-साठी एक छोटा बाजार, कटिंग सलून, ब्युटी पार्लर, ट्रॅव्हल एजन्सी कॉर्नर, एक नृत्यकक्ष या अन्य गोष्टीही आवश्यक समजल्या जातात आणि हे सगळे आहे याची येणाऱ्या प्रवाशाना सुखद जाणीव करून देणारी हसतमुख देखणी स्वागतिका लागतेच ! भटारखान्याच्या स्वच्छतेबाबत काटेकोर नियम असतात आणि त्याची कठोर अंमल-बजावणी होते. थोडक्यात म्हणजे ही पंचतारांकित होटेल्स ही सर्व-साधारण माणसाच्या कल्पनेतही बसू शकणार नाहीत अशी शाही निवासस्थाने असतात. आता अशा होटेलमधील एका समारंभाचे थोडेसे वर्णन देऊन हा विषय संपवतो.

### नववर्षाचे स्वागत

एकतीस डिसेंबरची रात्र ही पचतारांकित होटेलमधील मोठी समारंभाची रात्र. नव वर्षाचे स्वागत करण्यासाठी मंडळी त्या रात्री जमतात. एका रात्रीच्या कार्यक्रमाचा व भोजनाचा खर्च दर माणशी २५० ते ४५० रुपये असतो. अर्थशास्त्र सांगते की, सर्वसाधारणपणे किमती वाढल्या की मागणी घटते; परंतु अर्थशास्त्राचा हा सिद्धांत येथे लागू पडत नाही. उलट जास्त किंमत देऊन नववर्षाच्या स्वागता-साठी जाणे ही प्रतिष्ठेची बाब मानली जाते. 'यु नो वुई हॅड अ नाइस टाइम... असे म्हणून मग या समारंभाचे चवीने वर्णन करण्यात येते. वर दिलेल्या रकमेमध्ये महागड्या दारूचा समावेश नसतो. दारूवर खर्च पडणारी रक्कम विचारात घेतली तर एक व्यक्ती ६०० ते ७०० रुपये खर्ची घालून नववर्षाचे स्वागत करते. काही विशिष्ट होटेल्समधून प्राय. तरुण–तरुणींची गर्दी जास्त असते. ही होटेलसही मग खास तरुण मंडळीसाठी म्हणून, नृत्याचे, गायनाचे खास वैशिष्टयपूर्ण कार्यक्रम सादर करतात. या तरुण मंडळीपैकी बहुतेक जण मिळवते नसतात, तर ज्यांच्याकडे पैसा हा प्रश्न नसतो अशा घरच्या मंडळीकडून त्याना पैसा पुरवला जातो. त्यांच्याकडे विचारणा केली तर ते स्वच्छच सांगतात की, आमचे पालक आम्हाला टाळत असतात. आम्हाला बरोबर नेणे त्याना सोइस्कर वाटत नाही. नोटांची पुडकी आमच्या हातात ठेवून ते सांगतात, 'जावो बच्चो, मौज मजा करो !'– वडीलधाऱ्या पालकाची आज्ञा प्रमाण मानून तरुण-तरुणींचा हा ताफा त्यांच्या विशिष्ट होटेल्समध्ये जमून नववर्षाच्या स्वागतकार्यक्रमात सहभागी होतो. काही मोजकी मंडळी ज्या वेळेला पैशाचा चुराडा करून नववर्षाचे स्वागत करण्यात मश्गुल झालेली असतात, त्याच वेळी दैनंदिन प्रश्नांची उत्तरे शोधण्यात मश्गुल झालेल्या असंख्य झोपडपट्टी-वासियाना हे असे काही असते, याची कल्पनाही नसते. एका मोठ्या होटेलमध्ये याबाबतची आकडेवारी विचारली असता साधारणपणे तीनशे लोकाना नववर्षाच्या स्वागतासाठी आम्ही सामावून घेतो; २५ डिसेंबरला बुकिंग सुरू करतो आणि केवळ तीन दिवसांतच जागा भरून जातात ! तीनशे मंडळीच्या या समारंभासाठी सुमारे १५ लाख रुपये खर्ची पडतात आणि या समारोहात सामील झालेली असंख्य मंडळी मोठ्या उत्साहाने नववर्षाचा प्रारंभ करतात !

□

## निपाणीतील देवदासी, विडी कामगार-स्त्रिया आणि तंबाखू कामगार-स्त्रिया यांच्या दैनंदिन जीवनात बदल घडवून आणणारे आंदोलन असे उभे राहिले....

# तंबाखूपट

लेखक : विजय परुळकर । लेखांक : तिसरा

तंबाखू ! निश्चितच जीवनोपयोगी नाही. व्यसनपूर्ती किंवा चैन-बाजीसाठी आवश्यक असा हा एक खाण्याचा, नाकावाटे ओढण्याचा किंवा धूर काढण्याचा शेतमाल आहे, कॅन्सरसारख्या रोगाचा आणि ह्या वनस्पतीच्या सेवनाचा निकटचा संबंध असावा असा संशय वैद्यकीय शास्त्रज्ञांना आहे. तांबूलसेवनाची पद्धत भारतामध्ये अतिप्राचीन काळापासून रूढ झालेली; पण बत्तीसगुणी विड्यात लवंग, वेलची, जायफळ इत्यादी पदार्थांबरोबर तंबाखूदेखील घालत की नाही, ह्याबद्दल खात्रीलायक माहिती उपलब्ध नाही. भारतात तंबाखू कधीपासून पिकू लागली कुणास ठाऊक. रामायण-महाभारत-काळात तंबाखू अस्तित्वात होती का ? बहुतेक नसावी. कारण 'पचकन् तंबाखूची पिचकारी टाकून महर्षी दुर्वास ऋषींनीं देवचंद नावाच्या लोभी व्यापाऱ्याला शाप दिला...' असा उल्लेख वाचल्याचं स्मरत नाही.

कदाचित तंबाखू मूळची भारतीयच असावी. इराण-अफगाणिस्तान येथून आलेल्या आणि सोमरस वनविण्यात तज्ज्ञ असलेल्या ऋग्वेदी आर्यमंडळींना ही वनस्पतीदेखील ज्ञात असावी. आपण पिकनिकला गेलो असता डोंगर-कपारीतून फिरताना ज्याप्रमाणे सहज म्हणून वाळक्या गवताची काडी चघळतो त्याप्रमाणे हिंदुकुश पर्वतराजीवर भटकताना एखाद्या आर्यमुनीनं ह्या वनस्पतीची वाळकी काडी दातात धरून चघळली असावी. चघळता चघळता आर्यमुनींची ब्रह्मानंदी टाळी लागली असावी. त्याचप्रमाणे शेकोटीभोवती बसून वेदरचना करण्यात गढलल्या ऋषि-मुनींनी शेकोटीची आग पेटती ठेवण्यासाठी हाती लागेल तो पालापाचोळा म्हणून वाळका तंबाखू वापरला असावा. फूऽऽ फूऽऽ करून शेकोटी पेटवताना ह्या वनस्पतीच्या पाल्याचा धूर तोंडावाटे ऋषि-मुनींच्या फुफ्फुसात शिरला असावा. फुफ्फुसातून ह्या धुरातील अमली पदार्थ ऋषिवर्यांच्या रक्तात भिनला असावा आणि त्यानंतर पाहता पाहता त्यांच्या तोंडून एकापाठोपाठ एक ऋचा प्रसवल्या असाव्यात. त्यांच्या शेजारी बसलेल्या एखाद्या आर्य तपस्व्याच्या नाकात ह्या वनस्पतीच्या वाळक्या पाचोळ्याचे सूक्ष्म कण शिरून त्यास फाड् फाड् शिका आल्या असाव्यात. शिंका संपताच तपस्वीमहाराजांचं चोंदलेलं नाक सुटलं असावं आणि जड झालेलं डोकं हलकं होऊन त्यांना तरंगल्या-सारखं वाटलं असावं. अशा प्रकारे सोमप्राशन करणाऱ्या आर्यऋषि-मुनींना ह्या ब्रह्मप्रदर्शिकेचा शोध लागून तंबाखू खाण्याची, धूम्रपान करण्याची आणि तपकीर ओढण्याची प्रथा सुरू झाली असणार !

तंबाखूचा खरा इतिहास त्या काळचे आर्य आणि आज-कालचे कृषिपंडीतच जाणोत ! एक गोष्ट मात्र निश्चित, तंबाखू ही फक्त पृथ्वीचीच स्पेशॅलिटी असावी, स्वर्गात तंबाखू नसावा ! बहुतेक सगळ्या पानवाल्यांच्या दुकानात वाचायला मिळणाऱ्या काव्यपंक्ती ह्याचा पुरावा म्हणून देता येतील. ह्या अज्ञात तंबाखूप्रेमी कवी म्हणतो,

कृष्ण चालले वैकुंठा । राधा म्हणे पकडून बाही ।
विडा घ्या हो नारायणा । येथे तंबाखू नाही ।।

अशी ही प्रसिद्ध तंबाखू भारतामधील गुजराथ प्रांतात आणि कर्नाटक प्रांतातील बेळगाव जिल्ह्यामधील चिकोडी ह्या तालुक्यात, निपाणी गावच्या परिसरात पिकते. गुजराथची तंबाखू हलक्या दर्जाची आणि निपाणीची उच्च प्रतीची अशी ख्याती.

निपाणीमध्ये साधारण शंभर वर्षांपूर्वीपासून तंबाखू पिकवला जातो असं जाणकार सांगतात. ह्या गावामध्ये तंबाखूचा व्यापार सुमारे नव्वद वर्षांपूर्वी सुरू झाला. नव्वद वर्षांपूर्वीची पहिली पेढी देवचंदशेठजींच्या पूर्वजांची !

ह्या परिसरातील तंबाखू-व्यापाराची सुरुवात इतर कुठल्याही व्यापाराप्रमाणे कच्च्या मालाच्या शोषणानेच झाली. उत्पादकाचा कच्चा माल कवडीमोल दरानं खरेदी करून कारखानदारांना विकताना अमाप नफा मिळवणारे दलाल इतरत्र निर्माण होतात त्याप्रमाणेच इथंही झाले. दलाल म्हणजे फुकट. बसल्या जागी काहीही न करता निव्वळ फायदा उठवणारे ! उत्पादक, कारखानदार आणि ग्राहक ह्यांच्यामध्ये दुवा सांधण्याचं निमित्त करून, दोघांनाही फसवून मधल्यामध्ये गब्बर होणाऱ्या रक्तपिपासूंची ही जात ! फुकट खाण्याची एकदा सवय लागली की ती रक्तात भिनते, रक्तामधून

दुसऱ्या पिढीमध्ये उतरते आणि त्यातून पिढीजाद दलाली निर्माण होते ! निपाणीत असे पिढीजाद दलाल आहेत. हे स्वतःला तबाखूचे व्यापारी म्हणवतात; पण खरं म्हणजे हे अडते ! ह्या अडत्याची आणि विडी-कारखानदाराची जबरदस्त एकी आहे. अभेद्य अशी. ही दलालमंडळी आहेत मूठभरच; पण साऱ्या तंबाखू उत्पादक शेतकऱ्याला त्यानी पिढयान्‌पिढया पद्धतशीर नागवलं आहे !

गुडूरावच्या कर्नाटक राज्यात एक गोष्ट चटकन डोळयात भरते. ह्या राज्यातील बहुतेक सर्व व्यापारी, दलाल, पोलीस आणि पोलीस-अधिकारी ह्यांच्या ढेऱ्या सुटलेल्या आहेत. शेतकऱ्याची पोटं मात्र पाठीला चिकटली आहेत ! निपाणीच्या परिसरात पोट सुटलेले पोलीस आणि पोलीसअधिकारी जितक्या प्रचंड संख्येनं दिसतात तसे आपल्या प्रांतातील खंडाळयाचा घाट वगळता, इतरत्र कुठेही दिसत नाहीत !

निपाणीच्या तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांनी अकोळच्या तरुण मंडळाच्या नेतृत्वाखाली तंबाखूचा पहिला लढा दिला तेव्हा जनता सरकारनं वाटाघाटीच्या निमित्तानं त्यांच्या तोंडाला पानं पुसली. जनता राजवटीतील व्यापारमंत्री मोहन धारिया खुद्द निपाणीचे असूनदेखील तंबाखू उत्पादक शेतकऱ्याला दलालांच्या तावडीतून सोडविण्यात कसे असमर्थ ठरले हे गेल्या लेखाकात सांगितलेच आहे.

श्री. मोहनभाई धारिया वाटाघाटी–प्रकरणानंतर निपाणी परिसरातील तंबाखू उत्पादक शेतकऱ्याच्या चळवळीची पार ससेहोलपट झाली. अकोळच्या तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांची अब्रू जाण्याची वेळ आली. बरेच दिवस कुठलाही तंबाखू शेतकरी त्यांच्या जवळपास फिरकेनासा झाला !

काही दिवस हा प्रकार चालला. मग तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांपैकी काही जुनी आणि जाणती मंडळी, ज्याना बेचाळीसच्या चळवळीच्या आठवणी होत्या, ती म्हणू लागली– ह्या तरुण पोरांचं चुकलं असेल; पण त्याचा हेतू प्रामाणिक होता हे मान्य करायला पाहिजे ! तबाखू चळवळीच्या निमित्तानं ही तरुण पोरं आपल्याकडे मताच्या झोळया फिरवायला आली नाहीत, हे सत्य ध्यानात घ्यायला पाहिजे ! तबाखू शेतकऱ्यानं त्या तरुण पोरांच्या माग उभं राहिलं पाहिजे !

–आणि होता होता शंभर–दीडशे शेतकरी पुन्हा अकोळचं तरुण मंडळ आणि प्राध्यापक सुभाष जोशी ह्याना पाठिंबा द्यायला तयार झाले. १ मे १९८० रोजी सर्वांनी मिळून एक नवीन कार्यक्रम आखला.

१ मे हा कामगार दिन म्हणून साजरा केला जातो पण ह्या मंडळीनी ठरवलं की फक्त कामगार दिन म्हणून हा दिवस साजरा करायचा नाही. अमेरिकेत कुणी तरी फासावर गेलं म्हणून जगभर हा दिन कामगाराच्या नावानं साजरा केला जातो, म्हणून भारतामधील सर्वांनीच तस करायला पाहिजे असं कुणी सांगितलंय ! भारतामध्य १ मे हा शेतकरी आणि कामगार ह्याचा सयुक्तदिन म्हणून साजरा का केला जाऊ नये ?

सुभाष जोशी आणि अकोळच्या तरुण मडळाच्या कार्यकर्त्यांनी १ मे १९८० हा दिन तबाखू शेतकरी आणि तबाखू व विडीकामगार स्त्रिया ह्यांचा संयुक्त मेळावा घेऊन, संयुक्त मोर्चा काढून साजरा करायचं ठरवलं. त्या दिवशी दुपारी एक वाजता प्रथम तंबाखू शेतकऱ्यांचा मेळावा घेण्यात आला. सर्वांच्या अपेक्षेहून अधिक शेतकरी मेळाव्यास आले. मेळाव्यानंतर मोर्चा काढून शेतकऱ्यांना कामगारांच्या सभेत नेण्यात आलं. शेतकरी आणि कामगारांचा निपाणीतून संयुक्त मोर्चा निघाला आणि रात्री संयुक्त जाहीर सभा घेण्यात आली.

ह्या संयुक्त सभेत जाहीर करण्यात आलं की, निपाणीमधील तंबाखूचे व्यापारी आणि दलाल कामगार-स्त्रियांचं जितकं शोषण करतात त्याहूनही अधिक पिळवणूक ते तंबाखू उत्पादक शेतकऱ्याची करतात ! ह्या व्यापारी दलालीचा त्या संयुक्त सभेत जाहीर निषेध करण्यात आला.

ह्या संयुक्त मेळाव्यानंतर निपाणीमधील व्यापारी आणि दलाल सावध झाले. त्यानी ओळखलं की, तंबाखू उत्पादक शेतकऱ्याच्या मागे जर विडी आणि तंबाखू कामगार-स्त्रिया उभ्या राहिल्या तर आपली धडगत नाही ! १९८० साली त्यांनी तंबाखू शेतकऱ्याला बऱ्यापैकी दर देऊन टाकला. व्यापारीलोक दर द्यायला तयार झालेले पाहून अकोळच्या शेतकऱ्यांनी जोर धरला आणि रिवाजाच्या नावाखाली वेगवेगळया 'सुटी' (काडीमातीसूट, हवासूट वगैरे) घेतल्या जात होत्या त्या देण्यास नकार दिला. मे १९८० मध्ये व्यापाऱ्यानी तंबाखूची खरेदी व्यवस्थित वजन करून, बरे दर देऊन केली; पण जून महिन्याच्या सुरुवातीला पुन्हा गाडीसूट, काडीमातीसूट वगैरे रिवाज त्यांनी सुरू केले.

त्याला उत्तर म्हणून शेतकऱ्यानी ठरवलं की, 'एंट्री टॅक्स' 'मार्केट सेस्' वगैरे कर भरायचे नाहीत ! मार्केट अॅक्टप्रमाण हे कर व्यापाऱ्यानीच भरायचे असतात. आतापर्यंत निपाणीतील व्यापारी शेतकऱ्याकडूनच ह्या कराची बेकायदा वसुली करत असत. इथून पुढं हा भुर्दंड शेतकरी देणार नाही, त्याचप्रमाणे तंबाखू खरेदीचा 'पट्टी' हातात मिळाल्याशिवाय शतकरी तबाखू देणार नाही, अशा प्रकारचा लढा उभारण्यात आला.

सुभाष जोशी आणि त्याच्या तरुण सहकाऱ्यानी हृया लढयाबाबत शेतकऱ्याला मार्गदर्शन करणारी पत्रक काढून वाटली. सायकलीवरून गावोगाव हिंडून, लहान लहान सभा घेऊन हा विचार शेतकऱ्यापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला – पण हृया सव धडपडीला म्हणाव तसं यश मिळाल नाही. तबाखू उत्पादक शेतकऱ्याच्या मनात दडलेली व्यापाऱ्याची भीती कमी होत नव्हती.

१९८१ चा खरेदी हंगाम सुरू होण्याच्या दोन-तीन महिने अगोदर निपाणी परिसरातील तबाखू उत्पादक शेतकऱ्यांच्यात जागृतीचं वारं वाहू लागल. शेतकरी सघटनेच प्रणते शरद जोशी हृयाच्या चाकणच्या कांदा आंदोलनाची, नासिक येथील उसाच्या लढ्याची इत्थंभूत वार्ता हृया शेतकऱ्यांच्या कानी पडली होती. शरद जोशींनी मांडलेल्या विचारावर हृया परिसरातील शेतकऱ्यांच्यात चर्चा सुरू झाली होती. अकोळच्या तरुण मंडळाचे कार्यकर्ते आणि सुभाष जोशी हृयाच्याशी अनेक शेतकरी संपर्क साधू लागले होते.

हृया वर्षी व्यापाऱ्यानी योग्य दर जाहीर न केल्यास आंदोलन छेडावं असं सर्वानुमते जवळजवळ ठरलंच होत. निपाणीचे व्यापारी अंदाजपत्रक जाहीर झाल्यानतर, तंबाखूवर टॅक्स किंवा ड्यूटी वाढत

की काय, हे पाहूनच भाव जाहीर करतात. त्यांनी योग्य भाव जाहीर केला नाही तर चाकणच्या कांदा आंदोलनाच्या धर्तीवर तंबाखूचं आंदोलन उभं करण्याची सर्वांनी तयारी चालवली होती. पुणे–बेंगलोर रस्ता अडवायचा. रस्त्यावर बैलगाड्या आणून सोडायच्या आणि सरकारला सांगायचं की, शेतकरी सत्याग्रहयांना बैल आणि गाडीसकट अटक करा!

हे आंदोलन करण्यापूर्वी तंबाखू शेतकऱ्यांनी निपाणी ते चिकोडी असा मोर्चा काढायचा आणि प्रांत ऑफिसरला एक निवेदन सादर करायचं – 'व्यापाऱ्यांनी रास्त भाव जाहीर केला नाही तर तंबाखू शेतकरी रस्ता रोको आंदोलन मार्च महिन्यात सुरू करणार! तत्पूर्वी सरकारनं ह्या प्रकरणात लक्ष घालून व्यापाऱ्यांना समज द्यावी अशी शेतकऱ्याची अपेक्षा आहे.'

ज्या प्रमाणात शेतकरी ह्या विचाराला साथ देत होते त्यावरून जर तंबाखू आंदोलन छेडायची वेळ आली तर त्यात फार मोठ्या संख्येनं शेतकरी सामील होणार अशी चिन्हं जानेवारी १९८१ च्या सुमारासच स्पष्ट दिसू लागली होती. निपाणी परिसरातील कर्नाटक सरकारच्या गुप्तहेर खात्यानं ही बातमी गुंडुरावांना कळवलीच असणार – किंवा नसणारही! गुप्तहेर खात्याची ही मंडळी सरकारला खरं काय ते कळवतात की नाही, असा प्रश्न अनेकवेळा पडतो. नासिक आंदोलनात आग्रा रोड बंद करण्यासाठी दीड पावणे-दोन लाख शेतकरी उतरले होते; गुप्तहेर खात्याने मुख्यमंत्री अंतुले-साहेबांना कितीचा आकडा सांगितला हे त्यांचं त्यानाच माहीत!

निपाणी परिसरात एक गोष्ट निश्चित झाली होती. तंबाखूच्या दरासाठी आंदोलनाची वेळ आल्यास फार मोठ्या संख्येनं शेतकरी सत्याग्रहात उतरणार! प्रश्न होता नेतृत्वाचा–आणि सर्व शेतकऱ्यांना नेतृत्व हवं होतं योद्धा शेतकरी शरद जोशी यांचं!

¤

निपाणीमधील दुसरी पहाट. पहाट कसली सूर्य दोन-तीन कासरे वर आलेली ढळढळीत सकाळ म्हणणेच जास्त सयुक्तिक. रात्री खूप उशीरापर्यंत म्हणजे जवळजवळ पहाटेपर्यंत सराशी गप्पा मारत जागलो होतो. सहाजिकच उठायला उशीर झाला.

सरांच्या घरातील इतरांचं सर्व काही केव्हाच आटोपलं होतं. ओशाळलेल्या चेहऱ्यानं मी घाईघाईनं सगळं उरकलं आणि खोटा खोटा 'फ्रेश' चेहरा करून उगाचच वर्तमानपत्रं चाळत लाकडी जिन्याच्या पायरीवर बसून राहिलो. चहा हवा, असा विचार मनात येण्याअगोदरच 'घ्या' म्हणून सुनीताअक्कानं गरमगरम चहाचा एक भला मोठा मग हाती दिला.

चहा पिऊन जरा तरतरी आली तोच आणखी गरम चहा आणि बशी भरून 'हुच्चीद् अवलक्की'–म्हणजे चवदार दडपे पोहे! माझा अत्यंत आवडता पदार्थ! शहरामध्ये आपण मूर्खासारखं 'कॉर्न फ्लेक्स्' वगैरे बेचव कुबट वासाचे पदार्थ उगाचच 'स्टाइल' म्हणून खातो. त्यापेक्षा 'हुच्चीद् अवलक्की' किती तरी पटीनी श्रेष्ठ! व्हिटॅमिन B1, B6, B12 च्या गोळ्या खाण्यापेक्षा दडपे पोहे खाणं जास्त चांगलं.

मला पोहे आवडतात म्हणून कळल्यावर अक्काचा आग्रह विचारायलाच नको! मीदेखील 'काय वाढायचं तितकं वजन वाढू दे', अशा मूडमध्ये! अर्थातच लिटरभर चहा आणि अर्धा किलो दडपे पोहे फस्त. शरीरभर व्हिटॅमिन्स! चिंता नाही!!

'सर' कॉलेजला गेले होते म्हणून मी, बाळासाहेब आणि जाधव ह्या कार्यकर्त्यांच्याबरोबर तंबाखूच्या वखारीतून फेरी मारली. ह्या वखारी म्हणजे साक्षात नरक! कुठल्याही वखारीत पाच मिनिटांपेक्षा जास्त वेळ थांबणं मला जमलं नाही. सर्वत्र तंबाखूची धूळ आणि जीवघेणा खाट. ह्या वखारी पहाताना आपण विसाव्या शतकात नसून मध्ययुगातील गुलामगिरीच्या काळात वावरतो आहोत असं वाटलं, मध्ययुगातील गुलामांची स्थिती देखील ह्या तंबाखू कामगार स्त्रियांपेक्षा कैक पटीनी चांगली असणार!–गुलामाला दोन वेळ भरपेट जेवायला मिळत असे. ह्या कामगार-स्त्रियांना बारा–सोळा तास असल्या भयानक परिस्थितीत काम करून अर्ध्या भुकेची भाकरीदेखील मिळत नव्हती. ज्या तंबाखूवर प्रक्रिया करण्यासाठी ह्या कामगार स्त्रिया रक्त आटवीत होत्या तो तंबाखू पिकवण्यासाठी शेतकऱ्यांनी उपाशीपोटी घाम काढला होता. शेतकऱ्याचा हा तंबाखू स्वस्त दरात लुटून, त्यावर प्रक्रिया करणाऱ्या कामगाराचं शोषण करून देवचंद शहा आणि दलाल स्वत:च्या तुंबड्या भरत होते.

नेहरूचाचा नेहमी म्हणत, 'काळा बाजार करणाऱ्या व्यापारी दलालांना जवळच्या झाडाला टांगून फाशी द्यावं!' आज ह्या चाचांची कन्या आमची पंतप्रधान आहे. इंदिराबाईंनी एकदा निपाणीला अवश्य भेट द्यावी, हजारो कामगार-स्त्रिया कशा पद्धतीनं राबवून घेतल्या जातात हे त्यांनी प्रत्यक्ष पहावं, तंबाखूच्या वखारीत मिनिटभर उभं राहून तंबाखूच्या खाटाचा अनुभव घ्यावा – त्यासुद्धा आपल्या वडिलांप्रमाणे म्हणतील 'अशा प्रकारे शोषण करणाऱ्यांना जवळच्या झाडावर टांगून फाशी द्यावं!' पण आमच्या लाडक्या पंतप्रधान इंदिराजी कधी काळी निपाणीला येतील का? ह्या कामगार-स्त्रियांचं गाऱ्हाणं स्वत:च्या कानानं ऐकतील का?– खरं सांगायचं तर शक्यता कमी आहे उगाच खोटी आशा मनामध्ये धरण्यात काय अर्थ आहे? आपल्या पंतप्रधानांना दिल्लीत अनेक महत्त्वाची कामं असतात, निपाणीसारख्या एका लहानशा गावाला भेट देऊन तेथील स्त्री-कामगारांच्या मामुली समस्यांकडे लक्ष देण्याइतका वेळ त्यांना कुठून असणार!

तंबाखूच्या वखारी बघून, ठसकत, खोकत, डोळ्यातील–नाकातील पाणी पुसत विषण्ण मनानं मी परतलो. 'सर' आले होते. माझी अवस्था बघून म्हणाले, 'काय बघितलंत की नाही, आमच्या कामगार-स्त्रिया किती सुखात आहेत ते!' मी उत्तर देण्याच्या अवस्थेत नव्हतो तरी म्हणालो 'बघितलं– शरद जोशी आणि माधवराव खंडेराव मोरेंनीदेखील हे एकदा बघावं– हा अनुभव घ्यावा अशी माझी इच्छा आहे!'

'मग केव्हा आणता दोघांना सांगा!' सुभाष जोशी काहीसं आतुरतेनं म्हणाले.

**नेहरूचाचा नेहमी म्हणत....काळाबाजार करणाऱ्या व्यापारी-दलालांना....**

' येणं न येणं त्यांच्या हातात मी आग्रह करीन—शरद जोशीच्या· वर नासिक आंदोलनात ३०२ कलमाखाली खुनाचा आरोप ठेवण्यात आला आहे- खुनी शरद जोशी जर अटकेत नसतील तर ते निपाणीला येतीलसुद्धा !'

' मग त्याना आणाच !'

' ते काही माझ्या हातात नाही. त्याचा काय कार्यक्रम आहे त्यावर अवलंबून आहे जर ते इतरत्र कुठे जाणार नसतील तर त्यांनी निपाणीचा दौरा करावा असा मी जरूर आग्रह करीन ! काल भाई धारियानी दिलेली फाईल आणि आग्रहाचं निमंत्रण मी शरद जोशीना नक्की देईन तंबाखूच्या प्रश्नाचा अभ्यास करून ते इकडच्या भागातील शेतकऱ्याला मार्गदर्शन करतील अशी मला खात्री वाटते. शरद जोशीनी जर हा प्रश्न हाताळायचं ठरवलं तर त्याची जी घोषणा आहे 'शेतकरी तितका एक एक' त्यावरून तुम्हाला नासिक, धुळे, जळगाव, चाकण, अहमदनगर येथील शेतकरीदेखील—जरी ते तंबाखू पिकवत नसले तरी—साथ देतील असं मला वाटतं. शरद जोशीच्या विचारानं शेतकरी आज जो जागृत झाला आहे त्यावरून हे गृहीत धरायला हरकत नाही.'

' इतर भागातील शेतकऱ्याच्या पाठिंब्याचं नंतर बघता येईल—आज आमच्या परिसरातील तंबाखू शेतकऱ्याच्यात एकजूट करण्यासाठी शरद जोशी आणि माधवराव खंडेराव मोरेंनी ह्या भागाचा दौरा करणं आवश्यक आहे असं मला वाटतं.'

सुभाष जोशीनी तंबाखू मळून तोंडात टाकली आणि मी सिगरेट पेटवली. बराच वेळ दोघं काहीच न बोलता गप्प होतो. त्यांच्या डोक्यात काय विचार घोळत असतील देव जाणे. माझ्या मनात मात्र 'शेतकरी तितका एकसंध' ही घोषणा घुमत होती.

¤

पुण्याच्या समाजकार्यकर्त्या बाईंना हवी असलेली देवदासी भगिनींची सभा दुपारी भरवण्यात आली. सुभाष जोशीनं पुण्याच्या बाईंना वारंवार सांगितलं होतं— ' मला सभेत बोलायचा आग्रह करू नका!' पण बाईंची हौस दांडगी. देवदासींच्या सभेत आपण अध्यक्षस्थानी बसलो असता सुभाष जोशी भाषण करत आहेत असा फोटो त्यांना हवा असावा. तसा फोटो काढण्यासाठी त्यांनी एका छायाचित्रकाराची नियुक्तीदेखील केली होती. त्यामुळं त्यांनी सुभाष जोशीना चार शब्द बोलायचा आग्रह केला. सुभाष जोशी भाषणात म्हणाले—

' पुण्या-मुंबईला राहून, वर्षाकाठी एक-दोन चकरा मारून, पुण्या-मुंबईत भाषणं करून आणि वार्ताहर-परिषदा भरवून देवदासींची कुठलीही समस्या सुटणार नाही. देवदासीची मुक्ती होणार नाही. जर कुणाला देवदासीचे प्रश्न सोडवायचे असतील तर त्या कार्यकर्त्यांनी स्वत:ला ह्या कामासाठी संपूर्णपणे वाहून घेतलं पाहिजे. यल्लामाच्या यात्रेला एकदा तरी जाऊन, पाच घरी जोगवा मागून एकदा तरी तो अनुभव प्रत्यक्ष घेतला पाहिजे. जोगत्या किंवा जोगतीण बनलं पाहिजे, तरच त्याना हा प्रश्न समजेल!'

पुण्याच्या बाईंच्यावर अर्थातच ह्या भाषणाचा काहीही परिणाम झाला नाही. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्या म्हणाल्या— ' मी तुमचे प्रश्न समजावून घेऊन पुण्याला परतल्यावर तावडतोब एक प्रेस कॉन्फरन्स भरवणार! नंतर मुंबईला एक प्रेस कॉन्फरन्स घेऊन मी बंगलूरला जाणार आणि तिथंही एक प्रेस कॉन्फरन्स घेऊन तुमच्या मुक्ततेसाठी प्रयत्न करणार !' भाषण संपताच बाईंनी सर्वप्रथम निपाणीमध्येच प्रेस कॉन्फरन्स घेऊन देवदासींच्या मुक्तीचा शुभारंभ केला. एखादी जटिल सामाजिक समस्या नुसत्या प्रेस कॉन्फरन्स भरवून सोडविण्याचा प्रयत्न करणं हा प्रकार मला अभिनव वाटला.

बाईंची कटकट एकदाची संपली आणि सुभाषला थोडा निवातपणा मिळाला तेव्हा मी विचारलं— ' सर, काल तुम्ही मला विडी कामगार-स्त्रियांच्या संघटनेची सुरुवात कशी झाली त्याचा इतिहास सांगितलात— पण तंबाखू कामगार-स्त्रियांच्या युनियनची सुरुवात कशी झाली ते कधी सांगणार ?' सर म्हणाले, ' तो इतिहासही गमतीशीर आहे. ऐका—

' निपाणीमध्ये जेव्हा आम्ही विडी कामगार-स्त्रियांचा संप पुकारला, आठ दिवस मालकाच्या घरासमोर धरणे धरून बसलो, बोनससाठी वाटाघाटी केल्या तेव्हा त्या व्यापाऱ्यानं आपल्या तंबाखू वखारीत काम करणाऱ्या स्त्रियांना चिथवलं आणि सांगितलं की, सुभाष जोशीमुळं तुमचा आठ दिवसाचा रोजगार बुडाला आहे. त्याच्या घरावर मोर्चा काढा! त्याच्या घरासमोर धरणं धरून बसा आणि त्याला सांगा आमची नुकसानभरपाई भरून दे !'

' त्याप्रमाणे तंबाखू कामगार-स्त्रिया मोर्चा काढून आल्या. आमच्या दारात बसल्या. म्हणाल्या, सुभाष जोशी कुठं आहे ? आमचा आठ दिवसाचा रोजगार टाक !'

' मी दारातच होतो. मी विचारलं, 'काय म्हणणं आहे तुमचं ?' त्या म्हणाल्या, तुमच्यामुळं आमच्या हजऱ्या बंद झाल्यात. आम्हाला पगार मिळत नाही. आम्ही पोटाला काय खावं ? आता तुम्हीच आमच्या जेवणाची सोय करा, तोपर्यंत आम्ही तुमच्या दारातून उठणार नाही! मी म्हटलं, बसा ! मी जे खातो, माझ्याकडे जे आहे ते सगळं तुम्हाला वाटतो !

' हे चालू असतानाच माझी बायको बाहेर आली. तिला सगळ्या कामगार स्त्रियांनी अतिशय घाणेरड्या शिव्या देण्यास सुरुवात केली. ही बामणीन कुठून आली; ही तूप खाऊन माजली—हिचं तूप बाहेर काढा; हिला धरा ... ∴ वगैरे वगैरे मालकानं जे शिकवलं होतं ते सगळ्याजणी बोलायला लागल्या. खूप गोंधळ माजला.

' मी बायकोला सांगितलं, तू अजिबात वाईट वाटून घेऊ नकोस. आज तुला ज्या बायका शिव्या घालताहेत त्याच तुला थोडे दिवसांनी ' अक्का ' आणि ' वहिनी ' म्हणणार. तू अजिबात काळजी करू नकोस ! माझी बायको म्हणाली, मी अजिबात घाबरत नाही आणि काळजीदेखील करत नाही आणि दारात उभं राहून तिनं कामगार स्त्रियाना सांगितलं—' तुम्हाला काय करायचं ते करा. माझं काही बरं-वाईट झालं तरी मला पर्वा नाही. माझं कुंकू पुसलं गेलं तरी मला त्याची फिकीर नाही.

' माझ्या बायकोचा अवतार बघून तंबाखू कामगार-स्त्रिया थोड्या बिचकल्या. त्यांनी शिव्या देण्याचं बंद केलं. मी त्याना विडी कामगार-स्त्रियांच्या संपाचं कारण समजावून सांगितलं मालकाचे डावपेच काय असावेत त्याची कल्पना दिली.

' तोपर्यंत काय झालं, विडी-कामगार-स्त्रियांना बातमी लागली

की, चाळीस-पन्नास तंबाखू कामगार स्त्रियांनी आमच्या घरासमोर धरणं धरल आहे. त्या चिडल्या आणि एकदम सात-आठशे विडी कामगार स्त्रियाचा खवळलेला मोर्चा आमच्या मदतीसाठी धावून आला. धरणं धरून बसलेल्या तंबाखू कामगार स्त्रिया जीव घेऊन पळत सुटल्या. अंदाजे तीन वर्षांपूर्वीची ही घटना.

' ह्या प्रकरणानंतर मी खूप विचार केला. हे मालक म्हणजे तंबाखू व्यापारी, दलाल किंवा विडी कारखानदार, कामगार-कामगारामध्ये भेद पाडायचा प्रयत्न करतात, तेव्हा त्याचे हे प्रयत्न सर्वांत प्रथम हाणून पाडले पाहिजेत. तंबाखू कामगार-स्त्रियावर मालकाचं प्रचंड दडपण. मालक सागतील ते करायला ह्या बाया तयार ! तेव्हा तंबाखू कामगार-स्त्रियाची संघटना उभी करणं अत्यत महत्त्वाचं आहे ह्याची मला जाणीव झाली.

' तबाखू कामगार-स्त्रियाना संघटित करणं अत्यंत कठीण होतं. मी प्रयत्न सुरू केले. त्याच सुमारास पुण्या-मुबईकडील काही वार्ताहर, लेखक, सामाजिक कार्यकर्ते वगैरे मडळीनी निपाणीला भेटी दिल्या. कुणी काही लिहिलं, काहीनी पुण्या-मुबईला हॉलमध्ये सभा घेऊन भाषणं दिली. पुण्या-मुबईच्या लोकानी चवीनं इकडच्या हकीकती वाचल्या, ऐकल्या, पण प्रत्यक्षात कार्य करायला, मदतीचा हात पुढं करायला एखादा अपवाद वगळता कुणीच आलं नाही. महाराष्ट्रातील बड्या शहरातील, बड्या वर्तुळात निपाणी हा काही काळ चर्चेचा विषय झाला इतकच.

' निपाणीतील देवदासी, विडी कामगार-स्त्रिया आणि तंबाखू कामगार-स्त्रिया ह्याच्या दैनंदिन जीवनात मात्र काहीच फरक पडला नाही. उलट निपाणीबद्दल लिहिणाऱ्याचं आणि बोलणाऱ्याचंच कौतुक होत राहिलं.

' आज सकाळी तुम्ही ज्या तंबाखू वखारीत गेला त्या वखारीचा मालक कामगार-स्त्रियाना फार त्रास द्यायचा. सकाळी कामाला आलेल्या बायाना दुपारी दोन वाजता बाहेर सोडायचा. पुन्हा अडीचला आत घेऊन रात्री एक किंवा दीड शिवाय कामाची सुट्टी करायचा नाही. म्हणजे सोळा-अठरा तास काम आणि मजुरी फक्त तीन-साडेतीन रुपये !

' एकदा काय झालं, दुपारी दोनला जेवणाची सुटी झाली, तेव्हा ह्या तंबाखू कामगार-स्त्रिया अडीच वाजता वखारीत जाण्याऐवजी पावणेतीनला आल्या. मालकान वखारीच दार बद करून घेतलं आणि म्हणाला–तुम्हाला कुणालाच कामावर घेणार नाही. कुठं बोबलत जायचं तिथं जा ! मरा !!

' कामगार-स्त्रिया चिडल्या. कसा कुणास ठाऊक, पण त्याचा स्वाभिमान एकाएकी जागृत झाला. त्यानी ठरवलं की, मालकाच्या वखारीसमोर बसून रहायच. कस काम देत नाही बघू या !–विडी कामगार-स्त्रिया धरणं धरून बसल्यामुळं त्याची युनियन झाली आणि त्याना बोनस मिळाला, हे तबाखू कामगार-स्त्रियानी पाहिलं होत. निपाणीत व्यापाऱ्याविरुद्ध युनियन करून देणारं एक घर आहे हे देखील त्याना माहीत होत. पण त्या घराकडे जायच कसं ? कारण मालकाचं ऐकून ह्या स्त्रिया त्या घरासमोर धरणं धरून बसल्या होत्या, त्या घरातील बाईला वाटेल ते बोलल्या होत्या !–मग जायचं कसं ?

' अखेर त्यानी ठरवलं, नकळत झाली असेल आपल्याकडून एक चूक ! पण त्या घराकडे जायचं !

' त्याप्रमाणे काही तंबाखू कामगार-स्त्रिया मला भेटायला आल्या. मी त्याच म्हणणं ऐकून घेतल आणि तावडतोब वखारीवर गेलो. धरणं धरून बसलेल्या स्त्रियाना सागितलं, मागचं झालं गेलं विसरून जा. तुमची आणि विडी कामगार स्त्रियाची दु.खं एकच आहेत. तुम्हा सर्वांच रक्त पिणारे एकच आहेत ते म्हणजे तंबाखू व्यापारी, दलाल आणि विडी कारखानदार ! हे लोक तुमचं रक्त जसं पितात तसच तंबाखू पिकविणाऱ्या शेतकऱ्याचंही पितात.

' तुम्ही तंबाखू कामगार-स्त्रिया आणि बिडी कामगार-स्त्रिया एकत्र येऊन ह्या व्यापारी–मालकाशी झगडायला तयार झालात तरच ह्यातून काही तरी मार्ग निघणार आहे. तुमची मजबूत एकी पाहिजे. मालकाविरुद्ध आदोलन करावं लागेल, झगडाव लागेल. तुमचा रोजगार काही काळ बंद होईल, उपासमार सहन करावी लागेल. ह्या सगळ्याची तयारी असेल तर मी सागतो ती शपथ घ्या, मी तुमच्या बाजूनं झगडायला तयार आहे. एक गोष्ट लक्षात ठेवा, फक्त मी झगडून उपयोग नाही.तुमचा प्रश्न सोडविण्यासाठी तुम्हाला एकत्र येऊन एकजुटीनं लढून संघटना बाधावी लागेल.

' तबाखू कामगार-स्त्रियानी जेव्हा एकजुटीची शपथ घेतली तेव्हा मी त्याना आश्वासन दिलं की, लेबर ऑफीसरची भेट घेऊन मी त्याच्या कानावर हा सर्व प्रकार घालतो. इतक्यात वखारीचं दार उघडून मालक बाहेर आला आणि म्हणाला, ' मी बायाना वखारीत कामाला घेतो. '

' एकजुटीची नुसती झलक दिसताच मालकानं वखारीचं दार उघडल हे पाहून बायकांचा आत्मविश्वास बळावला. त्या म्हणाल्या ' आम्ही आता कामावर येणार नाही ! तुमचा रोजचा त्रास आम्ही सहन करणार नाही. ह्या प्रश्नाचा एकदाच काय तो सोक्षमोक्ष लागू दे. आमचं काय व्हायचं असेल ते होऊ दे ! ' आणि त्या तंबाखू कामगार-स्त्रिया वखारीसमोर बसून राहिल्या.

' रात्र झाली आणि धरण धरून बसलेल्या कामगार-स्त्रियाच्या जेवणाची काही तरी सोय करणं आवश्यक झालं. तीस नंबर बिडीच्या सपाच्या वेळी आम्ही तरुण कार्यकर्त्यांना टोपल्या घेऊन भाकरी गोळा करायला पाठवलं होत. तसच पुन्हा कराव काय अशा विचारात मी असतानाच आजुबाजूच्या घरातील माणसं आपण होऊन झुणकाभाकर घेऊन आली आणि त्यानी धरणं धरून बसलेल्या बायांच्या भुकेची सोय केली.

' ह्या वखारीभोवती रहाणारी माणसं इथ चाललेला अमानुष प्रकार दररोज बघत होती. वखारीत काम करणारी एखादी कामगार महिला लघवीसाठी बाहेर आली तरी वखारीवरच रहाणारा मालक किंवा त्याची बायको इतक्या घाणेरड्या शिव्या देत की आजु-

**आजूबाजूच्या घरातील माणसं आपणहून झुणकाभाकर घेऊन आली...**

बाजूला रहाणारे लोकदेखील शरमिंदे होत. लघवी करण्यासाठी बाहेर आलेल्या त्या कामगार महिलेची काय अवस्था होत असेल ती तिचं तीच जाणे !

'ह्या सर्व प्रकारामुळे वखारीच्या आसपास रहाणारी सुशिक्षित मध्यमवर्गीय माणसं ह्या पाशवी मालकाच्याबद्दल मनात राग धरून होती. त्यामुळेच धरणं धरून बसलेल्या तंबाखू कामगार-स्त्रियांच्या भाकरीचा प्रश्न सोडविण्यासाठी ही मंडळी स्वयंस्फूर्तीनं पुढं आली. त्यांनी ही जी तत्परता दाखविली त्यामुळं माझं आणि कामगार-स्त्रियांचं नैतिक बळ वाढलं.

'आपण नेहमी सुशिक्षित मध्यमवर्गाला शिव्या देतो की ते चळवळीत प्रत्यक्ष भाग घेत नाहीत; पण आम्हाला मात्र निपाणी-तील ह्या सुशिक्षित मध्यमवर्गानं व्यापारी-दलालांविरुद्धच्या चळवळीला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असं अत्यंत मोलाचं सहाय्य नेहमी दिलं हे सत्य फार थोड्या जणाना माहीत आहे !

'वखारीसमोर पाच-सहाशे कामगार-स्त्रिया धरणं धरून बसलेल्या. तेव्हा ह्या सुशिक्षित मध्यमवर्गीयानी मला सांगितलं की, तुम्ही काही काळजी करू नका ! घरोघर हिंडून त्यांनी भाकरी जमविल्या, एका छोटया किराणा दुकानदारानं डाळीच्या पिठाचं पोतं, तेल, तिखट-मीठ दिलं. तिथल्या तिथं तीन दगड रचून चुली पेटविण्यात आल्या आणि सर्व कामगार-स्त्रियाना झुणका-भाकरीचं जेवण देण्यात आलं.

'हे चालू असताना इतर वखारीतील रात्रपाळ्या सुटल्या. त्या सर्व तंबाखू कामगार-स्त्रिया इथं काय प्रकार चाललाय म्हणून पहायला आल्या आणि बघता बघता दोन–तीन हजार महिलाकाम-गारांचा घोळका वखारीभोवती जमला !'

'सर्वांनीच ठरवलं– उद्यापासून कामावर जायचं बंद ! संघटना करायची !

'दुसऱ्या दिवशी ह्या दोन-तीन हजार बायकानी निपाणीतून मोर्चा काढला. प्रत्येक वखारीवर जाऊन तेथील काम बंद पाडलं आणि अशा रीतीनं त्यांची संघटना जन्माला आली, त्याची त्यांनीच संघटना उभारली. मी फक्त त्याना त्याची दुःखं, त्यांच्याच भाषेत समजावून सांगण्याचं काम केलं.

'तिसऱ्या दिवशी सात-आठ हजार तंबाखू कामगार-स्त्रिया एकत्र आल्या. वखारीसमोर धरणं धरून बसल्या. पुन्हा त्यांच्या भुकेचा प्रश्न निर्माण झाला. ह्याअगोदर शहरातील मंडळींनी पाच-सहाशे बायकाना भाकरी पुरविली होती; पण आता प्रश्न होता सात-आठ हजाराच्या भुकेचा !

'पण गावातील तरुण कार्यकर्ते आणि व्यापारेतर मंडळींनी आम्हाला सांगितलं– काही काळजी करू नका ! आम्ही सर्व व्यवस्था करतो !

'काही कार्यकर्ते पुणे–बंगलूर रस्त्यावर उभे राहिले. प्रत्येक ट्रक थांबवून कार्यकर्ते त्याना आठ हजार स्त्रिया संपावर असून भुकेल्या असल्याचं सागायचे आणि फक्त एक रुपयाची मदत मागायचे. बळजबरी नाही. जो देणार नाही तो पुढे जायचा, देईल त्याचे आभार मानले जायचे. काही तासांतच अडीच-तीन हजार रुपये जमले ! त्याचबरोबर ह्या ट्रकड्रायव्हरामुळे निपाणीतील तंबाखू कामगार-स्त्रियांच्या संपाची वार्ता कर्नाटकभर पसरली !

'ह्या सर्वाचा परिणाम म्हणून तंबाखू वखारीचे मालक वाटाघाटी करायला तयार झाले. आठ तासांची पाळी. मधली सुटी आणि किमान पाच रुपये मजुरी ह्या अटीवर संप मागे घेण्यात आला !

'त्यानंतर मागील वर्षाच्या म्हणजे १९८० दिवाळीच्या वेळी आम्ही विडी आणि तंबाखू कामगार-स्त्रियांच्या बोनसचा प्रश्न मालकांसमोर मांडला. ह्या कामगारस्त्रियांना पगारी सुटी, पगारी रजा, बोनस वगैरे हक्क अस्तित्वात असतात ह्याची कल्पनादेखील नव्हती !

'बँकेच्या नोकरांना एक-दोन महिन्याचा पगार बोनस म्हणून मिळतो, तर दिवसभर काबाडकष्ट करून घाम गाळणाऱ्या ह्या कामगार-स्त्रियांना बोनस का नको ? आम्ही लेबर इन्स्पेक्टरला बोलावून घेतलं आणि त्याला सर्व परिस्थिती समजावून दिली. मालकमंडळीनी बोनस देण्याचं कबूल केलं आणि लेबर इन्स्पेक्टरला त्याप्रमाणे आश्वासनदेखील दिलं; पण प्रत्यक्षात बोनस देण्याचा दिवस उजाडला तेव्हा हे मालक म्हणाले– आम्ही एक पैदेखील देणार नाही ! तुम्हाला काय वाटेल ते करा ! तेव्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारल्याखेरीज आम्हाला दुसरा पर्यायच उरला नाही !

'कामगार-स्त्रियानी सगळ्या वखारीतील काम बंद पाडलं आणि निपाणीमधील चार हमरस्ते जिथं मिळतात त्या चौकात हजारो कामगार-स्त्रिया दुपारी दोन वाजता ठाण मांडून बसल्या. रात्रभर चौक बंद राहिला. दुसऱ्या दिवशी दहा वाजता मालकमंडळी बोनस-संबंधी वाटाघाटी करायला तयार झाली !

'आणि अखेरीस तीन महिने ज्यांनी काम केलं असेल त्याना पंचेचाळीस रुपये आणि तीन महिन्यावर काम केलेल्याना साठ रुपये एवढा मामुली बोनस देण्याच्या अटीवर तंटा सुटला ! बोनसची रक्कम जरी मामुली असली तरी त्या निमित्तानं एक प्रथा सुरू होत आहे हे ध्यानात घेऊन आम्ही मुद्दामच मालकमंडळीशी वाद वाढवला नाही !

'त्याच सुमारास 'साबर विडी' नावाचा कारखाना मालकानं अचानक बंद केला आणि तो निपाणी सोडून निघून गेला ! तिथं काम करणाऱ्या कामगार-स्त्रिया कारखान्यात धरणं धरून बसल्या. कार-खान्याच्या मालकांनी मग पोलिसात तक्रार नोंदवली.

'निपाणीत एक फार मोठी अडचण आहे. इथ जवळजवळ बारा-पंधरा हजार विडी आणि तंबाखूकामगार असूनदेखील लेबर-ऑफिस नाही ! ऑफिस चिकोडी ह्या तालुक्याच्या ठिकाणी आहे. त्यामुळं इथं काहीही समस्या निर्माण झाली की चिकोडीला जावं लागतं आणि तिथं गेल्यावर लेबर ऑफिसर जागेवर सापडतीलच अशी शक्यतादेखील कमी असते. त्यामुळं कामगारांची फार कोंडी होते. निपाणीतील एकमेव सरकारी ऑफिस म्हणजे स्टेशन !

'साबर विडीच्या मालकानं पोलिसात तक्रार केली. दिवाणी कोर्टात जाऊन वीस हजार रुपयांची डिक्री लावली आणि बेकायदे-शीर ट्रेसपास म्हणून दावा लावला. कोर्टाकडून इंजक्शन् ऑर्डर मिळणार ह्याची आम्हाला कल्पना होतीच. मालकाला कोर्टाचा हुकूम मिळण्याच्या आत आम्ही त्याला म्हटलं, तुझा कारखाना ताब्यात घे !

'त्यांनी कारखाना ताब्यात घेतल्यानंतर कारखान्याच्या बाहेर कामगार-स्त्रियांनी मालकाला घेराव घातला. त्या म्हणाल्या कोर्टाच्या आज्ञेप्रमाणे आम्ही तुला कारखाना ताब्यात दिला. आता प्रश्न सोडविण्यासाठी काय करतोस बोल! कोर्टाच्या आज्ञेप्रमाणे कारखान्याचा ताबा दिल्यामुळं हुकूमभंग केल्याचा किंवा कोर्टाचा अवमान केल्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असं कामगार-स्त्रियाचं म्हणणं होतं. मालकाला घेराव घालून त्या म्हणत होत्या, आमचं, काम कधी सुरू करणार ते सांग, त्याशिवाय आम्ही तुला सोडणार नाही!

'साबार विडीवाल्याला त्याचा कारखाना ताब्यात दिल्यावर कामगार-स्त्रियांनी खबरदारी घेऊन कारखान्याच्या आवाराबाहेर त्याला घेराव घातला होता. त्यामुळं बेकायदेशीर ट्रेसपास वगैरे तो म्हणू शकत नव्हता. घेरावे घालून अडवणे हे बेकायदेशीर कृत्य होऊ शकतं–पण आम्ही जाणूनबुजून कायदेभंग करतोय तेव्हा तुम्हाला काय करायचं ते करा असं कामगारस्त्रियानी त्याला स्पष्टपणे सुनावलं!

'असा काही तरी प्रकार घडणार ह्याची पोलिसांना कल्पना असावी. त्या दिवशी निपाणीत डी. एस. पी. सशस्त्र पोलिसाची तुकडी घेऊन हजर होते. ते सांबरवाल्याच्या मदतीला धावून आले. पोलिसांनी हातामधील लाठ्या आडव्या धरून फळी केली आणि कामगार-स्त्रियांना मागे रेटून मालकाला घेराओतून सोडवलं आणि दोन-तीन पोलिसांनी अक्षरशः मालकाला गणपतीसारखं उचलून जीपमध्ये घातलं आणि जीप पोलीसकचेरीच्या दिशेनं पळवली.

'पोलिसांच्या मदतीनं मालक पळून जातोय हे बघितल्यावर कामगार-स्त्रिया जीपच्या मागून धावत सुटल्या. त्यापैकी पन्नासएक बायका पोलीसस्टेशनच्या जवळ जाऊन पोहोचल्या. पोलिसानी मालकाला कचेरीमध्ये सुरक्षित जागी बसवलं आणि बाहेर येऊन ह्या पन्नास कामगार स्त्रियावर अश्रुधूर सोडला!

'अश्रुधुराची नळकाडी फुटू लागली तेव्हा तो धूर जवळपासच्या तंबाखू वखारीत शिरला. डोळे का चुरचुरायला लागले म्हणून तंबाखूस्त्रिया बाहेर पडल्या. बाहेर येऊन बघतात तर हा सगळा प्रकार! बंदुका-लाठ्या धारण केलेले पोलीस, अश्रुधुरामुळं हैराण झालेल्या बायका, धावपळ, गडबड, गोंधळ बघून त्यांना वाटलं 'आपल्या सराना पोलिसांनी काही तरी केलं'– आणि त्या सगळ्या पोलीसस्टेशनच्या दिशेनं धावत सुटल्या!

'ह्या कामगार-स्त्रियांचं नेतृत्व करणारी एक अतिशय धाडसी, वीरमहिला आहे. आयेशा दिवान. सगळे त्यांना 'चाची' म्हणून ओळखतात. मालकमंडळीचा आणि पोलिसांचा चाचीवर दात आहे. ह्या गोंधळाचं निमित्त करून आठ पोलिसांनी चाचीला घरातून ओढून बाहेर काढलं आणि लाथा-बुक्क्यानी अक्षरशः तुडवून काढलं! लाठ्यांनी झोडपून काढलं. चाची वाघिणीसारखी चवताळली. उडी मारून उठली आणि एका पोलीसअधिकाऱ्याच्या मिशा तिनं दोन्ही हातानी गच्च पकडल्या. तो लागला बोंबलायला. तेव्हा इतर जण मागे हटले. अशी ही बहादुर महिला! तुम्ही तिची मुलाखत अवश्य घ्या!

'तर चाचीला जेव्हा बेदम मार पडला तेव्हा मी विचार केला की, आता जर ह्या कामगार-स्त्रिया पोलिसाना सामोऱ्या गेल्या तर निश्चित गोळीबार होणार, विनाकारण प्राणहानी होणार, हिंसाचार घडणार –हे सगळं टळावं म्हणून मी सगळ्या कामगार-स्त्रियांना एकत्र केलं आणि एका मैदानात आणून बसवलं. पोलिसानी ताबडतोब येऊन आम्हाला गराडा घातला!

'एका पोलीसअधिकाऱ्यानं मला बोलावलं आणि तो म्हणाला, आम्ही १४४ कलम पुकारलं आहे. तुम्ही पाच मिनिटात ह्या कामगार-स्त्रियांना पांगायला सांगा आणि पोलीसस्टेशनमध्ये साबरविडीचे मालक बसले आहेत त्याच्याशी वाटाघाटी करायला आमच्याबरोबर चला!

'त्याप्रमाणे मी कामगार-स्त्रियांना आवश्यक त्या सूचना दिल्या, घरोघरी परतायला सांगितलं आणि चार-पाच कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन संध्याकाळी साडेसहाच्या दरम्यान पोलीसस्टेशनवर गेलो.'

'तिथं गेलो पण वाटाघाटीचं किंवा चर्चेचं कुठलंच चिन्ह दिसेना. आम्हाला पोलिसानी नुसतंच बसवून ठेवलं. रात्री आठच्या सुमारास निरोप आला की, गावात जोरदार दगडफेक व दंगा सुरू झाला आहे. माझ्या घरावर दगडफेक चालू आहे आणि दोन बसेस देखील पेटविण्यात आल्या आहेत! ह्या गुंडगिरीमागे कुणाचा हात असावा हे सांगण्याची गरजच नव्हती. दंगलीची बातमी मिळून सुद्धा पोलीस-स्टेशनवरचे अधिकारी आणि पोलीस शांत होते. ह्यातही आश्चर्य वाटून घेण्यासारखं काही नव्हतं.

'आम्ही कचेरीत नुसतेच बसून. चर्चा नाही, वाटाघाटी नाहीत. रात्री साडेनऊच्या सुमारास पोलिसांनी जेवण मागवलं तेव्हा मी म्हणालो, मी एका वर्तमानपत्राचा रिपोर्टर आहे. मला फोन करून ही बातमी माझ्या पेपरला कळवली पाहिजे; पण पोलिसानी फोन करण्यास मनाई केली आणि रात्री चिकोडीला नेलं.

'रात्री मी चिकोडीला पोलीसकस्टडीत राहिलो. दुसऱ्या दिवशी सकाळी सहा-सात वाजले तरी माझा पत्ता नाही असं पाहून माझी बायको पोलीसस्टेशनवर गेली. तिथं डी. एस. पी. होता. त्याला माझ्या बायकोनं विचारलं– माझा नवरा कुठं आहे सांग! पण कुणी धड उत्तर देईनात. तेव्हा माझी बायको भडकली आणि म्हणाली, 'मी काही भीक मागायला आले नाही. माझ्या नवऱ्याला तुम्ही कुठं ठेवलंय तेवढं सांगा, पुढचं कायदेशीर काय करायचं ते मी बघून घेईन! शेवटी डी. एस. पी. नं सांगितलं की मला चिकोडीला ठेवलंय.

'त्यानंतर, व्यापाऱ्याच्या ज्या मुलानी आणि गुंडानी आमच्या घरावर दगडफेक केली त्याची नावं सांगून माझ्या बायकोनं डी. एस. पी. कडे तक्रार केली; पण पोलीस तक्रार नोंदवून घेईनात. टाळाटाळ करू लागले. शेवटी बायकोनं लेखी निवेदन दिलं; पण त्याबाबत-देखील कसलीही तातडीची हालचाल करण्यास पोलिसानी नकार दिला.

## चाची...एक बहादुर महिला!

'इथं चिकोडीमध्ये मला दुसऱ्या दिवशी कोर्ट संपल्यानंतर मॅजिस्ट्रेटसमोर हजर करण्यात आलं. मॅजिस्ट्रेट म्हणाले, 'घरी केस चालविण्याची माझी पद्धत नाही, उद्या कोर्टात हजर करा!' त्याप्रमाणे तिसऱ्या दिवशी साडेतीन वाजता मला कोर्टात हजर करण्यात आलं. सरकारी वकिलांनी नेहमीचे आक्षेप घेतले; पण मॅजिस्ट्रेटनी मला सोडलं आणि मी ताबडतोब निपाणीत परतलो.

'गावात १४४ कलम जारी होतं. दंगल होऊन गेली होती. मी बहुतेक लवकर सुटणार नाही अशी व्यापारी-दलालांची अपेक्षा असावी. त्यानी दंगलीचं निमित्त करून सर्व तंबाखूवखारी बेमुदत बंद करण्यात आल्याचं जाहीर केलं होतं. संघटित झालेल्या कामगार-स्त्रियांना बेरोजगार करण्याचा त्यांचा उद्देश उघड दिसत होता.

'मी चिकोडीहून सुटून आलो तेव्हा सगळ्या कामगार-स्त्रिया आमच्या घरी जमा झाल्या त्याच्यापैकी कुणीही खचलेलं, घाबरलेलं किंवा निराश झालेलं नव्हतं उलट त्यांचं मनोधैर्य वाढलं होतं—जबर आत्मविश्वास निर्माण झाला होता.

'पोलिसाच्या एक गोष्ट ध्यानात आली होती, वखारी अशाच बंद राहिल्यामुळं बेरोजगार झालेल्या ह्या कामगार-स्त्रिया जर पुन्हा रस्त्यावर आल्या तर परिस्थिती काबूत ठेवणं कठीण होणार! तशात व्यापारी आणि त्यांचे हस्तक हातामध्ये लाठ्या घेऊन निपाणीत गटागटानं फिरून वखारीच्या आसपास गस्त घालू लागल्यामुळं वातावरण अधिकच तंग होत चाललं.

'चिकोडीच्या कोर्टातून सुटून आल्यावर मी निपाणीत परतलो त्या रात्री कोल्हापूरला फोन करण्यासाठी म्हणून मी घराबाहेर पडलो. एकटाच होतो एका चौकात हे वखारमालक आणि त्यांचे साथीदार लाठ्याकाठ्या घेऊन उभे होते. मला बघताच काय झालं कुणास ठाऊक ही माणसं तोंड लपवत तिथून पसार झाली!

'होता होता वखारी सुरू झाल्या. काही मालकांनी बरंचसं काम आजूबाजूच्या खेड्यांतून स्वस्त मजुरीत करून घ्यायला सुरुवात केली आणि आता विडी आणि तंबाखू कामगार-स्त्रियांच्या लढ्याच्या दुसऱ्या पर्वाची सुरुवात झाली आहे. तंबाखूउत्पादक शेतकऱ्यांनी जर आंदोलन करायचं ठरवलं—त्या आंदोलनाला शरद जोशीसारख्या असामान्य माणसाचं नेतृत्व लाभलं तर १९८१–८२ हे वर्ष तंबाखू शेतकरी आणि विडी व तंबाखू कामगार ह्यांच्या भविष्याच्या दृष्टीनं अनन्यसाधारण महत्त्वाचं ठरणार!'

¤

एका स्वयंसेवी संस्थेच्या संचालकाच्या विनंतीवरून, निपाणी येथे देवदासींच्या मुलींसाठी एखादे वसतिगृह स्थापन करण्याविषयीच्या योजनेची शक्याशक्यता पडताळून पाहण्यासाठी मी येथे आलो होतो. त्याविषयी एक प्राथमिक अहवाल तयार करण्याइतपत माहिती मी मिळविलीदेखील होती; पण त्याव्यतिरिक्त निपाणीतील विडी आणि तंबाखू कामगार-स्त्रिया आणि तंबाखू उत्पादक शेतकरी ह्यांचं व्यापारी आणि दलाल ह्यानी चालवलेलं अमानुष शोषण, ह्या शोषितांच्या लढ्याचा-आंदोलनाचा इतिहास, ह्या परिसरातील पोलिसाची 'कायदा आणि सुव्यवस्था' ह्यांचं रक्षण करण्याची जगावेगळी तऱ्हा, हे सर्व ऐकून मन सुन्न झालं होतं. निपाणी हे स्वतंत्र भारतातील एक गाव आहे ह्यावर विश्वास ठेवणं कठीण झालं होतं.

दोन दिवस प्राध्यापक सुभाष जोशीबरोबर मनमोकळ्या गप्पा मारल्या तेव्हा एक गोष्ट प्रकर्षानं माझ्या ध्यानात आली होती. हा प्राध्यापक बोलताना 'पुरोगामी' 'बांधिलकी' व 'विषमता निर्मूलन' असले फसवे आणि वापरून गुळगुळीत झालेले शब्द चुकून सुद्धा वापरत नव्हता. त्याचप्रमाणे त्याच्या विचारसरणीला कुठल्याही 'इझम्'चा वास मारत नव्हता. प्रत्यक्ष अनुभवातून त्याची विचारसरणी जन्मली होती, पोथी वाचून नव्हे! कुठल्याही राजकीय पक्षाचा पगडा देखील त्याच्या विचारसरणीवर दिमत नव्हता! हे कसं काय?—उत्तरादाखल सुभाष म्हणाला—

'त्याला अनेक कारणं आहेत! पूर्वी अगदी सुरुवातीला मी समाजवादी पक्षात होतो. त्या पक्षातील तथाकथित मोठ्या नेत्यांच्या सान्निध्यात मी जेव्हा आलो तेव्हा ही सर्व माणसं अत्यंत खुजी आहेत हे सर्वप्रथम माझ्या ध्यानात आलं! त्याउलट एखादा हमीद दलवाई! हमीद दलवाईसारखा माणूस मनाचा अतिशय मोकळा असतो, त्याला कुठल्याच पक्षाची बांधिलकी नसते आणि त्यामुळंच तो स्वतःची विचारसरणी पक्की आणि शाबूत ठेवून विधायक काम करू शकतो हे मला प्रकर्षानं जाणवलं.

'हमीद दलवाई सुरुवातीला एखाद्या पक्षात असतीलही; मला त्याची कल्पना नाही; पण जेव्हा त्यांनी मुस्लिम सत्यशोधकाचं काम हातात घेतलं तेव्हा ते संपूर्णपणे स्वतंत्र आणि कुठल्याही पक्षाशी संबंध न ठेवता कार्य करीत. त्यांचं वाचन अफाट! त्यांच्या सहवासात मी खूप शिकलो. कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंध नसताना देखील चांगले कार्यकर्ते आणि सामान्य लोक हमीद दलवाईंच्या मागे उभे राहिले. राजकारण्यांशी त्यांचा संबंध नसल्यामुळंच त्यांना हा पाठिंबा मिळाला अशी माझी तेव्हा खात्री पटली.

'हमीद दलवाई रात्री-अपरात्री कुठंही एकटे बेधडकपणे हिंडत, भीती हा शब्दच त्यांना माहीत नव्हता. हमीद दलवाई एक बुलंद व्यक्तिमत्त्व होतं. त्यांच्या सहवासात घालवलेले दिवस मी कधीही विसरणार नाही. त्यांच्याबरोबर मी खूप हिंडलो.

'हमीद दलवाई इथं आले होते तेव्हा देखील मध्यरात्रीनंतर त्यानी सगळी निपाणी पालथी घातली. वास्तविक निपाणीत मुसलमानवस्ती बरीच! मुस्लिमाविरुद्धची हमीद दलवाईंची इथली भाषणं गाजलेली! तरी इकडच्या परिसरात बेरात्री पायी फिरताना भीतीचा स्पर्श देखील त्यांच्या मनाला झाला नाही.

'त्याउलट हे समाजवादी! त्यांचं मालवणला अधिवेशन झालं तेव्हा मी गेलो होतो. सगळे नुसते बोलणारे वाचाळूर! त्या भाषणात पन्नालाल सुराणांनी जाहीर केलं की, 'एक गाव एक पाणवठा' कार्यक्रमाला आपण संपूर्ण एक वर्ष वाहून घेणार!

'अधिवेशन संपल्यानंतर मात्र हा माणूस एक गाव—एक पाणवठा कार्यक्रमासाठी कुठं फिरताना दिसेना. तेव्हा मी पत्र पाठवून विचारणा केली की, अधिवेशन संपून सहा महिने झाले; पण तुम्ही आश्वासन पूर्ण केलेलं दिसत नाही. तुम्ही एकाही पाणवठ्यावर गेल्याचं ऐकिवात नाही. हे कसं काय?—पत्राला अर्थातच त्याचं उत्तर आलं नाही. अपेक्षितदेखील नव्हतं!

'हे मार्क्सवादी, लोहियावादी ह्या सर्वांची हीच तऱ्हा! ह्यांचं

शब्दभांडार विपुल. प्रत्यक्ष कार्य अत्यंत कमी–आणि जे असेल ते केवळ स्वत:चा मोठेपणा टिकविण्यासाठी किंवा वाढविण्यासाठी केलेलं !

'हे सगळं अनुभवताना माझ्या असं ध्यानात येऊ लागलं की, काही माणसं विशिष्ट बाबतीत मोठी जरुरीची असतात–पण त्यांच्या त्या एखाद्या विशिष्ट मोठेपणामुळं भारावून जाऊन आपण जर त्यांच्यामागं लागलो तर आपली फार मोठी फसगत होते. तेव्हापासून मी ठरवलं की, ह्या माणसांचा सहवास घडला तर त्यांच्यापासून आपल्या अनुभवाला पटेल तेवढंच निवडून घ्यायचं–आंधळेपणानं त्यांच्या मागं फिरायचं नाही.

'तंबाखूच्या प्रश्नाबाबतचा अनुभव हेच सिद्ध करून गेला. आणीबाणीनंतर जनता पक्षाच्या मागं आम्ही मनामध्ये फार मोठी आशा बाळगून गेलो. मोहनभाई धारियासारखे आमच्याच भागातील पुढारी दिल्लीत खुर्चीवर बसलेले–तेव्हा आता आपल्याला खरं 'स्वराज्य' मिळणार !–इथून पुढं आंदोलनं करण्याची गरज नाही असा समज आम्ही करून घेतला.

'त्याच्याबरोबर जॉर्ज फर्नांडिसही दिल्लीला खुर्चीत. हे देखील आपलेच. तळागाळातील लोकांच्याबद्दल सदैव अपार सहानुभूती दाखविणारे डावेदेखील केंद्रसरकारमध्ये खुर्चीवर ! तेव्हा आता आपले प्रश्न चुटकीसरशी सुटणार अशी आम्ही समजूत करून घेतली.

'ह्या भ्रमाचा भोपळा मात्र कल्पनेपेक्षा लवकर फुटला. ज्याना आपण 'आपले' समजतो तेदेखील सत्तेवर आल्यानंतर 'आपले' राहात नाहीत हे कटू सत्य उमगल्यावर कुठल्याही पक्षाशी सबंध ठेवण्यात काहीही अर्थ नाही असं जर खऱ्या कार्यकर्त्याला वाटू लागलं तर त्यात आश्चर्य वाटायचं कारण नाही.

'निवडणुकीच्या वेळी काही पुढारीमंडळी प्रलोभनं दाखवायला येऊन गेली. ते म्हणत, तुमची संघटना मोठी आहे, तुम्ही आमच्याबरोबर प्रचाराला या. पुढच्या खेपेला तुम्हालाच आम्ही पक्षाचं तिकीट देऊ !–पण मी कुणाच्याच प्रचाराला गेलो नाही. ह्या राजकारण्यांचा मला पुरेपूर उबग आला होता.

'आम्ही आमचं धोरण आता पक्कं केलं आहे. आमच्या संघटनेला साथ द्यायला कुणी आपण होऊन पुढं येत असेल तर आम्ही त्याला झिडकारत नाही; पण आम्ही होऊन कुणाला बोलवायला जात नाही !'

राजकारणी मंडळीविषयीची आपली भूमिका स्पष्ट शब्दात सांगत असताना हा झुंजार प्राध्यापक एकाएकी काहीसा भावनावश झाला आणि दाटलेल्या कंठानं म्हणाला–

'तुम्हाला काय सांगू विजयराव, जीव गुदमरवून टाकणाऱ्या तंबाखूच्या वखारीत सोळा-अठरा तास काम करून थकलेली, डोक्यावरच्या केसांपासून पायाच्या नखापर्यंत तंबाखूच्या धुळीनं माखलेली, अर्धपोटी स्त्री पाहिली की डोकं सैरभैर होऊन जातं आणि कमलदलाप्रमाणे कोमल हात असणाऱ्या, चांदणं पिपीत जाणाऱ्या स्त्रियांचं वर्णन करणाऱ्या आमच्या 'संवेदनाक्षम' लेखक–कवींना आमच्या कामगार-स्त्रीची खरी ओळख कधीच पटणार नाही अशी मला खात्री वाटते !

'ह्या तंबाखू कामगार स्त्रियानी चांदणं बघितलं असेल तर ते रात्रपाळीचं काम संपवून धावत–पळत, डोंगर चढत, पाच मैलांवरील घर गाठतानाच !

'शहरी लेखक किंवा कवी आपल्या प्रेयसीचं वर्णन करताना तिच्या शरीराचा मदमस्त सुगंध किंवा सुगरणपणा ह्याची खुसखुशीत वर्णनं करतात. त्यांच्या कवितेतील स्त्रिया आपल्या प्रियकराबद्दल किंवा पतीबद्दल असलेली 'ओढ' शृंगारिक भाषेत व्यक्त करतात ! ह्या तंबाखू कामगार-स्त्रीला किंवा तिच्या पतीला अशा भावना नसाव्यात का ?– पण त्यांच्या अडचणी, व्यथा, पुण्या–मुंबईच्या लेखक–कवी वगैरे मंडळींना कधी कळणार का ? ही प्रतिष्ठा पावलेली लेखक-कवी मंडळी 'सेक्स', त्यातून येणारं वैषम्य वगैरे भलतंच काही तरी चघळत बसली आहेत, असं मला कधीकधी वाटतं. ही सर्व मंडळी अधांतरीच चालत असावीत !

'मध्यंतरी पुण्यात आलो तेव्हा एका मित्राच्या घरी गेलो. रविवार होता. टिव्हीवर एका विनोदी लेखकाचा 'विनोदी' कार्यक्रम चालू होता. सर्वजण मनमुराद हसत रस घेऊन कार्यक्रम पहात होते. मला मात्र उगाचच खिन्न वाटत होतं. मराठी साहित्य असं मध्यमवर्गातच अडकून रहाणार का ?– सेल्फकंटेन्ड फ्लॅट, चाळ किंवा शहरी झोपडपट्टी ह्यामधून ते कधीच बाहेर पडणार नाही का ?

'हे साहित्यिक लोक सभा-संमेलनातून सामाजिक अनुबंध वगैरे मोठे मोठे शब्द वापरतात, पण एका तरी मान्यवर साहित्यिकानं आज जी शेतकरी आंदोलनं चालू आहेत त्यामध्ये निदान अनुभव घेण्यासाठी म्हणून जाण्याचा प्रयत्न तरी केला आहे का ? ही सगळी मंडळी आपआपल्या खुराड्यात खुडुक कोंबडीप्रमाणे बसून आहेत. ज्या शेतकऱ्यानं पोलिसांचा लाठीमार, गोळीबार, जेल ह्या कशाचाच ह्यापूर्वी अनुभव घेतला नव्हता त्याची आंदोलनाच्या काळात आणि नंतर मन:स्थिती कशी असेल ह्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न कुठल्या तरी विचारवंत साहित्यिकानं केला का ? शेतकऱ्यांच्या बदलत्या मनोवृत्तीचं आपल्या वाङ्मयातून चित्रण कधी होणार ? आणि हे जर होणार नसेल तर सामाजिक अनुभूती–सामाजिक अनुबंध वगैरे शब्द वांझोटे नाही का ठरणार ?'

माझ्या मनासमोर प्रश्नांची अनेक वलयं निर्माण करून सुभाष जोशी बोलायचं थांबले. त्यांच्या कुठल्याच प्रश्नाला देण्याजोगं उत्तर माझ्यापाशी नव्हतं. 'सर' दोन्ही गुडघ्यांना मिठी मारून समाधिस्थ बसले होते. हलक्या आवाजात मी म्हणालो–

'सर, उद्या मी पुण्याला परत जावं म्हणतो. त्याआधी एखाद्या तंबाखू व्यापाऱ्याची आणि 'चाचो'ची मुलाखत घ्यायला मिळाली तर बरं –...'

( क्रमशः )

रंगभूमी । सदानंद बोरसे

# चि. सौ. कां. चंपा गोवेकर

## मतकरी टांकसाळीतून पडलेले आणखी अेक नाणे

सध्या मराठी रंगभूमीवर 'लेखक–दिग्दर्शक –रत्नाकर मतकरी' या नावाची टाकसाळ फार जोरात चालू आहे. विशेषतः '*लोककथा–७८*' हे *त्यातून पडलेले बंदे नाणे* बरेच खण् खण् वाजले ! तेव्हापासून रुपयापासून अर्ध्या, पाव पैशापर्यंत जी बरीच नाणी त्यातून बाहेर पडली त्यापैकीच 'चि. सौ. कां. चंपा गोवेकर' हे ××× किमतीचे नाणे. (माहीत असलेली कमीत कमी रक्कम फुल्यांच्या जागी भरावी.) मतकरींच्या प्रतिभेवर अिटालियन छत्राचा अंमल सुरू झाल्यानंतर हे नाणे चलनात आले, अशी माहिती अधिक विचारणा केली असता मिळाली.

जुन्या 'नटी–सूत्रधार' प्रवेशाच्या टिंगलीचे नमन होऊन नाटकाला सुरुवात होते. त्या सुरुवातीमध्येही एक 'तीन पैशाचा तमाशा–' टच दिलेला. म्हणजे काय ? तर पात्रे माअीक हातात धरून आणि थोडेसे तालबद्ध अंगविक्षेप करीत 'चि. सौ. कां. (ढॅण्) चंपा गोवेकर्र्र्र्र्ऽऽ – जी जी रं, जी जी रं, जी जी रं, जी ऽऽ' असा एक पाश्चात्य पोवाडा बॅंडच्या तालावर म्हणतात आणि त्यातून पुरेशी कथापार्श्वभूमी तयार करतात. मुंबापुरीत राहणारा चारुदत्त धुरंधर (श्रीकांत मोघे) हा शारीरिक वयाने चाळिशीचा पण मानसिक वयाने 'अजून यौवनात मी' असलेला श्रीमंत गृहस्थ. ह्या चारुदत्त चि. कु. चंपा गोवेकर (दया डोंगरे) नामक अेक वसंतसेना लग्नाशिवायच सुमारे वीस वर्षे बाळगून आहे. चाळिसाव्या वर्षी पुन्हा शारीरिक तारुण्याची भावना झाल्यामुळे चारुदत्त पुन्हा लग्न करायचे ठरवतो. (पुन्हा पहिली बायको वीस वर्षांपूर्वीच वारलेली.) पण ते चंपूशी नाही; तर जया रायबागकर (पद्मश्री जोशी) नावाच्या अेका अठरा-अेकोणीस वर्षांच्या छबकडीशी. हे कळल्यावर चंपा बिथरते आणि वैवाहिक आजार ओढवून घेते. चारुदत्तच्या घरचा नोकर–कम्–मित्र *नाथा* (किंवा मैत्रेय), मोलकरीण मोगा आणि चारुदत्तचे फॅमिली डॉक्टर डॉ. शहाणे हे सगळेच चारुदत्ताच्या विरुद्ध वसंतसेनेला सामील. ते एकसाथ वसंतसेना मृत्युशय्येवर असल्याचा निर्णय घेतात आणि मरणाऱ्याची *अखेरची अिच्छा म्हणून चंपाचे आणि* चारुदत्तचे तडकाफडकी लग्न लावून टाकतात. (यानतर लग्न लागताना पुन्हा 'तीन पैशाचा तमाशा' टच्; म्हणजे चारुदत्त माअीक हातात घेऊन 'मला मुळी समजत नाही, *मी जागा आहे का स्वप्नात*' असे गाणे म्हणत हिंडत असताना लग्नाची तयारी चालू. ती पूर्ण झाल्यावर गाणे बंद.) लग्न लागल्यानंतर 'औषध न लगे मजला' म्हणत चंपयंती उठून बसते आणि आपला 'अहेवपणी मरण यावे' हा मुखवटा काढून लग्नाचे खरे कारण सांगते, ते असे–

'मला अनुक्रमे वीस, अठरा व सोळा (वयाची चूकभूल द्यावी घ्यावी.) वर्षांचे तीन मुलगे असून त्यांना तुमचं नाव लावायला मिळावं म्हणून मी तुमच्याशी लग्न केलं.' हा पहिला धक्का प्रेक्षकांना बसावा, अशी अपेक्षा असताना या ठिकाणी प्रेक्षक पहिल्या डुलकीतून बाहेर येत चहा, वडे घेण्यासाठी बाहेर पडतात. काही जण सर्व नाटक लक्षात आल्याने पार नाट्यगृहाच्या बाहेर पडले असतील !

नंतर मग 'माझ्या तीन मुलांपैकी एक मुलगा तुमचा आहे.' असे सांगून चंपा चारुदत्तला आधी बुचात, मग कळघात आणि मग बुचकळ्यात पाडते. मग 'तो कोण ? ते सांग.' असे विचारत चारुदत्त आधी चंपाच्या मागे, मग पायी लागतो. ती युक्ती लढवून आपल्या पोरांचे सर्व भले करून घेते. अखेरीस 'पपा' म्हणत बिलगणाऱ्या पोरांना चारुदत्त जवळ घेतो, 'तेचि पुरुष दैवाचे, डोळे भरले आसवांनी, अशी पोरे स्वये येवुनी बिलगुन झटती अंगा ते' असे म्हणत चि. कु. चंपा गोवेकरला चि. सौ. का. चंपुताई धुरंधर करून टाकतो आणि अडलेल्या प्रेक्षकांची सुटका करतो.

दरम्यानच्या *काळात* (१) लग्न नव्हे विघ्न (२) मी अडाणी बाई, लिहिणं-वाचणं फारसं नाही (या गाण्याने सर्वात त्रास दिला– लावणीप्रमाणे त्या अडाणी बाईने म्हटलेल्या ओळी 'ही अडाणी बाई, लिहिणं-वाचणं फारसं नाही, *आम्हा विद्वानांची हिला* भाषा समजत नाही' असे मामुली बदल करून बाकीच्यांनी घोळवणे. त्या वेळी जयाने किनऱ्या आवाजात 'आऽ आऽ' असे ओरडत बागडणे हे सगळेच प्रकार तापदायक होते.) (३) *गेले रेऽ ते दिवस्* (४) चंपाच्या सगळ्या मुलाचे एक समूहगीत (५) चि. सौ. कां. चपूताई धुरंधर असा वारंवार 'ति पै त'–टच् आहेच. या सगळ्या वेळी प्रारंभीचे माईक उचलणे आणि नंतर *पुढच्या गाण्याच्या सुरुवातीला तो ज्या* जागी हवा असेल, त्या जागी खुपसणे या हालचाली त्यांच्या कृत्रिमपणामुळे संपूर्ण नाटकभर ठिगळाहूनही परक्या वाटत होत्या. शिवाय प्रत्येक वेळी गाणाऱ्या पात्रावर एक *ताबडा* झोत टाकून तो त्याच्या हालचालीनुरूप हलविण्याचा एक होतकरू प्रयत्नही केला होता. नाटक आधी सांगितल्याप्रमाणे शब्दशः 'गातं' ठेवण्यासाठी या 'ती पै त'–टच्चा अपुरा वापर होता की काय ? तसं *असेल तर ते शेवटपर्यंत 'हसतं' ठेवण्यासाठी* काही प्रयत्न का केले नाहीत ?

मूळ कथासूत्रात न जमलेला हा विनोदीपणा थोडाफार भरून काढण्यासाठी काही बऱ्या आणि बऱ्याच फुटकळ शाब्दिक विनोदाचा *आधार घेतला आहे. काही अतिशय* बालिश हालचाली वगळता बहुतेक पात्रांच्या हालचाली मात्र फार्सला साजेशा बसवल्य आहेत.

कलाकारांपैकी श्रीकांत मोघे यांचे शेवटी शेवटी काही संवाद विसरणे सोडल्यास त्यांचे चारुदत्तचे काम झकास ! अन्य कलाकारांपैकी नाथा, रेजी, डॉ. शहाणे आणि गोरेवकील या भूमिका करणारे कलाकार उल्लेखनीय.

या नाटकाचे संगीतकार आहेत भास्कर चंदावरकर. नाटकापूर्वीच्या लगतच्या काळी त्यानी बँड-वादनाचे शिक्षणही कुठून तरी मिळवले असावे.

अरे हो, एक सांगायचे राहिलेच. हे नाटक सुरू होण्यापूर्वीच्या निवेदनात हे नाटक 'हसतं, खेळतं, गातं' आहे, असे वारंवार ठासून सांगितलं आहे. (ते 'झोपवतं' ही आहे, असे सांगायचे राहिले असावे किंवा त्याचा प्रेक्षकाना अनुभव येणारच आहे; तर ज्याचा अनुभव त्यांना येणार नाही, अशाच गोष्टी आपण सांगाव्यात म्हणूनही फक्त 'हसतं, खेळतं, गातं' सांगितले असावे.) शिवाय या नाटकाबद्दल 'का, कसं, असं का, तसं कसं' असे टीकाकारी प्रश्न विचारायचे नाहीत, असेही आधीच सांगून ठेवलेले असल्यामुळे 'या तथाकथित हसत्या, खेळत्या, गात्या, फार्समध्ये शेवटीच अचानक उमाळ्याचा पाऊस आणि आसवाचा धबधबा निर्माण करणारी सामुदायिक, कौटुंबिक भावनांची रडारड कशाला?' असे स्वतःलाच मूर्ख बनवून घेणारे प्रश्न विचारायचे नाहीत.

तर प्रत्यक्षात या मतकरी नाण्याची किंमत कितीही कमी असली तरी बाजारात मात्र ते चांगले जोरात चालणार, हे नाटकाच्या वाढीव दरावरून आणि नाटकाच्या गर्दीवरून लक्षात येते. □

# साहित्य, चित्रपट आणि 'गारंबीचा बापू'

सतीश जकातदार

मराठीतील कसदार साहित्याचं आणि मराठी चित्रपटाचं कधी सूत जमलं होतं का? हो, जमलं होतं. प्रभात, हंस, नवयुगच्या काळात व त्यापुढंही काही वर्षं मराठी साहित्यातील गाजलेली मंडळी मराठी चित्रपटकाराच्या हातात हात घालून नांदत होती. मराठी चित्रपटांना 'मराठीपण' देत होती. इथल्या मातीचा वास काही प्रमाणात का असेना, मराठी चित्रपटांना येत होता.

खांडेकर, वरेरकर, रांगणेकर, काणेकर, बेडेकर, माडगूळकर ही *सगळी* 'कर' मंडळी करपरतीची योजना नसतानासुद्धा मराठी चित्रपटांना वाङ्मयीन मूल्यं बहाल करण्याचा प्रयत्न करीत होती. आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे यांच्यासारखी मंडळी मराठीतील निखळ अशा खाशी विनोदाला चित्रपटातून पेरत होती मराठीतील त्या वेळच्या प्रख्यात कवी, कथाकार, साहित्यिकाचं या 'सेल्युलाइड' शी चांगलंच नातं जमलं होतं. आशादायक काही तरी निघू शकेल, इथल्या प्रादेशिकतेचे सर्व कंगोरे, पैलूचं दर्शन घडू शकेल अशा चित्रपटांची निर्मिती इथल्या मातीत रुजेल, उगवेल असं वाटत होतं... पण हाय! पुढील काळात कसदार साहित्य आणि मराठी चित्रपटानं घटस्फोट घेतला! 'चोख धंदा रोख कमाई' या सूत्रानं मराठी चित्रपटाला पुरतं गुडाळलं. चांगल्या, सकस कथा-कादंबऱ्या सोडून चलती असलेल्या कादंबऱ्यांच्या पटकथा बनल्या— काही प्रमाणात पैसा मिळाला आणि या धंदेवाईक साहित्यिकाचे पटकथाकार झाले! काही वेळा असंही झालं की, चांगल्या कथा-कादंबऱ्या लिहिणाऱ्या व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार यांच्यासारख्यानी धंद्यासाठी तडजोड करून वाङ्मयीन दर्जाला मूठमाती देऊन पाहिजे त्या पटकथा लिहिण्यात स्वारस्य मानलं. या काळात काही बरे प्रयत्न होते, नाही असं नाही; पण समीक्षकानी तरी किती वेळा *आपल्या दोन हातावरची बोटं सारखी सारखी* मोजायची? त्यापेक्षा सरसकट नव्हतेच असं म्हणू या!

## हरवलेली प्रादेशिकता

प्रादेशिक चित्रपट म्हणून मराठीला या काळात मान्यता तर मिळालीच नाही; पण धंदाही जमला नाही. बंगाली, मल्याळी या प्रादेशिक चित्रपटांची उंची मराठी चित्रपट गाठू शकला नाही आणि तामीळ-तेलगू चित्रपटासारखा तो धंदाही करू शकला नाही. या प्रादेशिक चित्रपटाप्रमाणे मराठी चित्रपटाने कधी हिंदी चित्रपटांशी स्पर्धा केली नाही की आव्हान दिलं नाही. उलट हिंदीच्याच वाटेनं जायच्या नादात स्वत:ची प्रादेशिकता मराठी चित्रपट हरवून बसला!

असं असूनही जो काही थोडी—फार प्रादेशिकता शिल्लक राहिली तिचं स्वरूप म्हणजे ग्रामीण चित्रपटाच्या नावाखाली पाटलाच्या साचेबंद कथांना पुन्हा पुन्हा फोडणी दिली गेली आणि मराठी चित्रपटाला 'सेल्युलाइड तमाशा' चं स्वरूप प्राप्त झालं. अस्सल विनोदाच्या शक्यतेची अपेक्षा फोल ठरून त्याची जागा 'इनोदानं' घेतली. प्रादेशिकता, 'नाटक कंपनी' पाटील आणि द्व्यर्थी संवादापुरतीच मर्यादित राहिली.

...पण आता मराठीतील दर्जेदार साहित्याकडं मराठीच काय हिंदीवालेही आकृष्ट झाले आहेत. *ज्या दर्जेदार साहित्यानं इथल्या* वाङ्मयात 'ट्रेंड' निर्माण केलं, इथल्या साहित्याला कालाच्या ओघात का असेना पण वळणं दिली अशा लेखकांकडे मराठी-हिंदी चित्रपटनिर्माते दिग्दर्शक खेटे घालू लागले आहेत.

गेल्या चार-पाच वर्षांत अशा सुवार्ता कानी पडू लागल्या आहेत. 'चानी', 'जैत रे जैत', 'यशोदा', 'सिंहासन' या मराठीत लोकप्रिय ठरलेल्या कादंबऱ्यावरील प्रदर्शित झालेले चित्रपट त्याचेच अपत्य आहेत, तर 'चक्र', 'रामनगरी', 'थॅंक्यू मिस्टर ग्लाड', 'कोंडुरा', 'वरारी', 'बलुतं', 'चाफा', 'अरे संसार संसार' अशा अनेक गाजलेल्या लोकप्रिय कथा-कादंबऱ्यावरील चित्रपटांची निर्मिती चालू झाली आहे. काही प्रदर्शित होण्याच्या मार्गावर आहेत, काहीची पैशाअभावी निर्मिती अथवा प्रदर्शन रेंगाळलं आहे!

## वासरात लंगडी गाय

अखेर कॅमेऱ्यानं मराठी साहित्याकडे 'टिस्ट' केले आहे. यापैकी प्रदर्शित झालेल्या चित्रपटानी 'वेगळेपणा', 'नाविन्य' या शब्दापुरतीच 'दाद' देण्याइतपत या कादंबऱ्याच चित्रपटीय रूपांतर केलं आहे. व्ही. शांताराम या प्रभात-परंपरेची मुहूर्तमेढ करणाऱ्या किंवा नाना पळशीकराच्या भाषेत सांगायचं झालं तर 'मूर्तीपेक्षा मडकी बनविणाऱ्या' या जगलरनं 'चानी' चं एक मडकं इथल्या मराठी प्रेक्षकांवर आपटून स्वत पुरतं समाधान मिळवलं आहे. 'जैत रे जैत', 'सिंहासन' या अनुक्रमे गो. नी. दांडेकर व अरुण साधू यांच्या कादंबऱ्यावर चित्रपट काढणाऱ्या जब्बार पटेल यांनी दोन्ही चित्रपटांत धाडस दाखवलं हेच कौतुक आहे बाकी इथं गल्लाभरू चित्रपटांचा रतीब घालणाऱ्यांनी 'इथे मराठीचा गोठा' भरल्यामुळं 'वासरात लंगडी गाय' इतपतच त्यांचं स्थान आहे. 'यशोदा' या चित्रपटाचा उल्लेख टाळणं जास्त योग्य आहे.

तेव्हा प्रभात, हंस, नवयुगच्या काळानंतर मराठी चित्रपटांचा कावळा जरी चांगल्या, सकस साहित्यिक कृतीच्या पिंडाला शिवला असला तरी त्यात औपचारिकताच आहे आणि कावळा शिवला तरी इच्छा पुन्या होत असतात ही अंधश्रद्धा उघडी पडण्याचा प्रकार या उपरोल्लिखित चित्रपटामुळं घडला आहे.

हे असं का घडलं ? कारणं अनेक आहेत. लोकप्रिय साहित्याचा फारसा विचार न करता धोपटमार्गानं निर्मिती करण्याची व्यवसायाभिमुख मनोधारणा याला कारणीभूत आहे. चित्रपटमाध्यमाची अपुरी समज, साहित्यिक आशयाशी मेळ घालण्याच्या प्रयत्नात कादंबरीचे 'व्हिज्युअल ट्रान्सलेशन' करण्याचा प्रघात, ही काही कारणं सांगता येतील. (सत्यजित रायच्या 'पथेर पाचाली' सारखे 'ट्रान्स क्रिएशन' करता येतं याचा इथं पत्ताच नाही !)

जब्बार पटेलांचं समजू शकतं की, त्यांच्या मेंदूवर नाटयमाध्यमाच्या सुरकुत्या जास्त आहेत आणि ते उतावीळ झाले आहेत; पण व्ही. शांतारामाचे काय ? त्याना चित्रपटमाध्यमाची अपुरी समज आहे असं या मराठी मातीत पाय रोवून म्हणायचं तर इथली माती 'आकांडतांडव' करत दुमगेल ! म्हणून त्यांची समज काय आहे हे 'चानी' चित्रपटात स्पष्ट झालंय असंच म्हणावं लागेल.

## चित्रात्मक आशय हवा

'पथेर पाचाली'चा उल्लेख करताना इथं प्रकर्षानं जाणवतं की, सत्यजित राय यांच्या तोडीचा, त्यांच्या जवळपास पोचू शकेल असा दिग्दर्शक मराठीत तयार होत नाही, झाला नाही याचं दुःख आहे ! राय यांचा संदर्भ घेऊन मराठी दिग्दर्शकाना (किंवा चित्रपटसृष्टीला) 'टुक टुक' करण्याचा प्रयत्न नसून रायसारख्या प्रतिभासंपन्न दिग्दर्शकाकडून या दिग्दर्शकानी काही शिकावं, थोडंफार का होईना साहित्यकृतीचं चित्रपटात रूपांतर कसं करावं याचे धडे घ्यावेत, जागतिक चित्रपट पाहण्यास जर 'बौद्धिक कष्ट' पडत असतील तर राय याचे उपलब्ध चित्रपट वारंवार पाहावेत म्हणजे निदान थोडीफार 'लाज' बाळगून आम्ही गप्प राहू. उगा 'सत्यजित राय असामान्य आहेत, एकमेव आहेत' असे उद्गार विविध मुलाखतीतून काढून सत्यजित रायना प्रशस्तिपत्रक बहाल करण्याच्या फंदात पडणार नाही.

अर्थात इथं सत्यजित राय यांचं अंधानुकरण करा असा अनाहूत सल्ला देण्याचा प्रकार नाही. राय यांच्या आत्मनिष्ठ प्रगल्भ शैलीचं नुसतं अनुकरण करून निष्पन्न काहीच होणार नाही. शिवाय त्यांच्या 'थोर' तंत्रात विसावलेल्या व रुजलेल्या शैलीच अनुकरण सुद्धा इथल्या मंडळीना तरी अशक्यप्राय वाटतं.

पण निदान कादंबरीचं 'वाचाळ' स्वरूप विचारात घेऊन त्याला चित्रपटमाध्यमाच्या विविध व व्यामिश्र अशा शैली-तंत्राची जोड देण्याची नितांत आवश्यकता इथं लक्षातच घेतली जात नाही. संकलन, कॅमेरा यांची प्रवाहयुक्त अशी लय साधणं, संपूर्ण साहित्यिक आशयाला कालसापेक्ष घाटणीचा प्रत्यय आणणं, या चित्रपटशैलीतील अंगाचा विचारसुद्धा या मंडळीना जड जातो. चित्रपटात संवादाना गौण महत्त्व असतं. तिथं बोलत असतो तो 'चित्रात्मक आशय' हेही इथं समजत नाही. जब्बार पटेलांच्या चित्रपटातील संवादावरच मंडळी बेहद्द खूष असतात. (आमचं नशीब, 'शोले'सारखी 'सामना' 'सिंहासन'च्या संवादांची रेकॉर्ड निघाली नाहीत !)

तेव्हा दर्जेदार साहित्यकृतीचं चित्रपटीय रूपांतर म्हणजे कादंबरीतील घटनाची जंत्री आहे. त्या क्रमानं दृश्य स्वरूपात मांडणं कादंबरीतील वर्णनात्मक परिच्छेदाचं 'लोकेशन' व 'कॉमेट्री'त रूपांतर करणं आणि चित्रपटाच्या धंद्यासाठी म्हणून ज्या क्लृप्त्या आहेत (उदा. नाचगाणी) त्या मात्र आवश्यक नसताना अगत्यानं घालणं असाच प्रकार इथं या संदर्भात चालू आहे.

## तकलुपी अफाटपण

आणि आता याच प्रकारची फलश्रुती पडद्यावर पाहायची असेल तर पाहा 'गारंबीचा बापू !'

'बापू' हे श्री. ना. पेंडसे याचं लाडकं अपत्य ! १९५२ साली प्रसिद्ध झालेल्या या कादंबरीचं लेखन 'एक प्रकारच्या बेहोशीत केलं' अशी पेंडश्यांचीच कबुली ! त्याही वेळी 'बापू' कादंबरी गाजली. पुढं ६२-६४च्या सुमारास डॉ. काशिनाथ घाणेकरानी 'बापू' रंगमंचावर सादर करून, मराठी नाट्य-प्रेक्षकाना भुरळच पाडली ! 'चिक्कार पैसे मिळविणार आणि व्याघ्रेश्वराचा सरपंच होणार !' (पृष्ठ १०७) अशी व्यावहारिक महत्त्वाकांक्षा बाळगणारा बापू त्या काळच्या प्रेक्षकाचा 'अमिताभ बच्चन ठरला ! कट्ट्यापासून ग्रंथालयापर्यंत बापूचं कवतिक केलं गेलं– पेंडश्यांची अजोड कलाकृती (?) म्हणून तिला दर्जेदार साहित्याच्या बरोबरीनं बसवलं गेलं !

पण आता २५-३० वर्षांनंतर हाच 'बापू' आहे त्याच स्वरूपात आणि त्याच डॉ. काशिनाथ घाणेकरासह 'गारंबीचा बापू' या नावानं एक परिणामशून्य चित्रपट घेऊन पडद्यावर आला आहे !

'गारंबीचा बापू' या कादंबरीबाबत निदान तीस वर्षांनंतर योग्य मूल्यमापन करण्याची गरज असून ती गो. म. पवार या समीक्षकानं ओळखली. त्यांनी केलेलं या कादंबरीचं मूल्यमापन, बापूचा तकलुपी अफाटपणा व्यक्त करण्यास पुरेसं असल्यानं त्यांचाच परिच्छेद उद्धृत करणं आवश्यक

वाटतं. परोपरीनं एवढी मान्यता मिळालेल्या या कादंबरीचं स्वरूप आहे तरी काय ? या प्रश्नाचं उत्तर देताना पवार या लेखात म्हणतात, 'हरतऱ्हेनं वाचकाचं रंजन करू पाहणाऱ्या कादबरीत, रंजन करण्याची सर्व प्रकारची सामग्री पेंडश्यानी वापरलेली आहे हिचा विशेष एवढाच की, वास्तव जीवनाचं चित्रण करणारी ही एक कलात्मक कादंबरी आहे असा चकवा निर्माण करण्यात ती बरीचशी यशस्वी ठरली. तिनं वास्तव जीवनाचा फुटकळ तपशील आकर्षकपणे पुरविला; परंतु गाभा मात्र स्वप्नरंजनाचाच ठेवला. रूढ रहाटी धुडकावून लावणारा, बंडखोर नायक निर्माण करण्याचा आभास निर्माण केला; परंतु बंडखोरीच्या व आधुनिकतेच्या मुलाम्याखाली पारंपारिक श्रद्धा, रूढी व मूल्ये जपणारा नायक चित्रित करून त्याद्वारे रंजनाचं कार्य साधलं. वाचकाना आवडणारी भावनाप्रधानता दाखविली. माणुसकीसारख्या मूल्याचा वरपागी गौरव केला. गोष्टीवेल्हाळ माणसाच्या चटकदार, भुरळ पाडणाऱ्या निवेदनतत्राचा रंजनार्थ उपयोग केला. बापू हा वास्तव जीवनातील कर्तृत्ववान पुरुष नाही. तो दिवास्वप्नातील *नायक आहे व त्याचं कृतिशील जीवन* दाखविणं लेखकाला जमलेलंच नाही. त्याऐवजी लेखक त्याच्या पराक्रमाच्या जाहिराती भल्या मोठ्या अक्षरात रंगवितो.'

## निवेदनतंत्राची अडचण

पवारांनी केलेलं भाष्य पेंडसे-प्रेमीना, आणि दिवास्वप्नातील बापूशी हितगुज करणाऱ्यांना झोंबणारं असलं तरी त्याचं मूल्यमापन आजच्या काळात सयुक्तिक आहे. पवारांचं भाष्य व कादंबरीचा 'चित्रात्मक आशय' असलेल्या चित्रपटाला लागू असणं स्वाभाविक असलं तरी तो संपूर्णतः लागू आहे असं म्हणण्याचं धाडस होणार नाही; कारण श्री. ना. पेंडसे बापूच्या पराक्रमाच्या जाहिराती रंगवून वाचकाचं रंजन करण्यात यशस्वी झाल्याचं पवार म्हणतात; पण चित्रपटात मात्र पटकथाकार, राणी बुर्रा आणि दिग्दर्शक बाबा माजगावकर बाकी तर राहू द्याच पण प्रेक्षकांचं रंजन करण्यातसुद्धा *अयशस्वी* ठरले आहेत !

अर्थात याला कारण झालं आहे कादंबरीच निवेदनतंत्र ! बापू चित्रपटाची समीक्षा करण्याआधी कादंबरीचं चित्रपटीय रूपातर याविषयी जो ऊहापोह केला आहे त्याचं एक उदाहरण म्हणजे हा चित्रपट आहे. चटकदार भुरळ पाडणाऱ्या पेंडश्याच्या निवेदनामुळं कादंबरी वाचण्यास वाचक प्रवृत्त तरी होतो. मात्र पानन्पानं ठासून भरलेल्या कादंबरीतील निवेदनाचं पटकथेत रूपातर कसं करावयाचं या पेचात पडलेल्या पटकथाकारानं निवेदनालाच पूर्णपणे फाटा दिला आहे !

चित्रपटाच्या सुरुवातीला 'ही गारंबी पहा' असं म्हणत निवेदक चार-पाच वाक्यं गारंबीबद्दल बरळतो आणि कायमचाच लुप्त होतो! 'कोंडुरा', 'चानी', 'जैत रे जैत' या चित्रपटातही हेच घडतं. 'ही पहा ठाकरवाडी' अस म्हणत असाच एक निवेदक 'जैत रे जैत' मध्ये येतो. हे असं होतं कारण, कादंबरीतील निवेदनात्मक, वर्णनात्मक परिच्छेदाचं करायचं काम हा प्रश्न 'व्हिज्युअल ट्रान्सलेशन' करणाऱ्या या सर्व चित्रपटदिग्दर्शकांना सतावत असतो.

'बापू' कादंबरीत निवेदनतंत्र वापरताना लेखकाला कादंबरीतली व्यक्तिमत्त्वं उभी *करण्याचं माध्यमाच्या स्वरूपामुळं मिळालेलं* 'प्रिव्हिलेज' चित्रपट-दिग्दर्शकाला मिळत नाही. त्यामुळं या चित्रपटात घटनाच्या क्रमात ज्या व्यक्ती येतात त्यांना आणलं जातं. मग ही व्यक्तिमत्त्वं संपूर्ण दृश्य मालिकेत ठसत नाहीत, फक्त येतात आणि जातात. त्यामुळं संपूर्ण चित्रपटभर या व्यक्तीचा वावर असला तरी ती केवळ वावरतात इतकंच !

बापूला वैभव प्राप्त करून देण्याच्या त्याच्या पाच वर्षांतील उद्योगाचं वर्णन लेखकानं अर्ध्या पानात उरकलं आहे. बापूच्या उमेदवारीचा आणि व्यावसायिक कर्तृत्वाचा हा काल लेखकानं टाळला आहे मग चित्रपट-दिग्दर्शकही तो काळ टाळायचं कसं विसरेल ? लेखकानं अर्ध्या पानात हा काळ उरकला तर दिग्दर्शकानं काही मिनिटांतच उरकला आहे केसाच्या ठेवणीत बदल, नवे ऐटबाज कपडे, नवे घर, दारू-नाचगाणीद्वारे श्रीमंतीचं प्रदर्शन अशा दृश्य स्वरूपात हा काळ आटोपला आहे. कादंबरी जियं थिटी पडते तो भागही तसाच ठेवून दिग्दर्शकानं कादंबरीची 'समज' दाखविली आहे असंच म्हणावं लागेल:

बापूचं तकलुपी अफाटपण दाखविताना तो परंपरागत श्रद्धा, रूढी व मूल्यं मात्र तितक्याच हट्टानं जोपासत असतो ही गोष्ट मात्र दिग्दर्शकानं अगदी ठसठशीतपणे दाखविली आहे. विठोबा मेल्यानंतर त्याचा बापूला होणारा भास, विठोबाच्या पिंडाला कावळा शिवला नाही ही गोष्ट शेवटपर्यंत मनात साठविणारा बापू, वास्तुशातीने बापूचा गृहप्रवेश, दिनकरभटाची बापूसाठी पूजा, वाघेश्वराच्या साक्षीनं बापूचं लग्न अशी अनेक दृश्यं दाखवून दिग्दर्शकानं कादंबरीच्या आधारे उभा केलेला बंडखोर बापू नकळतपणे वरपागी बंडखोर असल्याचं स्पष्ट होतं. लेखकाप्रमाणेच दिग्दर्शकही या वरपागी बंडखोरपणावर विसंबलेला दिसतो.

प्रेमळता, नैतिकता, मानवता यांच्या बुरख्याखाली निरागसतेचं सोग घेऊन येणारी बापू आणि राधाची कामुकता—याचं लेखकानं भरपूर प्रमाणात वर्णन केलं असूनसुद्धा दिग्दर्शकानं या कामुकतेला आवर घातल्याबद्दल धन्यवादच द्यावे लागतील !

## विसंगत व्यक्तिचित्रण

*व्यक्तिचित्रणाच्या बाबतीत बापू—राधा* ह्या दोन महत्त्वाच्या व्यक्ती दिवास्वप्नातील नायक-नायिकासारख्या वाटतात. गारबीच्या बदिस्त वास्तवतेतही मुक्ततेचं तत्त्वज्ञान खिरापतीसारखं वाटतं. फिरणारी ही दुक्कल वाटेल तेव्हा वाटेल तिथं नैतिकतेचे, मानवतेचे डोस पाजते. उदाहरणार्थ, बापू धाडस करून राधेला 'तुझा मुका घ्यावासा वाटतो' असं म्हणतो तर यावर राधा, 'त्यात काय, ही तर माणसाची साधी भूक आहे.' असलं अयोग्य वेळी योग्य उत्तर देते. यामुळं ह्या व्यक्ती अतिशयोक्तिपूर्ण पद्धतीनं रेखाटल्या जातात. त्यात सुसंगतीपेक्षा विसंगतीच आढळते. गारबीवर जरब असलेल्या अण्णा खोताचे व्यक्तिमत्त्व असच तकलुपी ठरतं. सुपारी कातरत डोळे वटारणं आणि बाई दिसली की हा पापी दाखविणं, अशा काही दृश्यांतूनच अण्णा खोत उभा केला जातो. बापूची दुश्मनी अण्णा खोताशी असते, पण त्या दोघाची दृश्यं कधीच दाखविलेली नाहीत.

कादंबरीत विठोबा हा सर्वांत चागल्या

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC–W 28
(Licensed to post without prepayment of postage–No. 11)

व्यक्तिचित्रणाचा नमुना आहे. पुरुष नसलेल्या विठोबाचं बापूच्या आईशी लग्न लावून दिलेलं असतं... अशा या विठोबापुढं एकच पर्याय असतो. मुक्याने सहन करणे, कष्ट करीत जगत राहाणे. त्यातही तो बापूवर आपला ओलावा प्रगट करीत असतो, विठोबाच्या पाऊलवाटा ठरलेल्या आहेत. एका संथगतीने त्याचं जीवन शेवटाकडे जात आहे याची चाहूल मात्र दिग्दर्शक कौतुकास्पदरीत्या अतिशय परिणामकारक चित्रण करून दाखवितो. पाणक्या असलेल्या विठोबाचं तळ्याकडे जाणं–येणं, (श्लोक म्हणत म्हणत) त्यातून एक गूढ परंतु मृत्यूकडे चाललेली वाटचाल स्पष्ट करण्यात दिग्दर्शक कमालीचा यशस्वी झाला आहे. विठोबाकडे जे नाही त्याची दखल न घेता त्याच्याकडे असलेल्या गोष्टीची दखल घेतलेली आहे.

परंतु हा विठोबाचा अपवाद वगळता बाकी सर्व वानरोबाचाच खेळ आहे.

डॉ. काशिनाथ घाणेकरानी ही भूमिका नाटकात गाजविल्यामुळं साहजिकच चित्रपटातही त्यानीच भूमिका केली आहे. गोऱ्या कातडीचा, घाऱ्या डोळ्यांचा हा थोडासा उग्र नट बापू म्हणून बाहेरून शोभला तरी नाटकीपणाचा आव आणत अभिनय करण्याचा प्रयत्न त्यानी इथंही केला आहे, तुसडा, स्पष्टवक्ता, जिद्दी, आव्हानात्मक आविर्भाव, कोठे तरी अंतर्मनात लपलेला ओलावा अशा विविध, विसंगत पैलूंची भेसळ असलेला बापू नाटकात अंगावर आला तरी चित्रपटात मात्र हरवला आहे. शब्दाची घसरगुंडी करत संवाद बोलण्याची त्याची तऱ्हा त्यांना लखलाभ असली तरी चित्रपटाच्या प्रकृतीला मात्र आततायी ठरली आहे. राधेचं काम करणारी गीता सिद्धार्थ. 'गर्म हवा' या चित्रपटातल्या या गुणी नटीनं राधेची सोशिकता यथायोग्य पद्धतीनं दाखविण्याचा प्रयत्न केला तरी तिच्या चेहऱ्यावरील भाव नीट न टिपण्यास सदोष छायाचित्रण कारणीभूत ठरलं आहे. दत्ता भट (अण्णा खोत) सखाराम भावे (विठोबा), सरस्वती बोडस (मावशी) यांनी आपल्या भूमिका संयम राखून केल्या आहेत.

पैशाची अडचण, अनेक वर्षं रखडलेलं चित्रीकरण, रेंगाळलेलं प्रदर्शन आणि इतर अनेक आपत्तीतून 'गारंबीची' निर्मिती झाली आहे. पडद्याआड निर्माता-दिग्दर्शकांना अनेक आर्थिक अडचणी आल्याची नोंद घेऊनसुद्धा सदोष छायाचित्रण, संकलन आणि विचित्र रंगामुळं संपूर्ण चित्रपटाचा बेरंग झाला आहे. त्यामुळं चित्रपटातील सर्व तांत्रिक बाबतीत हा चित्रपट माध्यमदृष्ट्या उथळ ठरला आहे. पैसा असता तर ह्यात सफाई आली असती; परंतु चित्रपटाचा साचा मात्र उथळच राहिला असता. बाबा माजगावकरांनी साहित्याकडे कॅमेरा 'टिल्ट' केला; परंतु ते कादंबरीचं काय नाटकाइतकंसुद्धा रंजन करण्यात यशस्वी ठरलेले नाहीत 'गारंबीचा बापू' वाचल्यानंतर श्री. ना. पेंडसे याच्या एका मित्रानं त्यांना पत्रातून कळविलेलं मत चित्रपटाच्या संदर्भात काही दुरुस्त्यासह नोंदवून घ्यावंसं वाटतं.

'Despite the strain, the reading of your book was a great relief ( not technically ) and served the purpose of true literature (every film) –an escape from life (film).' □

## पुणे वार्ता : पृष्ठ ३ वरून

उभा राहिला आहे. १९७१ सालच्या डिसेंबरमध्ये भगवान रजनीशाची इथल्या शिवाजीनगरजवळच्या संघवी ऑटोमोबाइल्सच्या आवारात प्रवचनं झाली होती. भगवानाचं ते पुण्यातलं पदार्पण! आता कोरेगाव पार्कजवळच्या आलीशान गढीमध्ये या पंथाचं रूपांतर झालं आहे. प्रवचनांमध्ये रजनीशांचाही कृष्ण आणि भगवद्गीतेवर फार भर! पण संपूर्ण विमुक्तता व त्याद्वारे विरेचन हा त्याच्या तत्त्वज्ञानाचा आत्मा आहे, तर हरे कृष्ण पंथ दमन-संयमनाच्या पायावर उभा राहू पहात आहे. म्हणूनच भारतीय तत्त्वज्ञान व हिंदु संस्कृतीला तो जास्त जवळचा आहे. मनःशांतीच्या शोधात असलेल्या कोट्यवधी पाश्चिमात्यांना या पंथाविषयी जास्त आकर्षण वाटण्याची शक्यता आहे. कारण त्यांचं प्रत्यक्ष जीवन रजनीशांच्या तत्त्वज्ञानापेक्षा आताही फारसं निराळं नाहीच. हरे कृष्ण पंथ मात्र या स्वैराचाराला मुरड घालून शिस्तबद्ध उपासनेच्या मार्गानं मन शांती मिळविण्याचं तत्त्वज्ञान प्रचारात आणि आचरणात आणण्याचा प्रयत्न करत आहे· साहजिकच या ठिकाणी आपण खरोखरच काही विशेष श्रम घेऊन मन शांती मिळवत आहोत असं तात्पुरतं का होईना; पण मानसिक समाधान अस्वस्थ पाश्चिमात्यांना जास्त मिळू शकेल. त्यामुळं भगवान रजनीशांना हे एक नवं अप्रत्यक्ष आव्हान आहे –प्रतिनिधी

## निवेदन

ग्रामीण भागातील मुलांमध्ये निसर्गाची आवड व शास्त्रीय दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी पक्षीनिरीक्षण मंडळातर्फे एक शिबिर २७ ते ३१ मे रोजी पुण्यात आयोजित करण्यात येणार आहे. शिबिरामध्ये पक्षीनिरीक्षण, वृक्षसंवर्धन, प्राणिशास्त्र व आपला परिसर याची ओळख प्रात्यक्षिकांसह करून देण्यात येईल. राहण्याची व जेवण्याची व्यवस्था अल्पदरात करण्यात येईल. त्याचा खर्च शिबिरात भाग घेणाऱ्या मुलांना करावा लागेल. तसेच प्रवेश फी म्हणन वीस रुपये द्यावे लागतील.

संपर्क–डॉ. रमेश बिडवे, ४८, नवा रविवार, डाळ आळी, पुणे २.
दूरध्वनी क्र. ४४४३३२